## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६३
निर्णय दिनांक : ०१.०४.२०१०

१. श्री. शंकर इंगळे, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कृषि उपसंचालक,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,नांदेड
जन अपिलीय अधिकारी : जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना माहिती अधिकाऱ्याकडून मोफत मिळावी आणि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा त्यांनी हेतूपुरस्सर भंग केल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियमातील २००५ मधील कलम ४(१) व (२) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करावयाच्या माहितीबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अधिनियमातील कलम ४(१) व (२) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाने प्रसिध्द करावयाच्या माहितीच्या प्रती, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची यादी पुरविली. तथापि अधिनियमातील कलम ४(२) प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने प्रसिध्द करावयाची कोणतीही माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.११.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ ची माहिती एक महिन्याच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. २४.१०.२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती दिली व तदनंतर दि. १२.०३.२०१० रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ द्वारे अपिलार्थीने, "पोटकलम ४(३) नुसार वरील माहिती आपण अद्याप प्रसिध्द केली नसल्यामुळे मोफत मिळावी", अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, 'माहिती' नसून ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्याची केलेली विनंती आहे, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ वर कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही, परंतु या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना अपिलार्थीस या मुद्यावर(मुद्दा क्र.३) माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०५.१२.२००८ रोजी दिलेल्या निर्णयातील निरर्थकता सिध्द होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ द्वारे मागितलेली माहिती ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची, अशी माहिती आहे. ही माहिती तयार करुन प्रसिध्द करण्याची प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणास दि. १५.१०.२००५ अशी अंतीम मुदत या अधिनियमाद्वारे विहीत करण्यात आली होती. तथापि विचाराधीन प्रकरणाशी संबंधित कृषि विभागाच्या नांदेड येथील प्राधिकरणाने अशाप्रकारची कोणतीही माहिती प्रसिध्द केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १२.०३.२०१० रोजी दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कलम ४(२) मधील मुद्दा क्र. १० शी संबंधित माहितीचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. यावरुन अद्यापही नांदेड जिल्हयातील संबंधित कार्यालयाने ही माहिती तयार केली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. वास्तविक पाहता, ही माहिती तयार करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत होऊनही चार वर्षे इतका कालावधी लोटल्यानंतरही अशाप्रकारची माहिती तयार करुन

प्रसिध्द न करणे, ही बाब कृषि विभागाला शोभनीय आहे, असे आयोगास वाटत नाही. याकरिता सचिव (कृषि) यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) नुसार असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या विभागाच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाची, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४(२) प्रमाणे स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची सतरा मुद्यांवरील माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत प्रसिध्द करण्याची व्यवस्था करावी. या प्रकरणी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना विभाग प्रमुख या नात्याने आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी नांदेड जिल्हयाची कृषि विभागाशी संबंधित, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४(२) प्रमाणे प्रसिध्द करावयाची सतरा मुद्यांवरील माहिती, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत प्रसिध्द करावी व त्या माहितीच्या प्रती अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित मुदतीत अपूर्ण व तदनंतर विलंबाने आणि अपूर्ण स्वरुपात देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम

४(१) च्या उपकलम (ख) प्रमाणे प्रसिध्द करावयाच्या सतरा मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर इंगळे,आनंदनगर चौक, नांदेड- ४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (कृषि),मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६४
निर्णय दिनांक : ०१.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. दगडू महेबूब शेख,<br>रा.पालम,जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, परभणी

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ते सन २००२ ते २००४ पासून पदोन्नतीस पात्र असतानासुध्दा आजपर्यंत त्यांना कोणतेही कारण न देता पदोन्नती डावलण्यात आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांची पदोन्नती डावल्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"विभागीय क.अ. पदोन्नती बैठक दि. ११.०६.२००४ मधुन मला कोणत्या नियंमाने सेवाजेष्ठता व सर्व असताना कोणत्या आदेशाने-नियमाने, पदोन्नतीपासुन डावलण्यात-वगळण्यात आले त्यांच्या सत्य-प्रती देण्यात यावे, तसेच विभागीय क.अ. पदोन्नती समीतीची व "शासनाची,मान्यता दि. ३०.०८.२००६ प्रदान असताना, प्रचलित शासन आदेश/नियमानी वंचित ठेवण्यात आले. त्याचा सत्य-प्रति"

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी दि. १९.१२.२००८ रोजी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविला, परंतु जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांनी अधिनियमातील कलम १९(६) मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच बदलून आले असून या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांनी आज सोबत आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या स्वरुपावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीतील सुरुवातीच्या भागामध्ये

त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कोणत्या नियमाने पदोन्नती डावलण्यात आली आहे त्या नियमाच्या सत्यप्रती, अशी माहिती मागविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाच्या संदर्भातील वस्तुस्थिती आयोगास स्पष्ट करताना आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थीवर एका विभागीय चौकशी प्रकरणी दोषारोपपत्र दाखल केले असल्याने अपिलार्थीस नियमित पदोन्नती नाकारण्यात आली. अपिलार्थीस पदोन्नती नाकारण्याची कारणे निवड समितीच्या दि. ११.०६.२००४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केलेली आहेत. या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत ते अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती म्हणून विनामूल्य देण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, विभागीय पदोन्नती समितीच्या दि. ३०.०८.२००६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये देखील अपिलार्थीच्या पदोन्नतीचा प्रश्न चर्चेला आला असता, अपिलार्थी हे पदोन्नतीसाठी विहित व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाले नसल्याने अपिलार्थीस त्यावेळी पदोन्नती नाकारली होती. विभागीय पदोन्नती समितीच्या दि. ३०.०८.२००६ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत देखील ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत का पुरविली नाही, याचे कारण उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगास स्पष्ट करता आले नाही. परंतु त्यावेळी श्री. एस.एम.गोडसे नावाचे उपकार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्यासोबत आणलेल्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, ही माहिती आता उघड केल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात आवश्यक ती माहिती प्राप्त होणार आहे, असे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात दोनही पदोन्नती समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवाव्यात.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री. एस.एम.गोडसे (सध्या जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग परतूर, जि.जालना येथे कार्यरत) यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सा.बां.) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री. एस.एम.गोडसे (सध्या जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग परतूर, जि.जालना येथे उपविभागीय अभियंता या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.
३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस.एम. गोडसे (सध्या उपविभागीय अभियंता,जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग परतूर, जि.जालना या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दगडू महेबूब शेख,स्थापत्य अभियांत्रिकी सहायक,पंचायत समिती,पालम,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६५
निर्णय दिनांक : ०१.०४.२०१०

१. श्री. स.अबरार स. ईलाही, : अपिलार्थी
रा. परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी,
परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी,
परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी,
परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, मुख्य अभियंता,पारेषण, महाराष्ट्र राज्य विज कंपनी यांच्या कार्यालयाकडून त्यांना अद्यापपावेतो माहिती दिली नाही, म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००६ ते दि. १७.१२.२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातर्फे काढल्या

गेलेल्या सर्व निविदांसंदर्भात विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निविदेचे तपशील, निविदा ज्या वर्तमानपत्रात प्रसिध्द केली, त्या वर्तमानपत्राचे नाव, प्रसिध्दीचा दिनांक, वर्तमानपत्रातील जाहीरातीची झेरॉक्स प्रत, ही निविदा जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर टेंडर/कोटेशनचे दर, सर्वात कमी असलेल्या फर्मचे नाव, ऑर्डर दिलेल्या फर्मचे नाव व दिलेल्या ऑर्डरची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर निर्णय न झाल्याने व आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या कार्यालयात नुकतेच रुजू झाले असून या कार्यालयाशी संबंधित मुख्य अभियंता आता सेवेतून निवृत्त झाले आहेत व तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. आर.पी.तेलंग) यांची आता पुणे विभागात बदली झाली आहे.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबद्दलची कल्पना त्यांना आयोगाकडील दि. २२.०१.२०१० रोजीच्या सुनावणीसंदर्भातील पत्राद्वारे आली. तदनंतर त्यांनी विशेष मेहनत घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे दि. १७.०२.२०१० रोजी त्यांना पुरविली असून या माहितीच्या पृष्ठांची संख्या २३८८ इतकी आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. परंतु यासंदर्भातील सबळ पुरावा त्यांनी या माहितीसाठीच्या अर्जासोबत जोडला नव्हता. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा पुरावा म्हणून अपिलार्थीने त्यांच्या शिधापत्रिका क्र. ५८९२६५ ची झेरॉक्स प्रत सादर केली होती. ही झेरॉक्स प्रत कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अर्जासोबत जोडलेला हा पुरावा सबळ आहे, असे मानता येणार नाही. तथापि एवढे असूनही सध्याच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण २३८८ पृष्ठांची माहिती त्यांच्या दि. १७.०२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. ही माहिती अपिलार्थीस दि. २०.०२.२०१० रोजी प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचदेखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेली आहे. यावरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे.तसेच अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने, आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. परंतु या प्रकरणी, अपिलार्थीच्या दि. १७.१२.२००८ रोजीच्या अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर.पी.तेलंग तत्कालीन कार्यकारी अभियंता (सध्या कार्यकारी अभियंता, (अउदा) इएचव्ही (झोन) पुणे - बारामती या पदावर कार्यरत) यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याची वस्तुस्थिती नजरेआड करण्यासारखी नाही. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर.पी.तेलंग (सध्या कार्यकारी अभियंता, (अउदा) इएचव्ही (झोन) पुणे बारामती या पदावर कार्यरत) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. स.अबरार स. ईलाही,बुराबुल हक्क नगर, दर्गारोड, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, परिमंडळ कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. आर.पी.तेलंग, कार्यकारी अभियंता, (अउदा) इएचव्ही (झोन) पुणे बारामती यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९६
निर्णय दिनांक : ०१.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गणेश दगडू होळे,रा. लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील,"५० लाखाच्या पुढे काम वाटप केलेल्या मजूर संस्थेची यादी व ते देता येत असल्यास त्याची सविस्तर माहिती व काम दिले नसल्यास त्याची कारणे", अशा माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वरील परिच्छेदात उल्लेखिलेली दि. ०१.०४.२००८ ते ३१.०३.२००९ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा दि.०९.०४.२००८ रोजीचा मूळ अर्ज जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे प्राप्त झाला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.

११.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, "ती यादी देता असल्यास त्याची सविस्तर माहिती व काम दिले असल्यास त्याची कारणे", या भागाची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती मोघम आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण अपेक्षित करणाऱ्या स्वरुपाची आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील, "सविस्तर माहिती" म्हणजे, नेमकी कोणत्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा त्यांनी येथे उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचा हा भाग मोघम स्वरुपाचा असल्याचे दिसून येत आहे. या भागातील उर्वरित भाग, "काम दिले असल्यास त्याची कारणे" या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षिली आहेत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अर्जदाराने मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा निर्णयाबद्दलची स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशा प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे या भागावरील कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील परिच्छेदात स्पष्ट केलेला भाग अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. परंतु जन माहिती

अधिकारी यांनी दि. ०१.०४.२००८ ते ३१.०३.२००९ या कालावधीमध्ये पन्नास लाखाच्या पुढे काम वाटप केलेल्या मजूर संस्थेची यादी अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. काम वाटप समितीचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हे अध्यक्ष आहेत, या समितीमार्फतच मजूर सहकारी संस्थांना कामाचे वाटप होत असते. त्यामुळे ही माहिती सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असावयास हवी. ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उघड करावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, "दि. ०१.०४.२००८ ते ३१.०३.२००९ या कालावधीमध्ये पन्नास लाखाच्या पुढे काम वाटप केलेल्या मजूर संस्थांची यादी", ही माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे,रा.सुळगल्ली, खडक हनुमान, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५८

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

१ श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर, : अपिलार्थी

तांबरी विभाग, विद्यानगर, उस्मानाबाद - ४१३५०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०१-२००९ रोजी या अपिलावर दिलेला निर्णय त्यांना अमान्य असून, माहिती अधिकार अधिनियमातील कलमाचा विचार न करता व कायद्याचे उल्लंघन करुन त्यांनी तो निकाल दिलेला आहे. या निकालाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्याचा बचाव केला आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार दिनांक ११-

०९-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५६५८/- इतक्या रकमेचा भरणा केला असताना त्यांना ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील केले आणि प्रथम अपिलाचा निर्णय मान्य नसल्यामुळे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर करणे त्यांना भाग पडले आहे. ३० दिवसात जर जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही तर अशा अधिकाऱ्यांना दोषी ठरवून दंड करण्याची तरतुद असताना देखिल या तरतूदीची अंमलबजावणी जन अपिलीय अधिकारी यांनी केली नसल्यामुळे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही व्हावी, म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ३०५४ नॉन प्लॅन गट- 'ब' व गट - 'क' नुसार केल्या गेलेल्या सर्व रस्त्यावरील सर्व प्रकारच्या कामाबाबत दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गट - 'ब' व गट - 'क' या योजनेनुसार सर्व प्रकारच्या मंजूर कामाची यादी, मंजूर अंदाजपत्रके व त्यांना दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या छायांकित प्रती, एम. बी. च्या व कामाच्या अदा केलेल्या सर्व चेकच्या छायांकित प्रती, ३०५४ नॉन प्लॅन गट 'ब' व 'क' या योजनेवर एकूण झालेला खर्च व बांधकाम साहित्याच्या सार्वजनिक बांधकाम प्रयोगशाळेतून तपासणी केलेल्या सर्व प्रमाणित प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार प्रथमतः दिनांक २०-०८-२००८ रोजी त्यांच्या

कार्यक्षेत्रातील सर्व उपअभियंता व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून दिनांक १०-०९-२००८ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली. यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५६५८/- इतके त्यांना चलनाद्वारे बँकेमध्ये भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी शुल्क कोणत्या बँकेत भरावयाचे याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी चलनाद्वारे केला. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २५-०९-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्वरीत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १०-०९-२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व तदनंतर दिनांक १७-०३-२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. तथापि सदर माहितीचा स्वीकार अपिलार्थीने न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीकडे पाठविलेल्या माहितीचे पार्सल त्यांना तसेच परत आले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी

अपिलार्थीकडून त्यांना परत प्राप्त झालेले पार्सल आयोगास दाखविले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील मोजमाप पुस्तिकेच्या प्रती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती कार्यकारी अभियंता यांच्याकडे असणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे. अपिलार्थीने माहितीसाठी ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला त्यावेळी श्री. मेंगडे नावाचे कार्यकारी अभियंता तथा जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती तत्कालीन उपअभियंते श्री. मोमले, जिल्हा परिषद उपविभाग उमरगा, श्री नैमुद्दिन, उपविभाग भूम, श्री वाघमारे, उपविभाग कळंब, श्री. शेख जिलाणी, उपविभाग उस्मानाबाद, श्री. सुळ, उपविभाग तुळजापूर आणि श्री. खरोसेकर शाखा अभियंता, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्याकडे उपलब्ध होती. तथापि या उपअभियंत्यांनी कार्यकारी अभियंत्याकडे अथवा अपिलार्थीकडे मोजमापपुस्तिकेच्या प्रती वेळेत पाठविल्या नसल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती त्यांना विलंबाने द्यावी लागली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील सर्व कंत्राटदारांना दिलेल्या चेकच्या छायांकित प्रतीबाबत त्यांनी अपिलार्थीस काहीही कळविलेले नाही कारण अपिलार्थीच्या दिनांक १६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांनी जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. मोरे (सध्या उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय या पदावर कार्यरत) यांच्याकडे पाठवून दिली असता, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याने या पत्रावर त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच कंत्राटदारांना दिलेल्या चेकची स्थळ प्रत ठेवण्याची पध्दत प्रचलीत नसल्यामुळे अपिलार्थीस या चेकच्या प्रती त्यांना पुरवता येणार नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाअंतर्गत लेखाशीर्ष ३०५४ नॉन प्लॅन गट 'ब' व गट

-'क' या योजनेसंदर्भात पाचही मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना देणे भाग आहे. जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रचलित कार्यपध्दती पाहता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ मधील मोजमापपुस्तिकेच्या नोंद वहीच्या झेरॉक्स व चेकच्या छायांकित प्रती वगळता उर्वरित सर्व माहिती कार्यकारी अभियंता यांच्याकडे असणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद देताना कार्यकारी अभियंता यांनी फक्त अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. परंतु उर्वरित कोणत्याही मुद्यावर अपिलार्थीस कार्यकारी अभियंता यांनी विहित मुदतीत माहिती पुरविलेली नाही. अपिलार्थीस कार्यकारी अभियंता यांनी दिनांक ०१-०९-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५६५८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस हे शुल्क कळविले त्याअर्थी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे निश्चितपणे तयार असणार, परंतु तरीही अपिलार्थीस माहिती उपलब्ध न करुन देण्याचे कारण आयोगास कळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे जे शुल्क कळविले आहे, त्या शुल्काचा तपशील त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस दिलेला नाही. त्यामुळे त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (एक) च्या तरतुदीचा भंग केला आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक ०१-०९-२००८ रोजीचे पत्र अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने दिनांक ११-०९-२००८ रोजी शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २५-०९-२००८ पर्यंत सशुल्क माहिती देय होत होती. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०३-२०१० रोजी म्हणजे, सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर, माहिती दिली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क

माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर माहिती पुरविली असल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ५६५८/- इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. सदरचे शुल्क त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली जी माहिती त्यांच्याकडे पोस्ट खात्यामार्फत दिनांक २९-०३-२०१० रोजी परत आली आहे ती त्यांनी, हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसापर्यंत त्यांच्याकडे अपिलार्थीस विनामूल्य देण्याकरिता उपलब्ध करुन ठेवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडून, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी, कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातील संबंधितांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. मेंगडे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, उस्मानाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक श्री. मोमले, श्री नैमुद्दिन, श्री वाघमारे, श्री. शेख जिलाणी, श्री. सुळ आणि श्री. खरोसेकर, व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी हे संयुक्तपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देताना या माहितीशी संबंधित असलेले त्यांचे सर्व सहायक यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून सर्व संबंधितांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना श्री. मेंगडे व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना मुख्य

लेखा व वित्त अधिकाऱ्याचे जन माहिती अधिकारी यांच्यावर (त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्या पत्रास प्रतिसाद न दिल्याबद्दल) प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ५६५८/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.
४. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना श्री. मेंगडे जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर, व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर, तांबरी विभाग, विद्यानगर, उस्मानाबाद - ४१३५०१

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५९

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. काझी आरेफ अब्दुल रऊफ,<br>रा.बीज प्रक्रिया केंद्रासमोर, ढोकी, ता. जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सोशल उर्दू प्रायमरी स्कूल, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसाच्या मुदतीत निर्णय दिला नाही व त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आयोगास, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी आणि जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५० प्रमाणे दंडीत करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात दि. ०१-०६-२००३ ते दि. ३१-१०-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ०५-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन प्रथमतः आपले निर्णय देणे योग्य राहिल असे आयोगाचे मत आहे. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. काझी आरेफ अब्दुल रऊफ, बीज प्रक्रिया केंद्रासमोर, ढोकी, ता. जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सोशल उर्दू प्रायमरी स्कूल, न्यू गाजीपुरा, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६०

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नारायणराव तातेराव कदम,<br>रा. शिवाजी रोड, महादेव मंदिराजवळ, पूर्णा,<br>ता. पूर्णा, जि. परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, पूर्णा, जि. परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद, पूर्णा, जि. परभणी | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, नगरपरिषद, पूर्णा, जि. परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाचा निर्णय न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक २४-११-२००६ ते २४-११-२००८ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व दिशाभूल झाल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी श्री. नाथराव बापुराव चव्हाण हे आयोगासमोर उपस्थित आहेत, त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १५-१२-२००८ रोजी काही माहिती दिली आणि तदनंतर उर्वरित माहिती दिनांक २७-०१-२००९ रोजी अपिलार्थीस देऊ केली असता, अपिलार्थीने ती माहिती घेण्याचे नाकारले, यानंतर त्यांनी अपिलार्थीस परत दिनांक ०२-०४-२००९ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची माहिती मिळाल्याची पोचसही आयोगास दाखविली. त्यांनी आयोगास पुढे

असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-१२-२००८ रोजी ९ पृष्ठांची व तदनंतर १७ पृष्ठांची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ्यचे सर्व पुरावे त्यांनी आयोगास सादर केले आहेत. याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या मूळ अर्जातील बहुतेक सर्व मुद्यांची माहिती प्रथमतः दिली व तदनंतर दिनांक २७-०१-२००९ रोजी अपिलार्थीस उर्वरित माहिती देऊ केली असता ती माहिती स्वीकारण्याचे अपिलार्थीने नाकारले. परंतु तदनंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने ही माहिती दिनांक ०२-०४-२००९ रोजी म्हणजेच, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०३-२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर, हस्तगत करुन घेतली आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याची त्यांची पोचसही दिली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. या माहितीच्या दर्जावर अपिलार्थीने लेखी अभिप्राय आयोगास सादर केलेले नाहीत किंवा हे स्पष्ट करण्यासाठी आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत, असे अनुमान काढण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायणराव तातेराव कदम, शिवाजी रोड, महादेव मंदिराजवळ, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगरपरिषद, पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६१

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. धोंडीराम नरहरराव फुलारी,<br>रा. महाराणी लक्ष्मीबाई रोड, प्रसाद हॉस्पीटल मागे,<br>आशीर्वाद बिल्डींग, परभणी - ४३१४०१ | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,<br>परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे व या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्या अपिलावर निर्णय न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या सन २००८-०९ या कालावधीतील निवृत्ती वेतनाबाबत

दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांचे मूळ निवृत्ती वेतन, मूळ निवृती वेतनावर महागाई वेतन, महागाई भत्ता व त्याचा दर - अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने दिनांक ०७-०२-२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व विलंबाने माहिती दिलेली आहे, ती त्यांना दुरुस्त करुन मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०४-०२-२००९ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने माहितीची व्यक्तिशः मागणी करुनही ते नंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. परंतु त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, दिनांक २३-०३-२००९ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली

माहिती त्यांनी व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या अंशराशीकरणाची रक्कम ऑगस्ट २००८ मध्ये मंजूर झाली असताना, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने मंजूर अंशराशीकरणाची रक्कम एप्रिल २००८ पासून त्यांच्या सेवा निवृत्ती वेतनावर वजा केली आहे, हे चुकीचे आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. परंतु त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०२-२००९ रोजी प्रथम अपील करणे पसंद केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) द्वारे विहित केलेली मुदत संपल्यानंतर ४६ व्या दिवशी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन आपला निर्णय दिला आहे. अपिलार्थीस ही माहिती सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त झाली. तथापि प्राप्त माहितीमध्ये काही तांत्रिक उणिवा असल्याचे अपिलार्थीचे मत आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये प्रामुख्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास त्यांनी देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे हे अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडे

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या या माहितीवर जर त्यांचा काही आक्षेप असेल तर या आक्षेपाचे निराकरण त्यांनी जिल्हा परिषद, परभणी मधील सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये बदल करुन नंतर ती सुधारीत स्वरुपात अर्जदारास देण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर निर्णय दिला असल्यामुळे व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे यथास्थिती प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धोंडीराम नरहरराव फुलारी, महाराणी लक्ष्मीबाई रोड, प्रसाद हॉस्पीटल मागे, आशीर्वाद बिल्डींग, परभणी - ४३१४०१

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६२

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

१ श्री. धनाजी भिमराव कुरुंद, : अपिलार्थी

मु. धनेगांव, पो. कुंभारी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,

जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपमुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही, न दिल्यामुळे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता विनामूल्य देण्यात यावी, सुनावणीच्या प्रवास खर्चासह त्यांना एक हजार रुपये देण्यात यावेत व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार दंड व शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश द्यावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, "मानव विकास योजनेतील दुधाळ गाई म्हशीचे वाटप केल्यासंदर्भात" या विषयावर दिनांक ०१ एप्रिल २००७ ते २४-०९-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे एका विशिष्ट प्रपत्रात मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे टपाल खर्चासह शुल्क रु. ५२९८/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १० दिवसाच्या आत सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५२९८/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीस दिनांक

११-१०-२००८ रोजी दिलेल्या पत्राची व अपिलार्थीस हे पत्र पाठविल्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयाची जावक नोंद वहीची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील पत्र क्रमांक ५३७४ च्या अन्वये अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून, ही माहिती ते अपिलार्थीस केव्हाही सशुल्क उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका १० कलमी विशिष्ट प्रपत्रामध्ये माहिती मागविली आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एखाद्या विशिष्ट प्रपत्रामध्ये माहिती मागविल्यास त्या प्रपत्रामध्येच अर्जदारास माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक नाही. परंतु या प्रपत्रातील मुद्यांशी संबंधित माहिती ज्या कागदपत्रावर उपलब्ध आहे ती कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास, अधिनियमातील तरतुदीनुसार ती देय असल्यास, उपलब्ध करुन देणे भाग आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील प्रपत्रामधील, 'लाभार्थीस पत्राद्वारे जनावरे खरेदीसाठी कळविले होते का? ' या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय नाही, कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. अशाप्रकारचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे कारणे, स्पष्टीकरणे अथवा त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत समाविष्ट नाही. उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती या प्रकरणी

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे तयार असलेली माहिती आयोगास दाखविली. या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचा समावेश असल्याचे आयोगास आढळून आले आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीचे शुल्क रु. ५२९८/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले होते. अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याचा योग्य तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केला आहे. यावरुन हे पत्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविले गेल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५२९८/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरणे भाग आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्याप्रमाणे अर्जदाराने मागणी केलेली माहिती विहित मुदतीत देण्याचे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे या अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी सूचना केल्याप्रमाणे अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे भरण्याचे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य अर्जदाराचे देखिल आहे. या प्रकरणी अपिलार्थीस या कर्तव्याचा विसर पडल्याचे आयोगास आढळून आले आहे. केवळ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही, ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनाजी भिमराव कुरुंद, मु. धनेगांव, पो. कुंभारी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६६

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते,<br>दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जाणूनबुजून माहिती देण्याचे टाळल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची आणि अपिलार्थीच्या

मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा परिषद, नंदुरबार मधील प्राथमिक शिक्षकांची जातवार रिक्त पदे, जिल्हा बदली, कर्मचा-यांच्या बदल्या करणे, पतीपत्नी एकत्रिकरण व इतर स्वरुपाची दिनांक ०१-०१-२००७ ते ०३-१०-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस काही माहिती दिली, तथापि ही माहिती प्राप्त होण्याच्या आधीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे

आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६७

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, : अपिलार्थी
सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा रजिस्ट्रार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे आणि संबंधितांकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली गेली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची माहिती कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी कोणत्या कायदेशीर तरतुदी व नियमानुसार अपिलार्थीचा पगार आणि पेन्शन बंद केली, याची माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस काही माहिती पुरविली आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या कक्षेत येत नसल्याने अपिलार्थीचा अर्ज निकाली काढल्याचे अपिलार्थीस कळविले. प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झ ालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा रजिस्ट्रार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६८

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. गोपाळ विश्वनाथ डाके,<br>व्दारा, ॲड अनिलराव मोगरकर, सन्मित्र कॉलनी, खंडोबा मैदान, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

' रे. दी मुकदमा नंबर 162/79 गोविंद वि. गंगुबाई ही फाईल (TNC/2002/अ) अन्वये कुळ आहे किंवा नाही हे ठरवून निर्णय कळवावा म्हणून पत्रक क्र. 507/1988 ता 25/10/88 रोजी पाठवले. त्या प्रकरणात काय झाले याची माहिती हवी आहे. '

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नोत्तराच्या स्वरुपात मागितली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे दिनांक १४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, दिवाणी न्यायाधीश, माजलगांव श्री. के. आर. बुधवंत यांनी तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे, अपिलार्थीच्या कूळ प्रकरणासंदर्भात ' प्रतिवादी क्रमांक ३ व ४ हे सर्वे नंबर २६ च्या भूखंडाचे कूळ आहेत काय ? ' या प्रश्नावर अभिप्राय मागितले होते. तथापि तहसीलदार, माजलगांव यांनी या प्रकरणावर पुढे काय कार्यवाही केली याची अद्यापपावेतो न्यायालयास माहिती नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, त्यांना माहिती न देण्यासाठी दिलेले

कारण हे पूर्णतः चुकीचे आहे. मूळात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नोत्तराच्या स्वरुपात कोणतीही माहिती मागितलेली नाही. अपिलार्थीने मा. न्यायालयाने त्यांच्या दिनांक २५-०८-१९८८ रोजी पाठविलेल्या पत्रावर तहसीलदार, माजलगांव यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे या प्रकरणी तहसीलदार, माजलगांव यांनी मा. न्यायालयाच्या दिनांक २५-०८-१९८८ च्या पत्रानंतर दिनांक १७-१०-२००८ या कालावधीपर्यंत सर्व संबंधित प्राधिकरणाशी या विषयासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि या प्रकरणाशी संबंधित अभिलेख्याच्या टिपण्याच्या प्रती अपिलार्थीस देणे भाग आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत माहिती मागितली असताना देखील या प्रकरणी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीस चुकीचा प्रतिसाद देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोपाळ विश्वनाथ डाके, व्दारा, ॲड अनिलराव मोगरकर, सन्मित्र कॉलनी, खंडोबा मैदान, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९७

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

१ श्री. सानप अंकुश साहेबराव, : अपिलार्थी
प्लॉट क्रमांक १७६, शास्त्रीनगर, हेडगेवार हॉस्पिटलच्या
मागे, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग
क्रमांक ३, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने विचाराधीन अपील त्यांनी आयोगाकडे सादर केले आहे व त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दिनांक २९-०५-२००९ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांच्याकडे, खडकी पाझर तलाव क्रमांक १, तालुका गेवराई या कामासंदर्भात जानेवारी २००३ ते मार्च २००९ या कालावधीशी संबधित काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड यांनी त्यांच्या दिनांक १६-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कार्यकारी अभियंता, बीड पाटबंधारे विभाग, बीड यांच्याकडे पाठविला व अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, म्हणून अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील उपविभागीय अधिकारी यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली व त्या चर्चेचे इतिवृत्त त्यांनी दिनांक २९-०५-२००९ रोजी जारी केले. या इतिवृत्ताच्या विरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

या इतिवृत्ताचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांनी कोणतीही सुनावणी घेतली नसून त्यांच्या सहायकाने अपिलार्थीशी चर्चा केली आणि त्या चर्चेचे इतिवृत्त प्रथम अपील अर्जावरील निर्णय म्हणून अपिलार्थीस दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सहायकाची अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ते सक्षम प्राधिकरण नसल्याने अशा प्रकारचे आदेश देण्याची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०५-२००९ रोजी प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड किंवा आता नियुक्त केलेले जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड अथवा या प्रकरणाशी संबंधित सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०५-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०५-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सानप अंकुश साहेबराव, प्लॉट क्रमांक १७६, शास्त्रीनगर, हेडगेवार हॉस्पिटलच्या-मागे, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२१

निर्णय दिनांक ०१-०४-२०१०

१ श्री. अर्जून गंगाराम कांडुरे, : अपिलार्थी
रा. अंगलगाव, पो. अंबरवाडी, तालुका जिंतूर,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा कृषि अधिकारी, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले व आयोगास दिनांक ०४-०३-२०१० रोजी प्राप्त झालेले अपिलार्थीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेली माहिती तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांनी समक्ष दाखविली असून, ही माहिती पाहून त्यांचे पूर्णपणे समाधान झाले आहे, त्यामुळे विचाराधीन अपील क्रमांक २२२१/२००८ हे मागे घेण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांची जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे देखील लिहून दिले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी आयोगास उद्देशून लिहिलेल्या वरील पत्रामध्ये विचाराधीन अपील मागे घेण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने आयोगास केलेली विनंती जरी चुकीची असली तरी, या पत्रातील एकंदर मजकुरावरुन अपिलार्थीस आयोगाकडून, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले अपील क्रमांक २२२१/२००८ मागे घेण्याची त्यांना आयोगाची परवानगी हवी असावी, असा निष्कर्ष काढण्यास हरकत नसावी. खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील आता मागे घेण्याची तयारी दर्शविल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अर्जून गंगाराम कांडुरे, रा. अंगलगाव, पो. अंबरवाडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४०
निर्णय दिनांक : ०५.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती शकुंतला गणपतराव पवार,<br>रा. औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक,
सहायक धर्मादाय आयुक्त
कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न कळविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांचा वेतननिश्चितीचा फरक मिळण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०३.१९९१ रोजी केलेल्या अर्जावर आणि त्यानंतर दि. ०६.०५.९१, १०.१०.९१, ११.०१.९३, २०.०२.९८ च्या स्मरणपत्रावर, जन माहिती अधिकारी यांनी का कार्यवाही केली नाही, अशी माहिती

मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जाबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली असून अर्ज लवकरात लवकर निकाली काढण्यात येईल, असे अपिलार्थीस कळवून, अपिलार्थीकडून पंधरा दिवसांची मुदतवाढ मागून घेतली. तथापि या नंतरच्या कालावधीतही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. २५.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. अपिलार्थीचे अपील फेटाळताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थीने विहित कालावधी संपुष्टात आल्यानंतर केले असल्याच्या प्रथम व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याच्या दुसऱ्या कारणास्तव अंतिमतः अपिलार्थीचे अपील त्यांनी फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीची सेवापुस्तिका त्यांच्या कार्यालयात बराच शोध घेऊनही सापडली नाही. त्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या वेतनातील फरकासंदर्भात वेतननिश्चिती अद्यापपावेतो करता आली नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे, इतपतच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे मागणे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीचे समर्थन करणारे खुलासे/स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा,समावेश नाही. त्यामुळे मूळात या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीनंतर प्रथम अपील केले असल्याच्या कारणास्तव (अपील फेटाळण्यासाठी दिलेल्या दोन कारणांपैकी एक कारण)अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास जर तीस दिवसांच्या आत कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही तर नंतरच्या तीस दिवसांतच अर्जदारास जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करणे अनुज्ञेय आहे. अशाप्रकारे अर्जदाराने मूळ अर्ज केल्यानंतर प्रथम अपील करण्याकरिता

अर्जदारास पहिल्या तीस दिवसांनंतर ते अर्ज करण्याच्या दिनांकापासून ६० व्या दिवसापर्यंत प्रथम अपील करण्याची मुभा असते. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,औरंगाबाद यांच्याकडे विहित मुदतीत प्रथम अपील केले आहे, हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात कोणतीही माहिती देय होत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती शकुंतला गणपतराव पवार,'निशिगंध', संत एकनाथ नाटयमंदिराच्या बाजूला, न्यू उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५४
निर्णय दिनांक : ०५.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>रा. पूर्णा, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,जि.हिंगोली. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माहे एप्रिल, २००५ ते डिसेंबर, २००६ या कालावधीमध्ये पूर्णा तालुक्यातील बरबडी मायनरच्या केलेल्या कामाच्या मोजमापपुस्तिकेची सत्यप्रत अशी माहिती नोंदणीकृत टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यानंतरच्या कालावधीत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांनी दि. १५.०३.२०१० रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अंतिमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १५.०३.२०१० रोजी प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीच्या दर्जावर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा त्यांनी त्यांचे लेखी अभिप्राय देखील आयोगास कळविलेले नाहीत. यावरुन अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १५.०३.२०१० रोजी प्राप्त

झाल्याचे व ती समाधानकारक असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीस जरी त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असली तरीही, जी माहिती अपिलार्थीस दि. ३०.०८.२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे, अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत आहे, ती माहिती अपिलार्थीस या प्रकरणी प्रत्यक्षात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीनंतर सुमारे दोन वर्षे,सहा महिने आणि पंधरा दिवस इतक्या विलंबाने प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. सदर विलंब नजरेआड करण्यासारखा खचितच नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती मूळात विहित कालावधीत न देऊन, अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न देणे व अंतिमत: आयोगाकडील द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस देणे, अशाप्रकारच्या आपल्या कृतीद्वारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरवले आहे.सबब सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री. जी.व्ही.व्यवहारे व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक - सर्व संबंधित उपअभियंता व कनिष्ठ अभियंता,ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) नुसार 'माहिती अधिकारी' असे समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री. जी.व्ही.व्यवहारे व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक - सर्व संबंधित उपअभियंता व कनिष्ठ अभियंता या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली,पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५५
निर्णय दिनांक : ०५.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. निळकंठ भिवनाजी राऊत,<br>रा.तळणी, ता.हदगाव,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,हदगाव,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, हदगाव,<br>जिल्हा नांदेड. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जाणीवपूर्वक सुनावणीसाठीचे पत्र त्यांना उशिरा पाठवून, त्यांची दिशाभूल करुन अपूर्ण स्वरुपाची माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी यांनी केलेल्या चौकशी व कार्यवाही अहवालाच्या प्रतीच्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे तळणी, ता. हदगाव, जि. नांदेड येथील घर क्र. १०८८ च्या खुल्या जागेवर, केल्या गेलेल्या अतिक्रमणासंदर्भात काही माहिती टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या आदेशानुसार गट

विकास अधिकारी यांनी चौकशी केली आहे का? चौकशी केली असल्यास कोणत्या तारखेला चौकशी केली? घ.नं.१०८८ च्या खुल्या जागेवर संबंधितांना अतिक्रमण करण्यास प्रवृत्त करणारे कोण आहे? तो जर आपला कर्मचारी असेल तर गट विकास अधिकारी यांच्याकडून त्यांच्याविरुध्द काय कार्यवाही होईल? या विषयाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी यांनी केलेली चौकशी व कार्यवाही अहवालाची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हदगाव यांच्याकडे दि. ०४.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेले अतिक्रमण वैयक्तिक स्वरुपाचे असल्यामुळे सदर अतिक्रमण अपिलार्थीने त्यांच्या स्तरावर काढून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, 'गट विकास अधिकारी यांचा मौ. तळणी, ता.हदगाव येथील घ.क्र.१०८८ च्या मोकळया जागेवर झालेल्या अतिक्रमणाच्या चौकशीचा अहवाल आणि चौकशीचा दिनांक', ही माहिती वगळता, उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

कारण या सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांची स्पष्टीकरणे व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे जी, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकाऱ्यास त्यांच्या शंका विचारणे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरणे अथवा खुलासे मागणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदाराच्या शंकांचे निरसन करणे, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात स्पष्टीकरण देणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा यामध्ये समावेश नाही. त्यामुळे वर उल्लेखिल्याप्रमाणे गट विकास अधिकाऱ्याने चौकशी,केली असल्यास चौकशीचा दिनांक, चौकशी अहवालाच्या प्रती व चौकशी केली नसल्यास त्याप्रमाणे, अशी माहिती वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस, गट विकास अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित केलेली 'चौकशी व त्याचा अहवाल', ही माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर

अधिनियमातील कलम २०(२) मधील तरतुदीनुसार प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निळकंठ भिवनाजी राऊत,रा.तळणी, ता.हदगाव,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हदगाव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३८

निर्णय दिनांक ०५-०४-२०१०

१ श्री. अब्दूल रऊफ अब्दूल करीम, : अपिलार्थी

रा. सब्जी मंडी, खोकडपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपअभियंता, नगररचना-१, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपअभियंता, नगररचना-१, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील नगर भूमापन क्रमांक १४१५२ वर केलेल्या बांधकामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"नगर भूमापन क्रमांक १४१५२ मो. सब्जी मंडी या जागेवर बांधकाम परवानगी न घेताच बांधकाम करण्यात आलेले आहे जे की गैर कानुनी आहे. या जागेवरिल परवानगी न घेता केलेले बांधकाम आपण का? पाडत नाही आहात"

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २३-०३-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास उद्देशून पाठविलेले त्यांचे दिनांक ०१-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची नोंद त्यांच्या कार्यालयात आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर दर्शविलेली स्वाक्षरी आणि सिल हे नगर रचना विभागाचे नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही, असे त्यांना आयोगास सूचित करावयाचे आहे, असे दिसून येते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेला लेखी युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीच्या या अर्जाद्वारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून नगर भूमापन क्रमांक १४१५२ वर झालेले विना परवानगी बांधकाम ते का पाडत नाहीत याचा खुलासा अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास विचारलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्याच स्थितीत ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कोणत्याही कृतीचे स्पष्टीकरण अथवा खुलासे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत देणे ही प्रक्रिया मूळात माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **(वि. बा. बोरगे)**

**दिनांक ०५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दूल रऊफ अब्दूल करीम, सब्जी मंडी, खोकडपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता नगररचना-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता नगररचना-१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३९

निर्णय दिनांक ०५-०४-२०१०

१ श्री. रामकिशन भाऊराव क्षिरसागर, : अपिलार्थी
मु. पारवा, पो. शेख राजूर, ता. पालम, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपुरी माहिती दिल्यामुळे व तहसील कार्यालय पालम हे त्यांना कोऱ्या कागदावर सही मागत असल्याने आणि जर ती सही अपिलार्थीने दिली नाही तर त्यांना अनुदानापासून वंचित करतो अशा भाषेचा वापर केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे पारवा, तालुका पालम येथील दिनांक ०१-०१-२००७ ते ३१-१२-२००८ या कालावधीतील निराधार, वयवर्ध व श्रावणबाळ, अपंग लोकांची नावासहीत यादी,

बँकेस पाठविलेल्या या योजनेशी संबंधीत लाभार्थ्यांची यादी, एकास कमी व दुसऱ्यास जास्त अशी रक्कम पाठविण्याचे कारण व या लाभार्थींना कोणत्या महिन्यात किती रक्कम पाठविली याचा लाभार्थीनिहाय तपशील, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १०-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही संपूर्ण माहिती न मिळाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे कारण दर्शवून अपील केले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती मिळाली नाही, हे अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही अथवा ते तोंडी स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या मुद्यावर माहिती देणे बाकी आहे, हे आयोगासही कळण्यास मार्ग नाही. अशा परिस्थितीत

अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामकिशन भाऊराव क्षिरसागर, मु. पारवा, पो. शेख राजूर, ता.पालम, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९९

निर्णय दिनांक ०५-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. धोंडीराम अण्णासाहेब देशमुख,<br>देहडकरवाडी, जुना जालना | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार म. (२), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न पुरविल्याबद्दल, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे व यासंदर्भात कोणतेही आदेश पारीत न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे पापळ, कचनेर, टेंभुर्णी, अकोला, खानापूर येथील तलावांकरिता संपादीत केलेल्या जमिनीचे सातबारे, गट नंबर, संपादीत जमिनीचे क्षेत्र व शासनाच्या नावे घेतलेल्या नोंदीसह सातबारे मिळण्याबाबत, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जाफ्राबाद यांच्याकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले, तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी या प्रकरणाशी संबंधित माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे केला होता त्यावेळी श्री. पुंडे नावाचे नायब तहसीलदार जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. ते डिसेंबर २००९ मध्ये नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्या आता अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत व ती

माहिती त्यांनी बरोबर आणली आहे. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज तहसील कार्यालयास प्राप्त झालेला नाही, त्यामुळे त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय होऊ शकला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे अपिलार्थीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिनांक ०८-०३-२००९ रोजी अगर तत्पूर्वी देणे त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे तसाच विनाकार्यवाही ठेऊन दिला. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द होत आहे, तथापि ते आता नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती बरोबर आणली आहे व ही माहिती त्या अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. धोंडीराम अण्णासाहेब देशमुख, देहडकरवाडी, जुना जालना.

२	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार म. (२), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५६

निर्णय दिनांक ०५-०४-२०१०

१ श्री. अजय अर्जूनराव पाटील, : अपिलार्थी
व्दारा, ॲड अजित एम. देशमुख,
गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक (साखर), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र
राज्य, साखर संकूल, शिवाजीनगर, पुणे - ०५

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्यात यावी व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष नृसिंह सहकारी साखर कारखाना मर्यादित, लोहगांव, तालुका जिल्हा परभणी, विठ्ठल सहकारी साखर कारखाना मर्यादित, मुरुम तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना मर्यादित, केशेगांव, तालुका जिल्हा उस्मानाबाद, नरसिंह सहकारी साखर कारखाना मर्यादित, इंदापूर, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद या कारखान्यांच्या, जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या संदर्भात, एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस काही माहिती दिली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (साखर), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती दिनांक ११-०८-२००८ रोजी पुरविली आहे. जन अपिलीय

अधिकारी यांचा दिनांक २०-१०-२००८ रोजीचा निर्णय त्यांना दिनांक २२-०३-२०१० रोजी प्राप्त झाला. या निर्णयानंतर त्यांनी सुनावणी ठेवली होती. सुनावणीच्या वेळी काही कारखान्यांचे प्रतिनिधी हजर होते. त्यांनी अधिनियमातील तरतूदी त्यांना लागू नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून, नियमांचे उल्लंघन करणा-या कारखान्यांवर प्रादेशिक सह संचालकांनी कोणती कार्यवाही केली, ही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०८-२००८ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ पूर्णतः व मुद्दा क्रमांक ४ मधील " ....... पत्रव्यवहार केला काय ? या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही कारण अशा प्रकारच्या माहितीचा अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याप्तीमध्ये समावेश नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण व खुलासा करणे अशा प्रकारच्या प्रक्रिया, समाविष्ट नाहीत. मात्र यातील मुद्दा क्रमांक ४ मधील उर्वरित भाग " पत्रव्यवहाराच्या प्रती " या भागाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-०८-२००८ च्या पत्राव्दारे पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस ' मुद्दा क्रमांक २

प्रमाणे ' अशी माहिती दिली आहे, जी सर्वथा चुकीची आहे. मुद्दा क्रमांक २ मध्ये, जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस ' चौकशी अहवाल / उत्तरे प्राप्त झालेले नाहीत ' अशी माहिती दिली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या संबंधित साखर कारखान्यांवर कोणतीही चौकशी केली नसेल अथवा चालू असेल तर, त्यांनी या चौकशीची सद्यस्थिती अपिलार्थीस कळविणे भाग आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने या साखर कारखान्याच्या लेखा परीक्षण अहवालाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०८-२००८ रोजी उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, विशेष लेखा परीक्षक यांच्याकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही, परिणामी अपिलार्थी हे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ शी संबंधित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ शी संबंधित, उर्वरित माहिती अपिलार्थीस देणे भाग आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. याकरिता आवश्यकता वाटल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८९ (अ) चा वापर करावा, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१०-२००८ रोजी दिलेला निर्णय जन माहिती अधिकारी यांना दिनांक २२-०३-२०१० रोजी प्राप्त झाला आहे. या विलंबाबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील संबंधित जबाबदार कर्मचा-यावर, तातडीने प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजय अर्जूनराव पाटील, व्दारा, ॲड अजित एम. देशमुख, गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (साखर), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

साखर संकूल, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३२
निर्णय दिनांक : ०६.०४.२०१०

१. श्री. आर.के.आटुळे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता तथा अध्यक्ष,
परिमंडळीय समिती,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण १२ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०१.२००९

रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०३.१२.२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. परंतु त्यांच्या या युक्तिवादापृष्ठयर्थ त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये यासंदर्भात कोणतेही लेखी स्पष्टीकरण अथवा सबळ पुरावा जोडलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने कशाप्रकारे दिशाभूल झाली आणि अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या मुद्यावरील माहिती मिळणे बाकी आहे, याचा आयोगास बोध होत नाही. परिणामी आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आर.के.आटुळे,सुमंगल विहार, गारखेडा रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता तथा अध्यक्ष,परिमंडळीय समिती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४६
निर्णय दिनांक : ०६.०४.२०१०

१. श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले, : अपिलार्थी
रा. लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय,लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगररचनाकार, नगरपरिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकाम परवानगीसंदर्भात दि. ०१.०१.२००८ ते २८.०२.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कलम ५३ नुसार दिलेल्या नोटीसची मुदत संपल्यानंतर नगरपरिषद किती दिवसात स्वतः अनधिकृत बांधकाम पाडून टाकते, कापड गल्लीतील घ.नं.६/६६६ चे मालक श्री. नानीक दयालदास जोधवाणी यांनी केलेल्या जास्तीचे बांधकाम किती स्क्वेअर मिटर आहे, त्या अतिक्रमित बांधकामाबाबत कलम ५३ नुसार नोटीस केव्हा देण्यात येईल व या प्लॉटच्या बाजूला क्र. ६/६६७-१ या जागेच्या

बांधकामाच्या परवानगीची व नकाशाची प्रत- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीच्या मूद्दा क्र. ४ च्या संदर्भातील माहिती सात दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहितीकरिता अपिलार्थीस वेगळा अर्ज करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांनी या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी आणि मुख्याधिकारी जाणीवपूर्वक टाळत आहेत. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली उत्तरे निश्चित नसून ती गुळमुळीत स्वरुपाची आहेत. त्यांना माहिती न दिल्याबद्दल त्यांनी मुख्याधिकारी याच्याकडे माहिती अधिकाऱ्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मागणी केली होती, परंतु मुख्याधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही शिक्षा न करता, सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे फर्मावले. जन माहिती अधिकारी व मुख्याधिकारी हे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले अनधिकृत बांधकाम

वाचविण्यासाठी अपिलार्थीस कोणतीही माहिती देत नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांवरही दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई करावी व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०२.०३.२००९ रोजी व दि. ०५.०४.२००९ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य पाठविली आहे. या संदर्भात आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केला आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे, त्रयस्थ पक्ष श्री. नानीक दयालदास जोधवानी यांनी घ.नं. ६/६६६ वर केलेल्या जादाच्या बांधकामाचे परिमाण विचारले होते. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०५.०४.२००९ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविल्याचे जन माहिती अधिकारी आयोगास सांगत आहेत. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. हीच बाब अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातही लागू होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ मध्ये, लातूर नगरपरिषदेतील घ.क्र. ६/६६७-१ या जागेच्या बांधकामाच्या परवानगीची व नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याऐवजी उलट त्यांनी मालमत्ताधारकाचे नाव अपिलार्थीस विचारले. जन माहिती अधिकाऱ्यास नगरपरिषद हद्दीतील एखाद्या घराचा क्रमांक कळविल्यानंतर, त्या घराच्या बांधकामाचा संदर्भ नगरपरिषदेतील संबंधितांना त्यांच्याकडील अभिलेख्यावरुन सहज मिळणे निश्चितपणे शक्य आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळण्याकरिता संबंधित जन

माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीकडे या मालमत्ता धारकाच्या नावाची विचारणा केली. जन माहिती अधिकारी यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात टाळाटाळ करणारी प्रवृत्ती स्पष्ट करते, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे व मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील घर नं. ६/६६६ चे कथित अनधिकृत बांधकाम कधी पाडण्यात येईल, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे देय नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ मधील घर क्र. ६/६६६ चे केलेले जादाचे बांधकाम आणि घर क्र. ६/६६७-१ या बांधकामाची परवानगी व नकाशाची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाच्या मालकीच्या बांधकामासंदर्भातील असली तरी त्यांनी मागणी केलेली माहिती ही, सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ करुन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संचालक (न.प.प्र.) मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ मधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य आणि व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संचालक (न.प.प्र.) मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश व्यंकटराव बुलबुले,२३/७२,कापड लाईन,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक,नगर परिषद संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस,वरळी,मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४७
निर्णय दिनांक : ०६.०४.२०१०

१. श्री. राजेश बाळासाहेब गुरव, : अपिलार्थी
रा. जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जलस्वराज्य प्रकल्प विभाग,
जिल्हा परिषद, जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जलस्वराज्य प्रकल्पाच्या शासकीय माहिती अधिकाऱ्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये शासकीय माहिती अधिकारी,जलस्वराज्य प्रकल्प,जिल्हा परिषद,जालना यांच्याकडे, मानेगाव (ज) व गणेशपूर या गावांना जलस्वराज्य योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी, पाझर विहिर खोदकाम, अंडरग्राऊंड बंधारा, रायझिंग मेन, उंच पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था,पंप हाऊस,गावातील सहल खर्च,सार्वजनिक संस्थेचे मानधन, पाणी पुरवठा योजनेतील कामे, तांत्रिक सेवा पुरवठादार या सर्व कामांवर झालेला खर्च व त्या खर्चाचे कंपनीच्या बीलाची छायांकित प्रत व पूर्ण झालेल्या कामाची संख्या व शिल्लक कामांची संख्या, बाकी असलेली कामे

कोणत्या कारणामुळे बाकी आहेत? अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी एप्रिल,२००५ ते दि. २६.०१.२००९ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास अध्यक्ष व सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, मानेगाव,ता. जालना यांनी त्यांच्याकडील दि.०९.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५००/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा महाराष्ट्र गोदावरी ग्रामीण बँक, रामनगर येथे दि. २६.०२.२००९ रोजी केला. या नंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे यासंदर्भात अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर दि. ०२.०५.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य केले व अध्यक्ष/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मानेगाव यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, नियमाप्रमाणे तात्काळ देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झ ााल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले व अद्यापपावेतो त्यांना संबंधित पाणीपुरवठा समितीकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे आयोगास स्पष्ट केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्रथमतः अध्यक्ष/सचिव, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झाला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कोणाही अर्जदारास सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित माहितीची मागणी करता येते. हे आदेश फक्त सार्वजनिक प्राधिकरणांनाच लागू आहेत. अधिनियमातील कलम २(ज) मध्ये 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

"सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ,-

(क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये;

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

(ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय ;

(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना,"

या प्रकरणी अपिलार्थीने ज्या समितीकडून माहिती अपेक्षिली आहे, ती समिती, वरील व्याख्येतील कोणत्याही अटी अथवा निकष पूर्ण करीत नाही, कारण जलस्वराज्य प्रकल्पामध्ये पाणीपुरवठयाची कामे करीत असताना, ही कामे सर्व ग्रामस्थांमधून निवडल्या गेलेल्या एका खाजगी व्यक्तींच्या समितीमार्फत पार पाडणे, असे या योजनेमध्ये अभिप्रेत आहे. शासनाच्या इतर योजनांसारखी या योजनेची अंमलबजावणी करणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने ज्या समितीकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती मागविली आहे, ती समिती कोणत्याही कायद्याद्वारे अथवा संविधानाद्वारे किंवा विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अथवा अधिसूचनेद्वारे स्थापन करण्यात आलेली नाही. परिणामी अपिलार्थीने ज्या

प्राधिकरणाकडे माहिती मागविली आहे, ती समितीच मूळात माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज)मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येबाहेरची असल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्जच या प्रकरणी अवैध ठरत आहे. परिणामी अपिलार्थीस संबंधित समितीकडून कोणतीही माहिती देय होत नाही. मात्र अपिलार्थीने ही माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे मागणी केल्यास ही माहिती त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकेल.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, या समितीने अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५००/- इतके वसूल केले आहे. समितीची अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क जमा करण्याचे सूचित करण्याची कृती ही सर्वथा अवैध व गैर आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, विचाराधीन प्रकरणाशी संबंधित समितीने अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ५००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांनी या प्रकरणाशी संबंधित समितीने अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.५००/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करण्याची व्यवस्था करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेश बाळासाहेब गुरव,रा.बजरंग दालमिल, रुक्मणी गार्डनसमोर,जालना

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार

## अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४८
निर्णय दिनांक : ०६.०४.२०१०

१. श्री. रामकृष्ण त्र्यंबकराव पाटील, : अपिलार्थी
रा.वजिरखेडा, ता.भोकरदन, जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सत्यशोधक माध्यमिक विद्यालयातील कर्मचाऱ्यांचे ॲप्रुव्हल विनाअनुदान तत्त्वावर झाले असताना त्यांना जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून वेतन दिले जाते. माझे त्यांच्यासारखेच विनाअनुदान तत्त्वावर ॲप्रुव्हल झाले असताना मला जिल्हा परिषद,माध्यमिक शिक्षण विभागाकडून वेतन का मिळत नाही", अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी डिसेंबर, २००६ ते जानेवारी, २००९ असा होता. अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे यासंदर्भात दि.०६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि. २८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः माहिती दिली असून अपिलार्थीने मागणी केलेली हीच माहिती त्यांनी दि. ०५.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस परत पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीन प्रथमतः त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना वेतन मंजूर न करण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या कृतीचे कारण त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विचारले आहे. अपिलार्थीने माहितीसाठीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपामध्ये ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याइतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या एखाद्या कृतीचे अथवा निर्णयाचे स्पष्टीकरण आणि खुलासा अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणे

आणि असा खुलासा अथवा कृतीचे समर्थन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास करणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समावेश नाही. त्यामुळे ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्ती बाहेरची असल्याचे सिध्द होत असल्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज या प्रकरणी अवैध असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील वेतन पथकाने अपिलार्थीस त्यांच्या वेतनासंदर्भात आवश्यक तो खुलासा त्यांच्या दि. ०५.०२.२००९ रोजीच्या पत्रामध्ये केला आहे. सदर खुलासा आयोगास योग्य वाटतो. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामकृष्ण त्र्यंबकराव पाटील, रा.वजिरखेडा,पो.पिंपळगाव(को.) ता.भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३८
निर्णय दिनांक : ०६.०४.२०१०

१. श्री. रमाकांत मारोती जाधव, : अपिलार्थी
रा.जांब बु.,ता.मुखेड,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,मुखेड,जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौ. जांब बु.,ता.मुखेड येथील सेवा सहकारी सोसायटीच्या स्वस्त धान्य दुकानासंदर्भात आणि त्रयस्थ पक्ष श्री. गणपत लक्ष्मण बने यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०३.११.२००८ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सदर स्वस्त धान्य दुकान सध्या कोणाच्या नावाने चालविण्यास

देण्यात आले आहे? सध्या ते कोठे चालू आहे, कार्यालयात की दुसरीकडे कोण चालवित आहे, सर्व मालाच्या विक्रीचे दर व दि. ०१.११.२००८ व ०३.११.२००८ रोजी श्री. गणपत लक्ष्मण बने यांनी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,मुखेड यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनीही अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची उपेक्षा करुन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही न केल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस या प्रकरणी कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत. तथापि आयोगाकडील सुनावणीच्या नोटीससोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची झेरॉक्स प्रत त्यांना प्राप्त झाली असून, ही माहिती ते अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी प्रामुख्याने तत्कालीन तहसीलदार,मुखेड श्री. जाधव हे जबाबदार आहेत. या प्रकरणी जर त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत सुनावणी घेतली असती तर, अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांच्या स्तरावरच यापूर्वीच प्राप्त होऊन कदाचित, अपिलार्थीस आयोगाकडे

द्वितीय अपील करण्याची गरजही पडली नसती. या प्रकरणी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या केलेल्या उपेक्षेमुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहावे लागले आहे. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,श्री. जाधव यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद सचिव (महसूल) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या दि. २९.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दि. २९.१२.२००८ रोजीचा सदर अर्ज तहसीलदार,मुखेड यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. तथापि तो जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांना प्राप्त झाला नाही, त्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज गहाळ झाल्याप्रकरणी तहसीलदार,मुखेड यांनी त्यांच्या कार्यालयातील संबंधितांच्यावर जबाबदारी निश्चित करुन आवश्यकतेप्रमाणे त्यांच्यावर प्रशासकीय अथवा फौजदारी कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस मुद्देनिहाय, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमाकांत मारोती जाधव,रा.जांब बु.,ता.मुखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४१

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुधीर प्रभाकर पवार,<br>रा. घर नं. १२९७, मिशन कंपाऊन्ड, छावणी, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>आगार प्रमुख (वरिष्ठ), राज्य परिवहन औरंगाबाद,<br>आगार क्र. २, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, राज्य परिवहन,<br>विभागीय कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेमध्ये त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे 'अपराध क्रमांक १०६/०८' या विषयासंदर्भात व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने त्याच दिवशी या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयामध्ये केला. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुधीर प्रभाकर पवार, घर नं. १२९७, मिशन कंपाऊन्ड, छावणी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख (वरिष्ठ), राज्य परिवहन औरंगाबाद, आगार क्र. २, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४२
निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश रमेश पाटील,<br>जी-१/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर,<br>उस्मानपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : | जन माहिती अधिकारी | : | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | | त्रयस्थ पक्ष | : | प्र. मुख्याध्यापक, श्रीमती खान एफ.बी. |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०६-०४-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक ९४२/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ९४२/२००९, दिनांक २१-०५-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश रमेश पाटील, जी-१/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४३

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

१ श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे, : अपिलार्थी

रा. कांवदी गल्ली, अंबड, ता. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक (उत्तर), जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही व तसेच अपिलीय अधिकाऱ्याने माहिती देण्याचे आदेश देऊनही त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत झालेल्या रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाचे नाव, कामावर झालेला एकूण खर्च, मजुराच्या हजेरीपत्रकाच्या छायांकित प्रती, त्यांच्या

कार्यक्षेत्रात किती वने आहेत त्याची हेक्टरमध्ये यादी, कोणत्या वनात रोहयोची कोणकोणती कामे करण्यात आली त्याचा तपशील, अशी सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २२,०००/- इतके चलनाद्वारे बँकेत भरणा करुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांचे प्रमाणपत्र जोडले होते, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रथम सुनावणीच्या वेळी अपिलीय अधिकाऱ्यासमोर कबूल केल्याचे अपिलीय अधिकाऱ्याच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या निर्णयावरुन दिसून येत आहे. अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीनुसार दारिद्र्यरेषेखालील व्यक्तिंना जन माहिती अधिकारी यांनी

विनामूल्य माहिती देणे अभिप्रेत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे, कांवदी गल्ली, अंबड, ता. अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक (उत्तर), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४४

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

१ श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, : अपिलार्थी

रा. दाना बाजार, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, अंबड, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तालुका कृषि अधिकारी, अंबड, जि. जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध न करुन देता त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील माती नाला बंधाऱ्याच्या कामाशी संबंधीत मोजमापपुस्तिका व मस्टरच्या झेरॉक्स प्रतीची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या माहितीाठीच्या मूळ अर्जामध्ये, त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे याचा उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीशी या कालावधीची विचारणा केली.  जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४-०३-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००९ रोजी सुनावणी घेऊन, या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी जन माहिती अधिकारी यांना अवगत केला.  जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी माहिती देण्याचा निर्णय दिला तरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे ते अभिलेखे महसूल आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे एका विभागीय चौकशीच्या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत पाठविण्यात आली असल्याने, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्या गेलेल्या कालावधीमध्ये  जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविता आली नाही व परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीतील मस्टर क्रमांक १३०४, १३०५ व १३०६ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील आवश्यक ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०५-२००९ रोजी दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती दिल्याबाबतच्या पुराव्याची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी हे त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस फक्त १३०४, १३०५ व १३०६ या क्रमांकाच्या मस्टरच्या प्रती ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत, असा युक्तिवाद केला आहे. सदर मस्टरच्या प्रती विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या कार्यालयात विभागीय चौकशीसाठी त्यांनी सादर केल्या असल्याने या प्रती ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत, असे कारण त्यांनी अपिलार्थीस माहिती न देण्यापृष्ठ्यर्थ आयोगास दिले. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे, कारण ते आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती पुरविल्यापृष्ठ्यर्थ कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची प्रत विभागीय आयुक्ताकडे का पाठविली नाही, याचाही त्यांना समाधानकारक खुलासा आयोगास करता आला नाही. या एकूण वस्तुस्थितीवरुन

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे आयोग अनुमान काढत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देणे भाग आहे. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत, आवश्यक वाटल्यास, विभागीय आयुक्ताच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, ही माहिती संबंधितांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरा-यणतेच्या अभावाबद्दल कृषी सहसंचालक, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४५

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
रा. रियाज कॉलनी, शामनगर, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
क्रीडा उपसंचालक, विभागीय क्रीडा उपसंचालक कार्यालय,
लातूर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०८-०१-२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यानंतर त्यांना दिनांक ०७-०२-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी टपालाद्वारे माहिती पुरविणे आवश्यक होते. परंतु या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून वंचित ठेवल्यामुळे त्यांनी जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोनही अधिकाऱ्यांवर शास्तीची व दंडाची कार्यवाही करावी अशी आयोगास विनंती करुन, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लातूर रौप्य महोत्सवी वर्षात क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांच्या संदर्भात दिनांक ०१-०१-२००८ ते ०८-०१-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कार्यक्रमासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी व खर्च, कोणत्या खेळाच्या स्पर्धा आयोजित केल्या त्या स्पर्धेच्या खर्चाचा अहवाल व खर्च कोणत्या तारखेला झाला व प्राप्त झालेल्या निधीच्या खर्चाच्या सविस्तर पावत्या, स्पर्धेचे फोटो, खेळाडुंची यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीचा सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४५०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाचा संदर्भ दिनांक १३-०१-२००९ - ज्या दिवशी त्यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अर्ज प्राप्त झाला - त्या दिवसाचा दिला आहे. तथापि अपिलार्थीने दिनांक १३-०१-२००९ रोजी

अर्ज केला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा क्रीडा उपसंचालक, लातूर यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी आपले आदेश पारित करुन, अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची व दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. तथापि अपिलार्थीची ही विनंती जन अपिलीय अधिकारी यांनी मान्य न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक ०८-०१-२००९ रोजीचा अर्ज त्यांना दिनांक १३-०१-२००९ रोजी प्राप्त झाला. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीशी या अर्जासंदर्भात पत्रव्यवहार करताना पत्रव्यवहारामध्ये १३-०१-२००९ या दिनांकाचा उल्लेख केला. परंतु केवळ या तांत्रिक बाबीवर बोट ठेवून अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर दिनांक २७-०२-२००९ रोजी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची माहिती मिळाल्याची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००९

रोजी माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४५०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता त्यांच्या मूळ अर्जाच्या दिनांकातील फरकाच्या बाबी संदर्भात ते जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याशी अनावश्यक पत्रव्यवहार करीत राहिले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद देताना त्यांच्या मूळ अर्जाच्या दिनांकाचा उल्लेख अपिलार्थी यांच्याबरोबर केलेल्या पत्रव्यवहारात करणे त्यांना आवश्यक होते. तथापि त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे ज्या दिनांकास प्राप्त झाला त्याच दिनांकाचा मूळ संदर्भ घेऊन ते अपिलार्थीशी या विषयावर पत्रव्यवहार करीत राहिले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून घडलेल्या या तांत्रिक अनियमितता पाहता, त्यावरुन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळले किंवा अपिलार्थीपासून त्यांनी दुष्ट हेतूने माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची केलेली विनंती, आयोग अमान्य करीत आहे. आयोगाकडे द्वितीय अपील करताना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती प्राप्त झाली होती. तथापि त्यांना माहिती प्राप्त झाल्याचा कोणताही उल्लेख अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही किंवा प्राप्त माहितीवर अपिलार्थीने कोणतेही लेखी भाष्य त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये केले नाही.

यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याची बाब त्यांनी आयोगापासून दडवून ठेवल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याचे अपिलार्थीस कळविल्या-नंतरही अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीप्रमाणे करावयाची कार्यवाही अपिलार्थीने केली नाही. परंतु केवळ क्षुल्लक तांत्रिक उणीव दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विस्तृत व्याप्ती असलेली माहिती विनामूल्य अपेक्षित असावी, असे अनुमान आयोग काढत आहे. अपिलार्थीच्या अपेक्षेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी त्यांना आवश्यक ती माहिती देखिल पुरविली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, रियाज कॉलनी, शामनगर, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा संकुल, लातूर जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९४९

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, : अपिलार्थी
मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे गडगा येथे विना परवाना स्फोटके व रॉकेलचा साठा असल्या-बद्दल जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात

जन माहिती अधिकारी यांनी केलेला तपास अहवाल लेखी स्वरुपात व त्रयस्थ पक्ष सौ. शोभाबाई आनंदा तमवाड यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजी दिलेल्या लेखी अर्जानुसार या महिलेचे घर जाळणा-या आरोपीवर कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे काय ? या गुन्ह्याचा चौकशी अहवाल व वरिष्ठांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या लेखी प्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थी अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिला नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिकारानुसार मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप व विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी या टप्प्यावर सुनावणी घेऊन निर्णय देणे इष्ट राहील असे आयोगास वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. सुनावणीच्या वेळी त्यांनी अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी विचारात घ्याव्यात.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११००

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

१ श्री. देवराव बंडु पारधे, : अपिलार्थी
एन-७, बी-१, ९३, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप आयुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त
कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०३-२००९ रोजी त्यांचे अपील मान्य करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भित प्रकरणात त्यांना विलंब लावलेल्यांना शिक्षा करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' विआकाऔ/साप्र/भूसं/कक्ष-१/५२१, दिनांक २५-०६-२००१ ते ०१-१२-२००८ पर्यंतचा प्रवास व माझ्यासंबंधी उपरोक्त पत्र क्रमांक प्रवासाची व मुक्कामाची माहिती मिळणे, पत्र क्रमांक ५२१ दिनांक २५-०६-२००१ ते दिनांक ०१-१२-२००८ अर्जदार संबंधी वरील पत्र क्रमांकाचा प्रवास कोणकोणत्या टेबलावर कसा झाला आणि त्या विलंबास जबाबदार असणा-यावर कारवाई करावी. '

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसाधारण टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २९२ इतके त्यांना चलनाव्दारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व शुल्क प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे अपिलार्थीस आश्वासीत केले, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जासंदर्भात केलेल्या प्रकरणाचा थोडक्यात संक्षिप्त तपशील टंकलिखीत स्वरुपात प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावा असे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा संक्षिप्त तपशील त्यांना

दहा रुपये इतके शुल्क भरल्यानंतर देण्याचे आश्वासीत केले, तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. याउलट अपिलार्थीस त्यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा संपूर्ण तपशील कळवूनही, अपिलार्थीने त्यांच्याकडे संबंधित शुल्काचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथमतः योग्य तो प्रतिसाद देऊन, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २९२ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे बरोबर आहे, तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ती ज्या स्वरुपात

उपलब्ध आहे त्या स्वरुपात देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतकीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहितीकरिता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रुपये २९२ इतक्या शुल्काचा भरणा करणे त्यांना अनिवार्य होते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती नव्याने परत तयार करुन नंतर ती अर्जदारास देणे, अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही, त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अपिलार्थीस संक्षिप्त स्वरुपात माहिती तयार करुन नंतर ती अपिलार्थीस देण्याचा, त्यांचा निर्णय चुकीचा आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील माहिती आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २९२ इतके भरणे त्यांना अनिवार्य होते. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही त्यांच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संक्षिप्त स्वरुपात तयार करुन ठेवली व ती अपिलार्थीस दहा रुपये इतके शुल्क आकारुन देऊ केली, परंतु या टप्प्यावरही अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही दर्शविली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, ज्याप्रमाणे अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे, त्याप्रमाणे अधिनियमातील कलम ७ (५) नुसार, अर्जदाराने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे भरणे हे देखील त्यांचे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या हक्काची जाण झाली, परंतु त्यांच्या कर्तव्याचा अपिलार्थीस सोईस्कर विसर पडला व त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने,

अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देवराव बंडु पारधे, एन-७, बी-१, ९३, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५७

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

१ श्री. झाकणे पिराजी दशरथ, : अपिलार्थी
आर्वी गायरान, मेडीकल कॉलेजसमोर,
अंबाजोगाई रोड, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी,
तालुका जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०२-२०१० रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

' १. १२ वित्त आयोग योजना २००५-२००६.

२.	संपूर्ण रोजगार हमी योजना अंतर्गत सोमवंशीनगर येथील रस्ता.

३.	८ अ फाईल. '

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-१२-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीत त्यांनी कोणता निर्णय दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. उदा. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे त्यांनी, ' १२ वित्त आयोग योजना २००५-२००६ ' अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या मुद्दयावरुन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा कोणासही अर्थबोध होणे शक्य नाही, कारण या योजनेतंर्गत ग्रामपंचायतीला शासनाकडून वेगवेगळ्या कामांकरिता अनुदान प्राप्त होत असते. या अनुदानातून संबंधित ग्रामपंचायती आवश्यक ती विकासाची कामे पार पाडत असतात. यापैकी कोणत्या

कामाच्या संदर्भात व नेमकी कोणती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, हे समजून येत नाही. असाच प्रकार त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे त्यांनी मागितलेल्या माहितीबाबत झाला आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे, ' सोमवंशीनगर येथील रस्ता ' एवढीच बाब नमूद केली आहे. या रस्त्याच्या संदर्भात अपिलार्थीस नेमकी कोणत्या विशिष्ट मुद्दयावर माहिती हवी आहे याचा उल्लेख त्यांनी या अर्जामध्ये केलेला नाही, तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे त्यांनी ' ८ अ फाईल ' अशी माहिती मागितली आहे, ही माहिती देखील पहिल्या दोन मुद्दयावरील माहितीप्रमाणे मोघम असल्याचे आयोगास आढळून येत आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे हे की, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. या व्यतिरिक्त अपिलार्थीने १२ वित्त आयोग योजनेंतर्गत झालेल्या कामाचा तपशील व शासनाकडून आलेली रक्कम या मुद्दयावरही माहिती मागितली आहे. बाराव्या वित्त आयोगाकडून ग्रामपंचायतींना दरवर्षी नियमीत अनुदान दिले जाते आणि त्यामुळे अपिलार्थीस नेमकी कोणत्या वर्षाच्या अनुदानाची माहिती हवी आहे याचाही बोध या मुद्दयावरुन होत नाही. थोडक्यात, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हीच मूळात त्यांनी, मोघम स्वरुपात मागितली असल्याने, अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. झाकणे पिराजी दशरथ, आर्वी गायरान, मेडीकल कॉलेलसमोर, अंबाजोगाई रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५८

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख सय्यद शेख कडुमियाँ,<br>मु. पो. तळनेवाडी, तालुका गेवराई,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार / उपविभागीय अधिकारी, तहसील<br>कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळीच माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस दिलेल्या नोटिशीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. शेख कडूमिया शे. पापामियॉ यांना दि. २०-१२-७६ रोजी (म. जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २० (२) अन्वये नोटीस आणि कलम २२७, २२८ अन्वये समन्स) देण्यात आली होती. त्यासंदर्भात मा. तहसीलदार यांनी काय निर्णय घेतला ? किंवा झाला ?

२. महाराष्ट्र राज्य महसूल परीपत्रक क्रमांक ३/७/ब/१/११/१९९५. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविला होता. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक ०७-०८-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरुन दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गेवराई यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १६-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २०-०९-२००८ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे, तथापि अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त होऊनही संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी हे त्यांच्या वकिलासह हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा केलेला अर्ज त्यांना प्राप्त झाला असूनही त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीचे दिनांक १६-०९-२००८ रोजीचे प्रथम अपील त्यांना प्राप्त होऊनही त्यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. तहसीलदार, गेवराई व उपविभागीय अधिकारी, गेवराई यांच्या अशा प्रकारच्या निष्क्रीयतेमुळे त्यांना अपेक्षित असलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त होण्यापासून ते कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे देय होत आहे. अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गेवराई यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये अपिलार्थीस ही माहिती पुरविणे भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेचा अभाव

स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड (दिनांक ०६-०८-२००८ रोजी व तदनंतर तीस दिवसापर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड (दिनांक ०६-०८-२००८ रोजी व तदनंतर तीस दिवसापर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख सय्यद शेख कडुमियाँ, मु. पो. तळनेवाडी, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार / उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५९

निर्णय दिनांक ०६-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. स्वामी महादेव सोमनाथ,<br>घर क्रमांक एन-२८, महादेव गल्ली, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिका-याने ४५ दिवसाच्या आत निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्याकडे, खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' अ) महाराष्ट्र राज्य (मानवाधिकार) मानवी हक्क आयोग मुंबई प्रकरण क्र. TS/Case No. 26/15/2005-2006/7799 महादेव सोमनाथ स्वामी विरुध्द जिल्हाधिकारी लातूर संदर्भात आपण दिलेल्या अहवालाची सत्यप्रत. राज्य मानवाधिकार आयोगाच्या पत्र दि. १३-२-२००८ ज्याची प्रत सोबत जोडली आहे त्यात आपल्या अहवालाचा उल्लेख आहे. '

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्याकडे केला होता. अपिलार्थीचा अर्ज माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, उदगीर यांच्याकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले व या अर्जाची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती संबंधितांकडून प्राप्त न होऊ शकल्यामुळे त्यांनी, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उप संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लातूर यांच्याकडे दिनांक २८-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने संदर्भित केलेल्या प्रकरणाशी संबंधित उप संचालक (माहिती) हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी दिनांक ०२ जुलै २००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे परत पाठविला, तथापि या अपील अर्जावरही कोणताही निर्णय न झाल्याने आणि परिणामी अपिलार्थी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याने, व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना अपिलार्थीस कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करुन द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीकरिता त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुनही त्यांना निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून प्रथमतः कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची प्रत उपविभागीय अधिकारी, उदगीर यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे पाठविणे अनिवार्य असतानाही, त्यांनी मूळात अपिलार्थीचा अर्ज उपविभागीय अधिकारी, उदगीर यांच्याकडे, सदर

अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर २४ दिवसांनी पाठविला. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी प्रथमतः विलंब लावला व तदनंतर अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केले, परंतु त्यांनी देखील निवासी उपजिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक २८-०६-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज पाठविल्यानंतर या अपील अर्जावरही निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. यावरुन असे सिध्द होत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर हे जबाबदार आहेत. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब जिल्हाधिकारी, लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

३. जिल्हाधिकारी, लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, लातूर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. स्वामी महादेव सोमनाथ, घर क्रमांक एन-२८, महादेव गल्ली, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३३

निर्णय दिनांक ०७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदकुमार बंडेराव पानकडे,<br>मु.अंबेवाडी,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत संपल्यानंतरही अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याने, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी कोणतीही तारीख न कळविता एकतर्फी निर्णय दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे. त्यांच्या या अर्जाद्वारे त्यांनी सुनावणीच्या वेळी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, मौ. अंबेवाडी, ता.गंगापूर येथील प्राथमिक शाळेच्यासंदर्भात एकूण दोन मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी १९९९-२००७ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -अंबेवाडी येथील बालवाडी शिक्षिकेच्या डिसेंबर, १९९९ ते फेब्रुवारी २०००, सप्टेंबर २००१ ते नोव्हेंबर २००१, फेब्रुवारी २००२ ते एप्रिल २००२ या नऊ महिन्याच्या कालावधीमध्ये बालकताई म्हणून काम करणाऱ्या महिलेचे हजेरीपत्रक व संबंधित शाळेने २००१ ते २००८ या कालावधीमध्ये विविध कामासाठी व खर्चासाठी वेळोवेळी मागविलेल्या निविदा अथवा कोटेशनच्या प्रती साक्षांकित स्वरुपात - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांच्याकडे केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा हा अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांच्याकडे दि. १२.०१.२००९ रोजी पाठवून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे मुख्याध्यापकास सूचित केले. यानंतर मुख्याध्यापकाने दि. ०९.०२.२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सादर केली. ही माहिती अपिलार्थीस दि. १६.०२.२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली. ही माहिती प्राप्त झाल्याची पोचसही अपिलार्थीने त्याचदिवशी गट शिक्षणाधिकारी यांना दिली असून या पोचसही बरोबर अपिलार्थीने यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे गट शिक्षणाधिकारी यांना लिहून दिले. तथापि या नंतर प्राप्त माहितीने समाधान न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील, संबंधित शाळेच्या बालकताईच्या सप्टेंबर,ऑक्टोबर, नोव्हेंबर, २००१ च्या हजेरीपत्रकांच्या प्रतींचा समावेश, त्यांना देण्यात आलेल्या माहितीमध्ये नाही. या माहितीमुळे

त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न संबंधितांनी केला आहे व तसेच यासंदर्भात मुख्याध्यापकाने शाळेसाठी १ हॉर्सपॉवरची विद्युत मोटार खरेदी करुनही त्याच्या कोटेशनची प्रत अद्याप न दिल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. १६.०२.२००९ रोजी माहिती पुरविल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील सप्टेंबर,ऑक्टोबर,नोव्हेंबर २००१ या कालावधीतील अंबेवाडी येथील शाळेमध्ये बालकताई या पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याचे हजेरीपत्रक दिलेले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांनी गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे दि. ०९.०२.२००९ रोजी सादर केली होती.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी ही माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस दि. १६.०२.२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेत असताना अपिलार्थीने त्यांची कोणतीही तक्रार आता

राहिली नसल्याचे कबूल केले होते. तरीही अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी या शाळेच्या बालकताईच्या माहे सप्टेंबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर २००१ या कालावधीच्या हजेरीपत्रकाच्या प्रती सोबत आणल्या असून केवळ अपिलार्थीबरोबर वाद टाळण्यासाठी ते अपिलार्थीस त्या परत विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक अथवा गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात कधी उपस्थित राहिले, याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही किंवा आजही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर केला नाही. अपिलार्थीस गट शिक्षणाधिकारी यांनी दि. १६.०२.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली आहे. ही माहिती प्राप्त करुन घेत असताना अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाल्याची लेखी कबूली देऊन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाविषयी त्यांची कोणतीही तक्रार नाही, असे लेखी अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदविले आहेत. अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाली असताना देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मिळाल्याची पोच देताना संपूर्ण माहिती मिळाल्याचे व यासंदर्भात कोणतीही तक्रार नसल्याचे का लिहून दिले, असे आयोगाने त्यांना विचारले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर विश्वास ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना संपूर्ण माहिती दिल्याचे त्यांना सुरुवातीला वाटल्यावरुन त्यांनी अशाप्रकारचे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांना दिल्याचे आयोगास अवगत केले. याचा अर्थ अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती

अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली व त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीची कोणतीही शहानिशा न करता जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती स्वीकृत केली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने संबंधित शाळेच्या बालकताई या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या माहे सप्टेंबर,ऑक्टोबर,नोव्हेंबर, २००१ या कालावधीच्या हजेरीपत्रकाची प्रत त्यांच्यासोबत आणली असून या प्रती ते अपिलार्थीस परत विनामूल्य देण्यास तयार असल्याचे आयोगास अवगत केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ मधील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने टाळले असल्याचे कोणत्याही टप्प्यावर सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७.०४.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदकुमार बंडेराव पानकडे,मु.अंबेवाडी,पो.गंगापूर,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद-४३११०९

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५५

निर्णय दिनांक ०७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था<br>(लेखा परिक्षण विभाग),औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था<br>(लेखा परिक्षण विभाग),औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांनी स्वातंत्र्य सैनिकांची पाल्ये म्हणून नामनिर्देशन सादर केले आहे त्या पत्राची फोटोप्रत, त्या कर्मचाऱ्याचा संपूर्ण पत्ता, गाव,तालुका, जिल्हयाची माहिती व स्वातंत्र्यसैनिकाचा पूर्ण पत्ता, गाव व तालुका व जिल्हा

इत्यादीसह, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे अपिलार्थीस कळविले व त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस लवकरात लवकर कळविण्याचे त्यांनी आश्वासित केले. तदनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३४०/- इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे त्यांच्या दि. २५.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०४.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३१०/- (रु.३०/- टपालखर्च वगळता) त्यांच्या कार्यालयात भरले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचे कारण दर्शवून द्वितीय अपील सादर केले आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीची प्रत त्यांनी आयोगाकडे

केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेली नाही अथवा ही माहिती आयोगास प्रत्यक्षतः दाखविण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त होणे बाकी आहे, याचा बोध आयोगास होत नाही. अशाप्रकारे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०७.०४.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास,समता नगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखा परिक्षण विभाग),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखा परिक्षण विभाग),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५६

निर्णय दिनांक ०७.०४.२०१०

१ श्री. विठ्ठल तुळशीराम माने, : अपिलार्थी
रा.नागराळ,ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,उमरगा,जि.उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारल्याने आणि त्यांचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, उपअभियंता,उमरगा यांच्या कार्यालयातील उपअभियंत्यांपासून ते

कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वडिलोपार्जित मालमत्ता व अस्तित्त्वात असलेली मालमत्ता, जमीनजुमला, इमारत व दागदागिणे,बँक ठेवी,रोख रक्कम,गुंतवणूक व इतर स्थावर जंगम मालमत्तेविषयीची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८(त्र) नुसार त्यांना देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दि. १७.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील ते सुनावणीसाठी उपस्थित नसल्याने फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी न करता त्यांच्या सहायकाच्या स्वाक्षरीकरिता काही जागा या निर्णयामध्ये राखून ठेवल्याचे दिसून येत आहे. सदरचे आदेश हे जन अपिलीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीशिवाय असल्यामुळे ते अवैध ठरविण्यात येत आहेत. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती उघड करण्याचे त्यांनी त्यांच्याकडील दि. १२.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे नाकारले आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जरी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असली तरी, ही माहिती उघड केल्याने अपिलार्थी कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, याचा उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. तसेच हे स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती उघड केल्यास कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही. परंतु त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही व पणिामी ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१)(ज) चा भंग होणे संभवत असल्याने, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०७.०४.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने,रा.नागराळ,पो.गुंजोटी,ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५७

निर्णय दिनांक ०७.०४.२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सय्यद कमालपाशा बाशुमियाँ,<br>रा.कळंब, जि.उस्मानाबाद. | :अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>दुय्यम निबंधक,<br>कळंब, जि.उस्मानाबाद. | :प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक, उस्मानाबाद. | |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी | : | दुय्यम निबंधक श्रेणी-१,कळंब,<br>जि.उस्मानाबाद |
| जन अपिलीय अधिकारी | : | सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक<br>जिल्हाधिकारी,वर्ग-१ (नि.श्रे.),उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०७.०४.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली

असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक ९५७/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ९५७/०९, दिनांक ०४.०५.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०७.०४.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद कमालपाशा बाशुमियाँ, रा.गांधीनगर, कळंब, ता.कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१,कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,वर्ग-१ (नि.श्रे.),उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०१

निर्णय दिनांक ०७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिनेश दगडू मस्के,<br>रा.मुरुड अकोला,ता. जि. लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अधीक्षक अभियंता,<br>ल.पा.(स्था.स्तर) मंडळ,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>ल.पा.(स्था.स्त.)मंडळ,औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपेक्षित माहिती न दिल्यामुळे, त्यांना अनुक्रमे ४ महिने १३ दिवस व २ महिने ८ दिवस या कालावधीसाठी दंड करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कोणताही उल्लेख केलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "दि. ०१.०१.२००८ पासून मंडळाअंतर्गत शासनाकडून कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहायक अभियंता (श्रेणी-२) यांच्या करण्यात आलेल्या बदली

आदेशाच्या झेरॉक्स प्रती व मंडळाअंतर्गत दि. ०१.०१.२००८ पासून दि. १२.०१.२००९ पर्यंतच्या कालावधीमध्ये प्रतिनियुक्ती केलेल्या सर्व कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहायक अभियंता (श्रेणी-२) यांच्या आदेशाच्या झेरॉक्स प्रती", अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८२१/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरचे पत्र अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. १७.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०३.२००९ रोजी निर्णय दिला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन फेटाळले आहे. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १४.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जास दि. २८.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे, ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या

प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना दंडीत करण्यासाठी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील केवळ जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाने दंडीत करण्याचे आदेश पारित करण्याच्या प्रयोजनार्थ केले असल्याचे दिसून येत आहे. या संपूर्ण घटनाक्रमाची उपलब्ध कागदपत्रांवरुन पाहणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. परंतु या शुल्काचा भरणा अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही केला नाही अथवा या शुल्काचा भरणा करण्याची कोणतीही तयारी त्यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविलेली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यापोटी, जर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसतील तर या, शुल्काचा भरणा त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे अनिवार्य आहे. विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती, सशुल्क प्राप्त करुन घेणे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर व कधीही नाकारलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने ज्या प्रयोजनार्थ आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे ते प्रयोजनच मूळात तथ्यहीन असल्याचे सिध्द होत असल्याने आणि अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वत:च जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०७.०४.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिनेश दगडू मस्के,रा.मुरुड अकोला,ता. जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,ल.पा.(स्था.स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५०

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रभुदास सुभाष भालेराव,<br>कमला रतन प्लाझा, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | १) उप कार्यकारी अभियंता, जालना लघु पाटबंधारे विभाग, जालना<br>२) उप कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | सहायक अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील बजेट सेक्शनमध्ये श्री. आर. के. जाधव लिपीक हे त्यांच्या कार्यालयात किती वर्षापासून कार्यरत आहेत, ते कोण कोणत्या ठिकाणी व कोण कोणत्या पदावर यापूर्वी कार्यरत होते व सध्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वर्षापासून कार्यरत आहेत व त्यांच्या सेवापुस्तिकेच्या सत्यप्रती आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने २००६ ते २००८ या कालावधीमध्ये खरेदी केलेल्या फर्निचर व स्टेशनरी साहित्य यांची खरेदी त्यांनी कोणत्या एजन्सीकडून केली होती त्या एजन्सीचे नाव व या बाबीवर झालेला खर्च, बील अदा केलेल्या मोजमापपुस्तिकाच्या सत्यप्रती, खरेदीच्या कामाच्या निविदा कोणत्या दैनिकात व साप्ताहिकात प्रसिध्द करण्यात आल्या होत्या त्या दैनिकाच्या, साप्ताहिकाच्या प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील २ मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील दोन मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००९ रोजी ही माहिती व्यक्तिशः पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची या दोनही मुद्यांवरील माहिती प्राप्त झाल्याची पोचसही असलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. या पत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०६-२००९ रोजी म्हणजे, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर माहिती मिळाल्याचे सिध्द होत आहे. तथापि अपिलार्थीने माहिती मिळाल्याची लेखी कबूली दिल्यानंतरही अपिलार्थी यांनी आजच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अद्यापपावेतो मिळाली नसल्याचे म्हटले आहे. या विसंगतीबाबत अपिलार्थीस विचारले असता अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्यावेळी माहिती स्वीकृत केली त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती लागलीच देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतूदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास मूळात प्रतिसाद दिला तोच, अधिनियमातील माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या मूळ अर्जातील दोनही मुद्यांवरील माहिती प्राप्त

झाल्याची लेखी कबूली जन माहिती अधिकारी यांना दिली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती आयोगास दाखवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांचे हे वर्तन व तसेच अपिलार्थीची, प्रथमतः माहिती मिळाल्याची कबूली व नंतर माहिती प्राप्त न झाल्याची आयोगाकडे केलेली तक्रार, या दोनही बाबीतून जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थी यांच्या वर्तनातील विसंगती स्पष्ट होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीने एकदा कबूली दिली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना उपरोक्त प्रकरणी आयोगाच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजीत वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांच्याकडून सशुल्क हस्तगत करुन घ्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रभुदास सुभाष भालेराव, कमला रतन प्लाझा, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जालना लघु पाटबंधारे विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५१

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

१ श्री. केरुबा निवृत्ती उंबरे, : अपिलार्थी

मु. पो. पानेवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,

अंबड, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २,

जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, पारनेर पराडा या रस्त्यावर सन २००८ - २००९ मध्ये झालेल्या पॉटहोल फिलींगच्या कामाकरीता वापरण्यात आलेल्या डांबराची सी. सी. नक्कल, याच कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात झालेल्या पॉटहोल फिलींगच्या कामातर्फे वापरण्यात आलेल्या डांबराच्या सी. सी. नकला आणि एस. आर., सी. आर. २००७ - २००८ या कालावधीमध्ये झालेल्या सर्व डांबर कामाच्या सी. सी. नकला, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात दिनांक १६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी श्री. आर. डी. देशपांडे उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबड यांना पत्र लिहून अपिलार्थीस दिनांक ०५-०५-२००९ पूर्वी त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०२-२००९ रोजीच्या मूळ

अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधी उपस्थित झाले या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केलेला नाही. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी श्री. आर. डी. देशपांडे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड तथा जन माहिती अधिकारी यांना दिनांक २८-०४-२००९ रोजी लिहिलेल्या पत्रावरुन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाची केलेली उपेक्षा स्पष्ट होत आहे. या पत्रामध्ये कार्यकारी अभियंता यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी श्री. देशपांडे यांना दिनांक १५-०४-२००९ पर्यंत अहवाल सादर करण्यासाठी सूचित केले होते. परंतु वेळोवेळी सूचना देऊनही श्री. देशपांडे यांनी त्यांच्या सूचनांचे पालन केले नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०५-२००९ पर्यंत माहिती देण्याच्या सूचना श्री. आर. डी. देशपांडे यांना दिल्या होत्या. परंतु या मुदतीत देखिल श्री. देशपांडे यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे अपिलार्थीने ही बाब कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम क्रमांक २, जालना यांच्या निदर्शनास त्यांच्या दिनांक ०५-०५-२००९ च्या पत्रात देखिल आणून दिली होती. यावरुन संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीची पूर्ण कल्पना असूनही व त्यांना या संदर्भात वरिष्ठांकडून वेळोवेळी सूचना प्राप्त होऊनही त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच या संदर्भात जन माहिती अधिकारी यांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी देखिल उपस्थित नाहीत. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या एकूण वर्तनावरुन व विशेषतः या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती

देण्याची हेतूतः केलेली टाळाटाळ पाहता, ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. डी. देशपांडे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड श्री. आर. डी. देशपांडे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केरुबा निवृत्ती उंबरे, मु. पो. पानेवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५२

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

१ श्री. नानासाहेब बाबुराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. धावडा, ता. भोकरदन, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी,
भोकरदन, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि. जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली असता, या माहितीसाठी आवश्यक ते शुल्क रु. ४३१८/- इतके त्यांनी रोख भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलन सादर केले. परंतु त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले

आहे व याच बरोबर त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी आणि संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई आदेशित करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये दिनांक ०१-०१-२००८ ते १५०३-२००८ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कामाच्याकरीता प्राप्त झालेला निधी, झालेला खर्च, पिंपळगाव (रेणुकाई)  तपोवन, धावडा, रेलगाव, तपोवन तांडा, जळगांव सपकाळ या गावांमध्ये झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाच्या मस्टरच्या व मोजमापपुस्तिकेच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४३१८/- इतके चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले.  तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०३-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे, फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळल्यानंतर परत दिनांक २५-०५-२००९ रोजी त्यांच्या अपिलावर सुनावणी घेतली.  मध्यंतरीच्या काळात दिनांक २४-०२-२००९ रोजी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केलेले शुल्क बँकेत जमा केल्याच्या

चलनाची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १८-०३-२००९ रोजी सादर केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००९ रोजी अपिलार्थीने माहितीपोटीची भरलेली रक्कम त्यांना शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस लवकरात लवकर माहिती देण्यात येईल असा निर्णय घेतला. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने दिनांक १५-०५-२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले होते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १७-०२-२०१० रोजी अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्यासंदर्भात दुरध्वनीवरुन सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे दिनांक १७-०२-२०१० रोजी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले, परंतु माहितीची पोच देण्याचे नाकारुन अपिलार्थी त्यांच्या कार्यालयातून निघून गेले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती नाकारल्याने त्यांनी यानंतर दिनांक २२-०२-२०१० रोजी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने आवश्यक ती माहिती पाठविली. तथापि ही माहिती देखिल स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार दिल्याने पोस्टमनने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस त्यांनी पाठविलेले पार्सल परत केले. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन व ती अपिलार्थीस देऊ करुनही अपिलार्थी हे त्यांच्याकडील माहिती स्वीकारत नाहीत, असेही त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४३१८/- इतके त्यांना चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले होते. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदरच्या शुल्काचा बँकेमध्ये दिनांक २४-०२-२००९ रोजी भरणा करुन हे चलन मूळ स्वरुपात जन माहिती अधिकारी यांना दिनांक १८-०३-२००९ रोजी सादर केले. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) च्या तरतूदी लक्षात घेता या प्रकरणी अपिलार्थीस, त्यांनी एकदा आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्यानंतर या प्रकरणी दिनांक ०१-०४-२००९ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे त्यांना भाग होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०२-२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहिती देऊ केली. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी माहितीपोटीचे शुल्क भरल्यानंतर, त्यांना सशुल्क माहिती देण्याचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर, अपिलार्थीस सशुल्क माहिती देऊ केली आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य माहिती प्राप्त होत आहे.. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ४३१८/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसापर्यंत उपलब्ध करुन ठेवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की,

त्यांनी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती हस्तगत करुन घ्यावयाची जबाबदारी अपिलार्थी यांची आहे, असे त्यांच्या येथे निदर्शनास आणण्यात येत आहे.

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसापर्यंत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ४३१८/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नानासाहेब बाबुराव देशमुख, मु. पो. धावडा, ता. भोकरदन, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५३

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

१ श्री. दादाराव संतु बडक, : अपिलार्थी

मु. पो. पळशी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड,

जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१२-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय माहिती न देता जाणूनबुजून चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी हे त्यांना सत्य माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायत पळशी, तालुका सिल्लोड येथे ३१-०३-२००४ ते ३१-१०-२००७ या कालावधीमध्ये मंजूर घरकुल लाभार्थ्यापैकी किती लोकांनी घरकुल बांधकाम पूर्ण केले आहे, किती प्रगतीपथावर आहे व किती लोकांनी घरकुल बांधकाम अपूर्ण ठेवले आहे याची माहिती, स्थळ पाहणी पंचनामा व लाभार्थ्यांची संचिका, या मुद्यांवर व्यक्तिशः माहिती मागविली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १४-१२-२००७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २५-०३-२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये दिलेल्या निर्णयास अनुसरुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०३-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कनिष्ठ अभियंत्याच्या ताब्यात आहे त्या कनिष्ठ अभियंत्यास (श्री. टी. यु. बनसोड) २४ तासाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते. यानंतर गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०३-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती ही चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी तथा या प्रकरणाशी संबंधित कनिष्ठ अभियंता श्री. बनसोड यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २८-०३-२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविल्याचे कारण आयोगाने विचारले असता त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांच्या कार्यालयातील गव्हाणे नावाच्या लिपीकाकडे उपलब्ध होती. परंतु श्री. गव्हाणे यांनी संबंधित लाभार्थींच्या संचिका त्यांना न पुरविल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत. श्री. गव्हाणे हे आता मयत झाले असल्याचे देखिल त्यांनी आयोगास अवगत केले व आयोगास असे आश्वासित केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना अद्याप द्यावयाची स्थळ पाहणी पंचनाम्याची आणि लाभार्थींच्या संचिकेच्या प्रती ते आता अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जास गट विकास अधिकाऱ्याने दिनांक २७-०३-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. गट विकास अधिकारी यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ०१-११-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार संबंधित कनिष्ठ अभियंत्याकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे भाग असताना त्यांनी मूळात अपिलार्थीचा दिनांक ०१-११-२००७ रोजीचा मूळ अर्ज संबंधितांच्याकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी (जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १९-०३-२००८ च्या निर्णयानंतर) म्हणजे जवळजवळ तीन महिन्याच्या कालावधीनंतर हस्तांतरित

केला आहे. यावरुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यासाठी या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड हेच प्रामुख्याने जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याच्या त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीमुळे ते अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. ज्यावेळी अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज केला त्यावेळी श्री. ढगे हे गट विकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते, ते सध्या याच पदावर कार्यरत आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरविता त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. याच बरोबर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कनिष्ठ अभियंत्याकडे उपलब्ध होती त्यांनी देखिल अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना न देता 'स्थळ पाहणी पंचनामा व लाभार्थीच्या संचिकेच्या प्रती' ही माहिती अपिलार्थीस आजतागायत पुरविलेली नाही. त्यांनी देखिल त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस विलंबाने आणि अपूर्ण माहिती देण्यासाठी पंचायत समिती, सिल्लोड येथील गट विकास अधिकारी श्री. ढगे व कनिष्ठ अभियंता श्री. बनसोड हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी श्री. बनसोड हे आयोगासमोर उपस्थित आहेत. संबंधित कनिष्ठ अभियंता श्री. बनसोड यांना आयोगाने त्यांच्या बचावाची पूर्ण संधी देऊन ते त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याच्या कृतीचे समर्थन आयोगास करु शकले नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती न पुरविल्यामुळे या दोनही अधिकाऱ्यावर एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती आयोग आदेशित करीत आहे. या दोन अधिकाऱ्यांपैकी श्री. बनसोड हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित आहेत. या शास्तीची विभागणी

श्री. ढगे व बनसोड यांच्यामध्ये प्रत्येकी १२,५००/- रु. इतकी करण्यात येत आहे. श्री. बनसोड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारामध्ये खालील लेखाशिर्षाखाली जून २०१० पासून जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये करावा.

**लेखाशीर्ष - "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

श्री. ढगे हे आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने श्री. ढगे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर या प्रकरणी एकूण १२,५००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती - स्थळ पाहणी पंचनामा व लाभार्थीच्या संचिकेच्या प्रती" ही त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी आदेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही कशी चुकीची आहे हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये सप्रमाण सिध्द केलेले नाही अथवा हे सिध्द करण्यासाठी ते आज रोजी

आयोगासमोर तोंडी युक्तिवाद करण्यासाठी उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आक्षेप, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.
३. श्री. टी. यु. बनसोड कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, सिल्लोड यांना वरील निर्णयाप्रमाणे रु. १२,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.
४. श्री. ढगे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांनी, या प्रकरणी त्यांना वरील निर्णयाप्रमाणे एकूण १२,५००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दादाराव संतु बडक, मु. पो. पळशी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ श्री. ढगे, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ श्री. टी. यू. बनसोड, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५४

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

१ श्री. अब्दुल माजीद महंमद इब्राहिम, : अपिलार्थी
रा. बरकतपुरा, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय
अर्धापूर, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती अर्धापूर, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, असे नमूद केले आहे की, त्यांना दिनांक १६-०४-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही संबंधित माहिती अधिकाऱ्याने त्यांना, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करेपर्यंत कोणतीही माहिती दिलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सफाई कामगार व झाडू मारणारे कामगार यांची यादी व टाईम टेबलाची प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक १६-०४-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.  या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही उपस्थित होते.  जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील श्री. अल्लाउद्दीन काझी या त्यांच्या सहायकाकडे उपलब्ध होती. अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लागलीच या सहायकास अपिलार्थीस माहिती देण्यासाठी माहिती तयार करुन ठेवावयास सूचित केले होते.  परंतु त्यांच्या या सहायकाने वेळेत माहिती तयार करुन न ठेवल्यामुळे त्यांना अपिलर्थीस ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविता आली नाही.  त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १७-०३-२०१० रोजी विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने

त्यांच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके मर्यादित होते की, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ किंवा जास्तीत जास्त अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कमीत कमी वेळात उपलब्ध करुन देता येणे सहज शक्य होते. तथापि अपिलार्थीने दिनांक ३१-१२-२००८ रोजी मागितलेली माहिती अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अंदाजे एक वर्ष इतक्या विलंबाने पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये, 'ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सफाई कामगार व रस्ते झाडणारे कामगार यांची यादी व वेळापत्रक,' इतकी साधी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि अशाप्रकारच्या किरकोळ माहितीसाठी अपिलार्थीस थेट आयोगापर्यंत धाव घ्यावी लागली, ही खरोखरीच दुर्देवाची बाब आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांना त्यांच्या कार्यालयातील सहायक श्री. अल्लाउद्दीन काझी यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. तथापि त्यांचा हा युक्तिवाद आयोग पूर्णतः फेटाळून लावत आहे. जन माहिती अधिकारी हे या ग्रामपंचायतीमध्ये एक वर्ष इतक्या कालावधीपासून कार्यरत आहेत. एका वर्षाच्या कालावधीतही त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सफाई कामगारची व रस्ते झाडणाऱ्या कामगाराची यादी प्राप्त होऊ शकत नाही ही बाब खरोखरीच आश्चर्याची आहे. या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये या विलंबाचे केलेले समर्थन, कोणत्याही परिस्थितीत आयोग मान्य करु शकत नाही. या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, अर्धापूर व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक श्री. अल्लाउद्दीन काझी ज्यांना, अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे दोघेजण जबाबदार असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे.

त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे, असे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. यु. एन. देशमुख व त्यांचे सहायक अल्लाउद्दीन काझी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून, दिनांक १७-०३-२०१० रोजी माहिती प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली कथित माहिती ही त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता आता जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. यु. एन. देशमुख व त्यांचे सहायक अल्लाउद्दीन काझी यांच्यावर, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल माजीद महंमद इब्राहिम, बरकतपुरा, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९५८

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. वाघ शशिकांत धोंडिबा,<br>रा. शिरढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००६ ते २००८ या कालावधीमध्ये लोकरे ग्रामसेवकाकडे कोणकोणती गावे होती व आहेत, पंचायत समिती, ग्रामपंचायत अंतर्गत शिराढोण व ढेकरी या गावामध्ये कोणकोणत्या योजनेमध्ये, कोणकोणती विकास कामे झाली, त्या कामांच्या एम. बी. सी.

सी. व इतर कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती आणि त्या गावामध्ये घरपट्टी व पाणीपट्टी जमाखर्च यांच्या झेरॉक्स प्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना उद्देशून केला होता, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिराढोण ढेकरी यांच्याकडे उपलब्ध असल्याने, गट विकास अधिका-याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा मूळ अर्ज, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिराढोण ढेकरी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी दिनांक ३१-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये ' इतर कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती ' अशी माहिती मागितली होती, ही माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही, परंतु उर्वरित संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस आता या आदेशाच्या आधी दिली नसल्यास विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात काही माहिती पुरविली आहे किंवा कसे, माहिती पुरविली असल्यास निश्चितपणे अपिलार्थीस कोणती माहिती पुरविली, यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे आयोगासमोर नसल्यामुळे अपिलार्थीस, या आदेशापूर्वी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यास ती आता वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाघ शशिकांत धोंडिबा, रा. शिरढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६०

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदकुमार आसाराम उढाण,<br>रा. खडकेश्वर, पो. ताड हादगांव, तालुका अंबड,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना | : | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी यामधील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने जलसंधारण कामामध्ये केलेल्या गैरव्यवहार चौकशीच्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर आणि यासंदर्भात दिनांक ०४-१०-२००८ रोजी पाठविलेल्या स्मरणपत्रासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची छायांकीत प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा सदरचा अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०१-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती तयार करुन ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर करण्याचे, तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांना त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले, तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांच्याकडे दिनांक २०-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०४-२०१० रोजी, एकूण २६ पृष्ठाव्दारे दिली असून, ही

माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याने, अपिलार्थीने जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांच्याकडे दिनांक ०३-०४-२०१० रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या व्दितीय अपीलातील कारवाई थांबविण्यासाठी त्यांची संमती असल्याचे कळविले आहे. अपिलार्थीने दिनांक १७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी दिनांक ०३-०४-२०१० ही तारीख उजाडेपर्यंत का वाट पाहावी लागली याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या तक्रारीची सविस्तर चौकशी करण्यासाठी त्यांना हा विलंब लागल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, या प्रकरणी त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांच्या कार्यालयाकडे, दिनांक २९-०७-२००८ व दिनांक ०४-१०-२००८ नुसार केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई, अशी माहिती मागितली होती. याचा अर्थ - अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या तक्रार अर्जावर आणि त्यावरील स्मरणपत्रा-वर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००९ पर्यंत या प्रकरणाशी संबंधित सर्व प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावर त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती - असा होता. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचा चुकीचा अर्थ लावून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या प्रकरणाची चौकशी केली, यानंतर दिनांक ०३-०४-२०१० रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. अपिलार्थीच्या पोचसहीवरुन प्राप्त माहितीने अपिलार्थीने समाधान झाल्याचे आयोगास आढळून येत आहे, त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त होणे बाकी उरले नाही. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील मजकुराचा चुकीचा अर्थ काढल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याचे या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिका-याने दुष्ट हेतूने टाळल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही आयोग आदेशित करत नाही, परंतु जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडील प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने अधिनियमातील विहित कालावधीचे भान ठेवून कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदकुमार आसाराम उढाण, रा. खडकेश्वर, पो. ताड हादगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०२

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

१ श्री. खोले प्रभाकर केशवराव, : अपिलार्थी
झेंडा चौक, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मोहीम अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी : कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अनावश्यक, असमाधानकारक माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' १. कोणत्या शासन निर्णयानुसार किंवा जॉबचार्ट प्रमाणे कृषी अधिकारी, वि. अ. (कृ) यांना प. स. कृषी गोदामाचे अभिलेखे सहित कार्यभार देता येतात या शासन निर्णयाची सत्यप्रत मिळावी.

२. प. स. कृषी गोदामाचा कार्यभार देता येत नसल्यास तसे लेखी कळविण्यात यावे (लेखी मिळावे).

३. अपहार प्रकरणातील टिपणी क्र. ६१ पासून दिनांक २८/४/०९ पर्यंतची पुर्ण टिपण्या क्रमांकासह, प्रमाणीत प्रती मिळणे '

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११७ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००९ रोजी केल्यानंतर दिनांक ०८-०५-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०६-२००९ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या प्रकरणातील टिपणी क्रमांक ६१ व ६२ ची प्रत सात दिवसाच्या आत सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०६-२००९ रोजी या प्रकरणाची संबंधित अभिलेख्यावरील टिपणी क्रमांक ६१ व ६२ ची प्रत

विनामूल्य पुरविली, तथापि प्राप्त माहिती समाधानकारक नसल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला. यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी न्यायालयीन कामासाठी आवश्यक असलेली कोणतीही माहिती दिली नाही, परंतु त्यांना माहिती अधिकार अधिनियमा-अंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा वेळ वाया घालवत असल्याचे लेखी कळवून व त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करावयाची धमकी देत आहेत. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी हे त्यांचा मानसिक छळ करत असल्यामुळे, त्यांच्या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांना न्याय द्यावा व न्यायालयीन कामासाठी आवश्यक असलेली माहिती देण्याचे आदेशित करण्याची विनंती त्यांनी या युक्तिवादामध्ये आयोगाकडे केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०८-०५-२००९ रोजी व तदनंतर दिनांक १६-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य प्रकारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दिनांक ०८-०५-२००९ व दिनांक १६-०६-२००९ रोजी, त्यांनी मागणी केलेली माहिती सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती देण्याऐवजी त्यांच्या मूळ अर्जातील प्रत्येक मुद्दयाचे सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे. अशा प्रकारचे स्पष्टीकरण त्यांनी अपिलार्थीस देण्याची

आवश्यकता नव्हती, तथापि त्यांनी एकंदरीत अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीची छाननी करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने, त्यांनी बीड जिल्हा परिषदेत कृषि विस्तार अधिकारी या पदावर कार्यरत असताना केलेल्या शासकीय रकमेच्या अपहाराबद्दल त्यांच्यावर पोलिसामध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती असमाधानकारक कशी आहे, हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादावरुन स्पष्ट होत नाही व उपलब्ध कागदपत्रावरुन तशा प्रकारची वस्तुस्थितीही असल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दोन टप्प्यात प्राप्त झाली असल्याने, फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. खोले प्रभाकर केशवराव, झेंडा चौक, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मोहीम अधिकारी, कृषि विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९४

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भगवान विष्णुपंत ठोंबरे,<br>प्लॉट नं. ३४, एफ १, एच १, एन ४, सिडको, औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार (महसूल विभाग), तहसील कार्यालय,<br>केज, तालुका केज, जिल्हा बीड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तलाठी, सज्जा उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना तलाठी, तलाठी कार्यालय, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांनी अद्यापपावेतो माहिती दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अपील अर्जावर

कोणताही निर्णय अद्यापपावेतो दिलेला नाही. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो तहसीलदार, केज जिल्हा बीड यांना प्रत्यक्षात दिनांक २८-०८-२००७ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे उंदरी या गावाच्या नमुना नं. ८ (अ) च्या रजिस्टरमध्ये, भागवत विष्णु ठोंबरे यांचे गट नंबर २४८, २४१, २५८, २९५ व ३०१ मध्ये घेतलेल्या पानाची छायांकीत प्रमाणित प्रत व नजरी नकाशाची छायांकीत प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज तहसीलदार, केज यांच्याकडे केला होता, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित गावाच्या तलाठ्याकडे असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज दिनांक २९-०८-२००७ रोजी संबंधित तलाठ्याकडे पाठविला. तलाठी, उंदरी यांनी त्याच दिवशी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली, तथापि माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. परंतु अपिलार्थीचा सदर अपील अर्ज तहसीलदार, केज यांच्याकडे प्राप्त न झाल्याने ते या अपील अर्जावर कोणताही निर्णय घेऊ शकले नाहीत. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-०८-२००७ रोजी साध्या टपालाव्दारे माहिती पाठविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहितीतील नजरी नकाशाची प्रत त्यावेळी तलाठी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांना ही माहिती

अपिलार्थीस पाठविता आली नाही. ' नजरी नकाशा ' या संज्ञेचा जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, नजरी नकाशा म्हणजे कोणत्याही शेतक-याने तलाठी यांच्याकडे त्यांच्या शेताच्या नकाशाची मागणी केल्यानंतर तलाठ्याच्या दृष्टीस संबंधित शेत ज्याप्रमाणे त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येते त्याप्रमाणे त्यांनी ढोबळमानाने काढलेला नकाशा होय. नजरी नकाशा शेतक-यास तलाठ्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्याकरिता संबंधित शेतक-याने तलाठ्याकडे वेगळा अर्ज करणे आवश्यक आहे. याकरिता एका नजरी नकाशाकरिता दहा रुपये इतके शुल्क आकारण्यात येत असते. या प्रकरणी अपिलार्थीने नजरी नकाशाकरिता वेगळा अर्ज केला नसल्यामुळे ते, अपिलार्थीस नजरी नकाशा त्यावेळी पुरवू शकले नाहीत, तथापि अपिलार्थीने संदर्भित केलेल्या भूखंडाचा (आजची स्थिती) नजरी नकाशा ते आता अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०८-२००७ रोजी साध्या टपालाने माहिती पुरविली याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी विहित मुदतीत पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे, तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली होती, तथापि अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी साध्या टपालाव्दारे माहिती पुरविली, ही जन माहिती अधिकारी तथा तलाठी, उंदरी यांच्याकडून घडलेली अनियमितता आहे. या अनियमिततेबद्दल त्यांना समज देण्यात येऊन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, उंदरी, तालुका केज यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील ' नजरी नकाशा ' या माहिती-शिवाय उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी

अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

नजरी नकाशाच्या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या भूखंडाच्या नजरी नकाशासंदर्भात तलाठी, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांच्याकडे वेगळयाने अर्ज करुन, महसूल विभागाच्या प्रचलीत आदेशानुसार त्याकरिता लागणारे आवश्यक ते शुल्क तलाठी, उंदरी यांच्याकडे भरुन नंतर नजरी नकाशाच्या प्रती त्यांनी तलाठी, उंदरी यांच्याकडून प्राप्त करुन घ्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील ' नजरी नकाशा ' या माहितीशिवाय उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या नजरी नकाशाच्या प्रतीकरिता महसूल विभागा-तील प्रचलीत पध्दतीनुसार तलाठी, उंदरी यांच्याकडे स्वतंत्रपणे अर्ज करुन त्यांच्याकडून या नजरी नकाशाच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान विष्णुपंत ठोंबरे, प्लॉट नं. ३४, एफ १, एच १, एन ४, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सज्जा उंदरी, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९५

निर्णय दिनांक ०७-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबा लक्ष्मणराव डाखोरे,<br>रुपा गेस्ट हाऊसजवळ, वसंतनगर,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर,<br>तालुका भोकर, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर,<br>तालुका भोकर, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०२-२०१० रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता अपिलार्थीस जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने तहसीलदार, भोकर यांनी

अपिलार्थीस सुनावणीसाठी बोलावूनही सुनावणी घेतली नाही व नंतर अपिलार्थीस कोणत्याही प्रकारचे त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता व त्यांचे काही एक न ऐकता त्यांचे प्रथम अपील फेटाळून, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खरी असल्याचा निर्णय दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चुकावर पडदा टाकण्यासाठी, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकर यांनी जाणीवपूर्वक माहिती अधिकाराचा अवमान करुन, अपिलार्थीच्या विरुध्द निकाल दिला आणि त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करुन अपिलार्थीने या प्रकरणी माहितीपोटीचे दिलेले शुल्क त्यांना परत करण्याचे व अपिलार्थीस सत्य माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, भोकर यांच्याकडे, माहे जानेवारी २००५ ते ३१ जुलै २००६ या कालावधीमधील, भोकर मुख्यालयातील सर्व अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांनी व किरकोळ विक्रेत्यांनी विक्री केलेल्या रजिस्टरच्या प्रती व तसेच किरकोळ विक्रेत्यांनी कार्डधारकांना रॉकेल विक्री केलेल्या रजिस्टरच्या प्रती, अशी माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२,७३० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१२-२००६ रोजी मनीऑर्डरव्दारे या शुल्काचा भरणा केला. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-१२-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-

०५-२००७ रोजी अंतीम सुनावणी घेऊन, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मागणीप्रमाणे माहिती पुरविल्याचा निष्कर्ष काढून, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जामध्ये कोणतेही तथ्य आढळून येत नसल्याचे कारण दर्शवून त्यांचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्यामुळे त्यांनी, या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत मिळावे आणि भोकर मुख्यालयाशी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व तसेच या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना वेळोवेळी त्रास दिल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही आदेशित करावी. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, भोकर मुख्यालयातील पाच विक्रेत्यांची माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. भोकर मुख्यालयातील हे पाच रॉकेल विक्रेते कोण आहेत अशी आयोगाने अपिलार्थीकडे विचारणा केली असता, अपिलार्थीच्या प्रतिनिधीने, याकरिता जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या माहितीचे अवलोकन करावे लागेल, असे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-१२-२००६ रोजी संपूर्ण भोकर तालुक्यातील रॉकेल विक्रेत्यांची माहिती दिली असून, यामध्ये भोकर मुख्यालयातील विक्रेत्यांशी संबंधित माहितीचाही समावेश आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भोकर मुख्यालयातील रॉकेल विक्रेत्यांच्या संदर्भात माहिती मागविली असता, त्यांना भोकर मुख्यालयाव्यतिरिक्त भोकर तालुक्यातील इतर रॉकेल विक्रेत्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चित कोणत्या रॉकेल विक्रेत्यांसंदर्भात माहिती प्राप्त झाली नाही, अशी आयोगाने त्यांच्याकडे विचारणा केली असता, त्यावर अपिलार्थीचे प्रतिनिधी आयोगास समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना भोकर मुख्यालयातील ज्या रॉकेल विक्रेत्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, त्या विक्रेत्यांची यादी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीकडून ही यादी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस या संदर्भातील माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमा-तील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीनंतर प्रतिसाद दिला व विलंबाने प्रतिसाद देऊनही अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे, त्यामुळे या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले संपूर्ण शुल्क त्यांना,

(मनीऑर्डरने परत पाठविलेले ३१० रुपये वगळता) हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी श्री. गुंडमवार नायब तहसीलदार (सध्या पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे कार्यरत) यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना देय असल्यास, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन नायब तहसीलदार श्री. गुंडमवार (सध्या पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले संपूर्ण शुल्क (मनीऑर्डरव्दारे पाठविलेले रुपये ३१० वगळता) त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबा लक्ष्मणराव डाखोरे, रुपा गेस्ट हाऊसजवळ, वसंतनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७७
निर्णय दिनांक ०८.०४.२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. सुखवंत कौर रविंद्रसिंग बुंगई,<br>रा.सेलू, जि.परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, सेलू,<br>जि. परभणी. | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, सेलू, जि.परभणी | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक,
नगर परिषद कार्यालय,सेलू,
जि.परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सेलू नगरपरिषदेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन २००१-०८ मध्ये झालेल्या सत्काराच्या कार्यक्रमासाठी करण्यात आलेल्या एकूण खर्चाचा तपशील, त्यामध्ये सिनेकलावंतांना आणण्याचा खर्च व मानधन, मंडप डेकोरेशन, कमानी व जाहीरात खर्च,स्मृतीचिन्हे

यांचा प्रत्येक वर्षाप्रमाणे करण्यात आलेल्या खर्चाची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयीन आवक रजिस्टरच्या नोंदीची प्रत, सुवर्ण जयंती रोजगार योजनेअंतर्गत एकूण उपलब्ध झालेले अनुदान, आजपर्यंत किती महिला बचत गटांना कर्ज देण्यात आले, याची सविस्तर माहिती, कर्जफेड केल्यानंतर किती महिला बचत गटांना दुसऱ्यांदा कर्ज देण्यात आले, राहिलेल्या किती महिला बचत गटांचा प्रस्ताव बँकेत पाठविण्यात आला,त्याचा तपशील तारखेसह, सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम आजपर्यंत किती वेळा घेण्यात आले व ते कोणत्या संस्थेमार्फत घेण्यात आले, प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस व प्रशिक्षणार्थीस किती मानधन देण्यात येते आणि आजपर्यंत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणाचे विवरण तारखेसह, प्रत्येक प्रशिक्षण शिबिरात उपस्थित असलेल्या व्यक्तीची नावे व पत्ते, त्यांना देण्यात आलेल्या मानधनाची रक्कम व कार्यालयाच्या आवक नोंदीची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ ते ७ शी संबंधित माहिती त्यांना विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.११.२००८ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारुन वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद फॅक्सद्वारे आयोगास सादर केला असून, यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, या प्रकरणी संबंधित माहिती अधिकाऱ्यावर कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी. सिनेतारकांवर प्रचंड खर्च करण्यात आला आहे, तो कोणी किंवा कोणत्या गुत्तेदारामार्फत करण्यात आला, याची माहिती त्यांना देण्यात यावी, महिला बचत गट व सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेमधील पैसा इतरत्र कसा काय वळविण्यात आला, याचा जाब विचारावा, माहिती अधिकारानुसार माहितीची मागणी केल्यास बांधकाम अनधिकृत करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून ते पाडण्याची नोटीस देण्यात येते, पदाधिकाऱ्यांना माहिती मिळत नाही तर सर्वसामान्य नागरिकांना न्याय कधी मिळणार.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ ते ७ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १२.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये दिली व मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती दि. १५.११.२००८ रोजी व्यक्तिशः देऊ केली असता, ही माहिती स्वीकारण्याचे अपिलार्थीने नाकारले आहे. यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्याकडे तयार असलेली मुद्दा क्र.१ शी संबंधित माहितीची प्रत आयोगास दाखविली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात, त्याप्रमाणे सिनेकलावंतांना आणण्याचा व मानधनाचा खर्च नगरपरिषदेतर्फे करण्यात आला नाही. यासंदर्भातील कोणत्याही खर्चाचा तपशील त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या व्हाऊचरवरुन स्पष्ट होत नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ ते ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः प्राप्त झाली आहे. ही माहिती अपूर्ण

असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापि कोणत्या मुद्यावरील माहिती अप्राप्त आहे, याचा खुलासा त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये देखील त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. २ ते ७ शी संबंधित प्राप्त झालेल्या माहितीवर त्या समाधानी नाहीत, असे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना दि. १५.११.२००८ रोजी व्यक्तिशः देऊ केली असता, ही माहिती स्वीकारण्याचे अपिलार्थीने नाकारले असून आज रोजी आयोगाकडे त्यांनी या मुद्यावरील माहिती देण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १५.११.२००८ रोजी देऊ केलेली माहिती स्वीकारावी व नंतर या माहितीवर त्यांचे काही आक्षेप असतील तर नगर परिषद प्रशासन अथवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडून या आक्षेपाचे निराकरण त्यांनी परस्पर करुन घ्यावे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासंदर्भात केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये महिला बचत गट व सुवर्ण जयंती रोजगार योजनेमधील पैसा इतरत्र कसा काय वगळण्यात आला, याचा जाब जन माहिती अधिकारी यांना विचारण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने माहिती अधिकाऱ्याकडे, माहिती अधिकार अधिनियमानुसार मागणी केलेली, सुसंगत माहिती अर्जदारास माहिती अधिकाऱ्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाली किंवा कसे व नसल्यास संबंधित माहिती अधिकाऱ्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई प्रस्तावित करणे इतपतच आयोगाची अधिकारिता सीमित आहे. अपिलार्थीची जर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यप्रणालीच्या संदर्भात काही तक्रार असेल तर त्यांनी त्यांच्या तक्रारीचे

निराकरण संबंधित विभागाच्या/नगर परिषद प्रशासनाच्या वरिष्ठ प्रशासकीय पातळीवर करुन घेणे संयुक्तिक होईल, असे त्यांना स्पष्ट करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करण्यासाठी कधी उपस्थित झाल्या, यासंदर्भात सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही.त्याचप्रमाणे अपिलार्थीस मुद्दा क्र. २ ते ७ शी संबंधित देण्यात आलेली कथित माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली नाही. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांच्या स्तरावर अपिलार्थी व सर्व संबंधितांबरोबर एक बैठक आयोजित करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयातून जर गहाळ झाले असतील तर सदर अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी आवश्यकतेप्रमाणे फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घ्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०८.०४.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सुखवंत कौर रविंद्रसिंग बुंगई,१/५७६,शास्त्रीनगर, सेलू,जि.परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक,नगर परिषद कार्यालय,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३४

निर्णय दिनांक ०८.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय,जालना | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय,जालना | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
सामान्य प्रशासन विभाग,जि.प.जालना.
जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(सा.प्र.वि.),जिल्हा परिषद, जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामध्ये स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणून नोकरीला

लागलेल्या कर्मचाऱ्यांचे नाव,गाव व पत्ता व स्वातंत्र्यसैनिकांशी त्यांचे नाते आणि स्वातंत्र्यसैनिक यांचा पत्ता या मुद्यावर सन १९८४ ते डिसेंबर, २००८ या कालावधीतील माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. १८.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०६.२००९ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची माहिती तीस दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या सुनावणीपूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती त्यांना दि. १३.०२.२००९ व दि. २४.०७.२००९ रोजी टपालाद्वारे पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी पोस्टाची दि. ०४.०८.२००९ रोजीची पावती आयोगास दाखविली. यावरुन जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०७.२००९ रोजी माहिती पुरविल्याचे दाखविले असले तरी त्यांनी प्रत्यक्षात ही माहिती अपिलार्थीस दि. ०४.०८.२००९ रोजी पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिली असल्याचे आढळून येत आहे. जिल्हा परिषदेतील इतर विभागांच्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या दि. १३.०२.२००९ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस इतर विभागाशी संबंधित माहितीसाठी संबंधित विभागाशी परस्पर

संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस त्यांनी सूचविले होते. त्यामुळे इतर विभागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे किंवा कसे, याबाबत त्यांना काहीही माहिती नाही. परंतु आता आयोगाने आदेशित केल्यास ते जिल्हा परिषदेमधील इतर विभागातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत उपलब्ध करुन देऊ शकतील.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना उद्देशून केला होता. या अर्जाद्वारे अपिलार्थीस जिल्हा परिषदेमधील सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात माहिती हवी होती, असे दिसून येत आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.०२.२००९ व दि.२४.०७.२००९ (प्रत्यक्षात पोस्टाद्वारे दि. ०४.०८.२००९) रोजी जिल्हा परिषदेतील फक्त सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित माहिती पुरविली आहे. या माहितीमध्ये देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित स्वातंत्र्यसैनिकांचे पत्ते दिले नव्हते. परंतु त्यांनी ही माहिती स्वातंत्र्यसैनिकांच्या पत्त्यासह स्वत:सोबत आणली असून ती आयोगास अवलोकनास्तव सादर केली आहे. जालना जिल्हा परिषदेमधील सामान्य प्रशासन वगळता इतर विभागाशी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस न देण्यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेले स्पष्टीकरण आयोगास मान्य नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदेमधील विविध विभागाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत तो जिल्हा परिषदेतील सर्व विभागांकडे पाठवून त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे त्यांना अधिनियमातील कलम ६(३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती न करता अपिलार्थीस सामान्य प्रशासन विभाग वगळता इतर विभागाकडून परस्पर माहिती घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित विभागाकडून परस्पर माहिती प्राप्त करुन

घेण्याचे सूचित करण्याची कृती, त्यांनी वेळेत न केल्यामुळे ती, सर्वथा चुकीची असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या चुकीमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना स्वत: जिल्हा परिषदेमधील इतर सर्व विभागांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जावक लिपीकाने त्यांचे दि. २४.०७.२००९ रोजीचे पत्र प्रत्यक्षात दि. ०४.०८.२००९ रोजी पोस्टात सादर केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कार्यवाहीच्या प्रत्येक टप्प्यावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालमर्यादा लक्षात घेता, या प्रकरणी संबंधित जावक लिपीकाने जन माहिती अधिकारी यांचे दि. २४.०७.२००९ रोजीचे पत्र दि. ०४.०८.२००९ रोजी पोस्टात सादर करुन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित जावक लिपीकावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, अद्यापपावेतो त्यांना द्यावयाची राहिलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना जन माहिती अधिकारी यांच्या सहायकावर वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०८.०४.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,अंबाली निवास, समतानगर,औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६२
निर्णय दिनांकः ०८.०४.२०१०

१. श्री. शेख मसूद हुसैन, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, पी.ई.एस.इंजिनिअरींग कॉलेज,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य, पी.ई.एस.इंजिनिअरींग कॉलेज,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये प्राचार्य, पी.ई.एस. अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद यांच्याकडे, त्यांच्या महाविद्यालयामध्ये खुल्या

प्रवर्गात विविध अभियांत्रिकी शाखेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या टक्केवारीसह यादी, अशी सन २००८ या वर्षाशी संबंधित माहिती मागितली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.०४.२००९ रोजी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे प्रथम अपील केले. तथापि या अपिलावर निर्णय न दिल्याचे व माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रभारी प्राचार्य, पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांच्याकडील दि. ०७.०४.२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले. सदर पत्रान्वये संबंधित महाविद्यालयास विनाअनुदानीत तत्त्वावर मान्यता असल्याने केंद्र शासनाचे व महाराष्ट्र शासनाचे कुठलेले अनुदान महाविद्यालयास मिळत नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ त्यांच्या महाविद्यालयास लागू होत नाही, असे कळविले आहे.

यासंदर्भात सर्व संबंधितांना आयोगातर्फे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशाप्रकारच्या प्रकरणांसंदर्भात मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. यामध्ये नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय,वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार

अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, अधिनियमातील "नियंत्रण" व "मोठया प्रमाणात वित्त पुरवठा" या मुद्यावरही पुरेसे भाष्य केले असून खाजगी संस्थांच्या महाविद्यालयांवर माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेले "नियंत्रण"व "वित्त सहाय्य" शासनाकडून केले जात नसल्याचा निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये विहित केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची खाजगी महाविद्यालये येत नसल्यामुळे सदर अपील फेटाळून राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश रद्द ठरविले आहेत. विचाराधीन प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाच्या वर संदर्भित केलेल्या प्रकरणाप्रमाणेच असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८.०४.२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख मसूद हुसैन,बंगला नं.२०, छावणी,औरंगाबाद

२. प्राचार्य, पी.ई.एस.इंजिनिअरींग कॉलेज,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६३

निर्णय दिनांक ०८.०४.२०१०

१ श्री. पठाण अल्ताफखान अजिजखान, : अपिलार्थी
रा.सेलू, जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग (जि.प.),
सेलू, जि.परभणी.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
जि.प.ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,
सेलू,जि.परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या मौ. पिंपरी गोंडगे,ता. सेलू येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत झालेल्या कामाच्या संदर्भात माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाच्या मोजमापपुस्तिकांच्या सत्यप्रती, ट्रायल बोअरची रुंदी व खोली, त्या बोअरचे बील कशाप्रकारे अदा करण्यात आले, त्याच्या सत्यप्रती, या योजनेतील विहीर खोदकाम कोणत्या स्फोटक परवानाधारकाने काम केले त्या परवाना धारकाच्या परवान्याची सत्यप्रत आणि त्यांना अदा केलेल्या पूर्ण हिशोबपावत्यांची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दि. १७.०२.२००९ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दि. १७.०२.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिली तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग,जिल्हा परिषद,परभणी यांच्याकडे दि. १३.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती, ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली असून, भारत निर्माण योजनेअंतर्गत केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठयाची कामे स्थानिक पातळीवरील समितीमार्फत पार पाडली जातात. या कामांना तांत्रिक मार्गदर्शन करण्याशिवाय इतर कोणत्याही बाबीत त्यांचे समितीवर नियंत्रण नसते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १७.०२.२००९ रोजी पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस संबंधित उपअभियंत्यांने सशुल्क व विहित मुदतीत पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांना आज रोजी आयोगासमोर, अपिलार्थीच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात कोणताही (समाधानकारक) खुलासा करता आला नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात मागणी केलेली - विहिरीचे खोदकाम  करताना कंत्राटदाराने जी स्फोटके वापरली त्याच्या वापराचा परवाना व हिशोबाच्या प्रतींची माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील  अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८.०४.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पठाण अल्ताफखान अजिजखान,रा.फुलेनगर,सेलू,ता.सेलू, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०३

निर्णय दिनांक ०८.०४.२०१०

१ श्री. त्र्यंबक सुखदेव इंगळे, जालना. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती देऊन सुनावणीचा निर्णय न दिल्याने, माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्याचे नाकारल्याने आणि प्राप्त माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या 'वैयक्तिक'संचिकेसंदर्भात एकूण दोन मुद्याद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - मागासवर्गीय कक्ष संचिकेची

टिपणी व त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी देऊन पुन्हा कमी केलेल्या वेतनाच्या लेखी संचिकेच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि. ०१.०१.२००६ ते दि. ३०.११.२००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दि. ०१.०७.२००९ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे मान्य केले आणि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ ची माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या दिवशी सूचित केले व मुद्दा क्र. १ च्या संदर्भात गहाळ झालेल्या संचिकेच्या संदर्भात प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय यांना दहा दिवसांच्या आत चौकशी करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहितीशी संबंधित नस्ती त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाली आहे. या प्रकरणी चौकशी केली असता, संबंधित लिपीकाने ही नस्ती अपिलार्थीस दिल्याचे व ही नस्ती अपिलार्थीने परत न केल्याचे त्यांच्याकडे लेखी स्वरुपात कळविले आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण २ मुद्यांवरील माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १८.०३.२००९ रोजी पुरविली आहे. तथापि उर्वरित मुद्यावरील माहिती ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध होती, ते अभिलेखे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. सदर अभिलेख शोधण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना तीस दिवसांची मुदत आयोगातर्फे देण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत, संबंधित नस्तीचा शोध घेऊन त्यांना विनामूल्य पुरवावी. जर या कालावधीमध्ये गहाळ झालेली नस्ती त्यांना सापडली नाही तर, ही नस्ती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी आवश्यकतेप्रमाणे फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याची त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत, संबंधित नस्तीचा शोध घेऊन त्यांना विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०८.०४.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. त्र्यंबक सुखदेव इंगळे, 'त्रिशरण' निवास, रांजणीकर यांचे दुकानासमोर, शिवनगर, जुना जालना,जि.जालना-४३१ २०३.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७२
निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण बापुराव कोरडे,<br>रा. शनिमंदिराजवळ, जुना जालना, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा,<br>स्टेशन रोड, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपिलाची तारीख दिनांक १८-०२-२००९ अशी नोंदविलेली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ११-०२-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ११-०२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी

यांच्याकडून प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीने त्यांचे पूर्ण समाधान झाले असल्यामुळे, त्यांनी दिनांक १८-०२-२००९ रोजी आयोगाकडे केलेला द्वितीय अपील अर्ज ते स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे द्वितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण बापुराव कोरडे, शनिमंदिराजवळ, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, स्टेशन रोड, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७३

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

१ श्री. अनिल शंकरराव आव्हाळे, : अपिलार्थी
रा. साकेगांव, पो. पोखरी, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय साकेगांव,
ता. वैजापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
वैजापूर, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झालेली, ग्राम निधी पासबूक, सामान्य खात्याची प्रत आणि दलित वस्तीच्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, एप्रिल २००५ पासून त्यांच्या कार्यक्षेत्रात झालेल्या सामान्य ग्रामसभांचा अहवाल, सदस्यांची उपस्थिती पत्र स्वाक्षरीसहीत, अपिलार्थीने प्रथम अर्ज करेपर्यंत झालेल्या ग्रामपंचायत ठरावाची साक्षांकित प्रत, ग्रामपंचायत व पाणी पुरवठा समितीच्या बँक पास बुकाच्या झेरॉक्स व पैसे कसे काढले त्याचा तपशील, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४६/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे स्वतः गेले असता, हे पत्र स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार दिला आणि नंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २६-०३-२००९ पर्यंत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००९ रोजी ५६६ पृष्ठांची व दिनांक ०४-०४-२००९ रोजी ११७ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस विनामूल्य दिली. तथापि प्राप्त माहिती अपुरी असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०३-२००९ व ०४-०४-२००९ रोजी अनुक्रमे ५६६ व ११७ इतक्या पृष्ठांची माहिती विनामूल्य दिल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील

अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीची तपासणी आयोगाने केली असता, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या ग्राम निधी पासबुक व सामान्य खात्याच्या पासबुकाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस पुरविल्या नसल्याचे आयोगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही सर्वसाधाणपणे अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात ग्रामपंचायतीच्या व पाणी पुरवठा समितीच्या पासबुकाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. परंतु आयोगाकडे द्वितीय अपील करताना त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना ग्राम निधी पासबुक व सामान्य खाते व दलित वस्तीच्या संबंधात अपुरी माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दलित वस्तीच्या संबंधी कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली नव्हती. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ग्रामपंचायतीच्या व पाणी पुरवठा समितीच्या बँक पासबुकाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या, त्यापैकी पाणी पुरवठा समितीच्या पासबुकाची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविल्याचे आयोगास, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी हे आज रोजी आयोगासमोर त्यांनी अपिलार्थीस ग्रामपंचायतीच्या पासबुकाची प्रत दिल्याचे व त्याप्रमाणे त्याचा उल्लेख अपिलार्थीस लिहिलेल्या पत्रामध्ये असल्याचे नमूद करत आहेत. परंतु आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांना, ग्रामपंचायतीच्या पासबुकाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्या, या संदर्भात कोणताही सबळ पुरावा आयोगासमोर

सादर करता आला नाही. तसेच ग्रामपंचायतीच्या पासबुकाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये देखिल समाविष्ट नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायतीच्या पासबुकाच्या प्रतीची मागणी केली आहे, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या ग्रामपंचायतीच्या पासबुकाच्या एप्रिल २००५ ते दि. २५-१२-२००८ या कालावधीतील पासबुकाच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवाव्यात. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल शंकरराव आव्हाळे, साकेगांव, पो. पोखरी, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय साकेगांव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, वैजापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७४

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

१ श्री. फारुक कुरेशी, : अपिलार्थी
मु. पो. ता. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जि. जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असता त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. आर. आर. शिरा, मंडळ कृषी अधिकारी, जालना यांच्या कामासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -त्रयस्थ पक्ष श्री. आर. आर. शिरा यांनी दिनांक ०१-०१-२००८ ते २०-०९-२००८ पर्यंत रोजगार हमी योजनेअंतर्गत तपासणी केलेल्या कामाचे तपासणी अहवाल, त्यांची मासिक दैनंदिनी, पगार पत्रकाच्या व भत्त्याच्या प्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांनी जन माहिती अधिकाऱ्यास उद्देशून दिनांक ०९-०१-२००९ रोजी पत्र लिहिले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे ज्यावेळी त्रयस्थ पक्ष श्री. आर. आर. शिरा यांच्या कामासंदर्भात माहिती मागविली होती त्यावेळी, श्री. आर. आर. शिरा हे स्वतःच जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने ज्यावेळी श्री. शिरा यांच्या दैनंदिनीच्या प्रती मागितल्या होत्या

त्यावेळी श्री. शिरा यांनी त्यांच्या देनंदिनीच्या प्रती कार्यालयास सादर केल्या नव्हत्या. अंतीमतः श्री. शिरा यांनी त्यांच्या दैनंदिनीच्या प्रती तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांच्याकडे सादर केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक ०२-०३-२०१० रोजी पोस्टाने पाठवून दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. आर. आर. शिरा यांच्या बाबतीत मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक असल्यामुळे, ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची कोणतीही हरकत असण्याचे कारण नाही. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे स्वतः ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी उपस्थित झाले याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधित जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०९-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना या संदर्भात पत्र दिल्यानंतर निश्चितपणे ठाऊक असणार. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याच्या सूचना देऊनही त्यानंतर अंदाजे एक वर्षाचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली आहे. अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न होण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर. आर . शिरा हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना केलेल्या कालावधीमध्येही न पुरवून श्री.

आर. आर. शिरा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त कृषि, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. आर. शिरा यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. आयुक्त (कृषि), पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. आर. शिरा (मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. फारुक कुरेशी, मु. पो. ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७५

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गोविंद कोंडीराम शिरगुळे,<br>रा. मोरंडी मोहल्ला, जुना जालना, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-०९-२००८ रोजी माहिती मागविली असता त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर अपेक्षित निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ - २००७ या कालावधीतील काही माहिती एकूण दोन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००६-०७ या वर्षात कमी कापूस उत्पादन मिळालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास चार कोटी ३४ लाख रुपये इतके अनुदान दिले होते. या अनुदानातून किती शेतकऱ्यांना हेक्टरी रक्कम वाटप करण्यात आली, अनुदानातून निधी शिल्लक किती, वाटप किती व रामनगर आणि गोलापांगरी मंडळांतर्गत करण्यात आलेल्या माती बांध, बांध बंदिस्त बंधारे, नाला बंडींग, शेत तळे, कंट्रोल कंम्पाटेमेंट इत्यादी प्रकारच्या रोजगार हमी योजनेतून केलेल्या कामाच्या मजूर हजेरी पुस्तकाच्या प्रती, ज्या शेतकऱ्यांच्या शेतात काम केले आहे त्या शेतकऱ्यांचे सहमती पत्र, मंजूर देयके - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सांक्षांकित स्वरुपात व व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केल्यानंतर, माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिनांक ०७-११-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १६,९००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही केला नाही. अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०१-२००९ रोजी निर्णय देऊन सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर

असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील रद्द केले. अशाप्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना लिहिलेल्या अर्जामध्ये या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २०-१०-२००८ रोजी स्मरणपत्र पाठवूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून, ते ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर त्या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व पूर्णपणे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पार पाडल्याचे दिसून येत आहे. परंतु

अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत न कळविल्यामुळे, त्यांना आता अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य माहिती पुरवावी लागेल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पत्राद्वारे संपर्क साधूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास, अपिलार्थीने जन माहिती अधिकरी यांना दिनांक २०-१०-२००८ रोजी स्मरणपत्र देऊनही, कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर.आर. मंत्री यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. सबब आयुक्त कृषि यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री आर. आर. मंत्री (सध्या तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील निर्णयामध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी या प्रकरणाशी संबंधित त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून संबंधितांकडून ती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (कृषि), पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. आर. मंत्री (सध्या तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोविंद कोंडीराम शिरगुळे, मोरंडी मोहल्ला, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५७६

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. ता. सोनपेठ, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सामाजिक वनीकरण कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक, सामाजिक वनीकरण कार्यालय, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे माहिती प्राप्त न झाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०४-२००५ ते ३०-०६-

२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - माहिती अधिकार कायदा कलम ४ च्या १७ कामांची माहिती, या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला रोजगार हमी योजनेचा एकूण निधी, या योजनेत तालुकानिहाय झालेला खर्च, कामे, कामांवरील मजुरांच्या हजेरीपटाची छायांकित प्रत, कामाची सद्यःस्थिती, तालुकानिहाय रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाच्या मजुरांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेली चौकशी व चौकशींचा अहवाल, दोषीवर करण्यात आलेली किंवा प्रस्तावीत कार्यवाही व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००८ च्या लेखी परीक्षण अहवालाची छायांकित प्रत, अहवालातील आक्षेपांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेला खुलासा यांच्या छायांकित प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ११-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०२-१२-२००८ ते ०५-१२-२००८ या कालावधीमध्ये त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील चारही मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ०२-१२-२००८ ते ०५-१२-२००८ या कालावधीमध्ये विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांच्या स्तरावर माहिती देण्याचे आता बाकी नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने दिनांक ११-११-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात प्रथम अपील केले. त्यावेळी श्री. पाटील नावाचे अधिकारी (सध्या उप वन संरक्षक, वन्यजीव विभाग, औरंगाबाद या पदावर कार्यरत ) या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी का घेतली नाही, याचे कारण त्यांना आता सांगता येणार नाही. कारण ते या पदावर सप्टेंबर २००९ पासून रुजू झाले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या सर्व मुद्यांशी संबंधित माहिती त्यांना मुद्देनिहाय अनुक्रमे दिनांक ०३-१२-२००८, ०५-१२-२००८, १६-१२-२००८ व ०२-१२-२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात एकूण ३०३९ इतक्या पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविल्याचे आयोगास आढळून आले आहे. तथापि ही माहिती पुर्णपणे मिळाली नसल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. परंतु या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त होणे बाकी आहे, याचा कोणताही खुलासा केलेला नाही अथवा हे तोंडी स्पष्ट करण्यासाठी देखिल ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याबाबतचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केला नसल्याने, सबळ

पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१० राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, मु. पो. ता. सोनपेठ, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७८४

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

१ श्री. दत्तात्रय बळीराम खरात, : अपिलार्थी
निळकंठनगर, जुना जालना,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २३-०७-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या अपील अर्जाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना,

अधीक्षक भूमि अभिलेख, जालना व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी त्यांना उशिरा का होईना पण समाधानकारक माहिती दिली असल्यामुळे, त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे.

खुद्द अपिलार्थीने, त्यांचे आयोगाकडे सादर केलेले विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्यामुळे, अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय बळीराम खरात, निळकंठनगर, जुना जालना, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६४

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

१ सौ. सविता गोविंद चव्हाण, : अपिलार्थी
रा. डोंगरगांव (नाका), पो. वाकोडी, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, डोंगरगांव (नाका), तालुका
कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची, दिशाभूल करणारी व अधिकची माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी ग्रामपंचायतीस १००० रुपयापर्यंत खर्च येत आहे असे कळविले व ही रक्कम ग्रामपंचायत कार्यालयामध्ये भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर अपिलार्थीने या रकमेचा भरणा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये दिनांक ०३-०२-२००९ रोजी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७ व १८-०२-२००९ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती प्रमाणित करुन देण्याचे व अपिलार्थीकडून माहितीपोटीचे जादा स्वीकारलेले शुल्क त्यांना परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर, अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी जादाचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३९३ इतके त्यांना, धनादेशाव्दारे परत केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अनावश्यक माहिती पुरविली असून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे सन २००७-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली असताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सन २००३ पासूनची माहिती देऊन त्यांना माहितीसाठीचा जादा खर्च करणे भाग पाडले. जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिलेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे अशी विचारणा आयोगाने केली असता, या मुद्दयावर अपिलार्थी कोणतेही स्पष्टीकरण आयोगासमोर करु शकल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे पती हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा गैरवापर करुन, त्यांच्याकडून वारंवार पैशाची मागणी करत असतात व पैसे न दिल्यास त्यांना धमक्या देत असतात. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७ व १८-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. सन २००३ पासूनची माहिती त्यांनी अपिलार्थीस चुकीने पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जरी प्रतिसाद दिला असला तरी, हा प्रतिसाद चुकीचा आहे, कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०१-२००९ रोजी लिहिलेल्या पत्रामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील - संभावित माहितीच्या पृष्ठांची संख्या,

माहिती पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर - दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील कळविणे अनिवार्य आहे, परंतु या प्रकरणी जन माहिती अधिका-याने अशा प्रकारचा कोणताही तपशील अपिलार्थीस न कळवून अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीचा भंग केला आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १००० इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. या १००० रुपयापैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३९३ रुपये इतकी रक्कम धनादेशाव्दारे परत केली आहे. आता उर्वरित रुपये ६०७ इतकी रक्कम त्यांना अपिलार्थीस परत करावी लागेल. सदर रक्कम त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत परत करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही चुकीची, दिशाभूल करणारी कशी आहे या मुद्दयावर, अपिलार्थी आयोगाकडे कोणतेही समाधान-कारक स्पष्टीकरण न करु शकल्यामुळे, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेला, त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली गेली, हा मुद्दा, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकृत केलेले जादाचे शुल्क रुपये ६०७ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सविता गोविंद चव्हाण, रा. डोंगरगांव (नाका), पो. वाकोडी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, डोंगरगांव (नाका), तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६५

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. देवचंद केशरलाल डोंगरजाल (राजपूत),<br>रा. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, घारदोन, तालुका जिल्हा<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी टाळलेले असल्यामुळे, त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे रुपये २५००० इतकी शास्तीची कार्यवाही करावी व या प्रकरणी अपिलार्थीस झालेल्या आर्थिक नुकसानी-पोटी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम १९ (८) (ख) मधील तरतुदी-नुसार, नुकसानभरपाई मंजूर करावी आणि अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या घरासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - घर क्रमांक ३५० च्या फेरफार नोंद रजिस्टरच्या प्रती, नमुना नंबर ८ च्या उता-याच्या प्रती, घराच्या चतुःसीमा, घराच्या जागेच्या हद्दी, ज्यावेळी घराचे बांधकाम केले त्यावेळी दिलेल्या बांधकाम परवान्याची प्रत आणि ग्रामपंचायतीमध्ये भरलेल्या कर शुल्काच्या पावत्याच्या प्रती - या मुद्दयाचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत या अर्जाशी संबंधित माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ती माहिती घेण्याचे नाकारले व अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही स्वतंत्र आदेश पारीत न करता, त्यांच्याकडील अभिलेख्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर होते, तथापि काही कामानिमित्त जन अपिलीय अधिकारी हे बाहेर गेले असता, अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीत सुनावणी स्थळापासून निघून गेले. अपिलार्थीने सुनावणीचे स्थळ सोडले व नंतर त्याच दिवशी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे जी माहिती मागितली होती ती अपिलार्थीने स्वतःच केलेल्या अनधिकृत बांधकामाशी संबंधित होती. अपिलार्थीने त्यांचे बांधकाम नियमानुकूल करुन घेण्याकरिता माहिती अधिकाराचा वापर केला आहे. अपिलार्थीचे घर हे अनधिकृत असताना या घराला ग्रामपंचायतीतर्फे घर क्रमांक कसा देण्यात आला, याची आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेला घर क्रमांक हा ग्रामपंचायतीने दिलेला नसून, तो अपिलार्थीने स्वतःच दिला असल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी ज्या बांधकामाशी संबंधित केली ते बांधकाम मूळात अनधिकृत असल्याने व तसेच मूळ अर्जामध्ये नमूद केलेला घर क्रमांक स्वतःच अपिलार्थीने दिल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी अर्जदारास देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अस्तित्वात नसलेली व अमूर्त स्वरुपातील माहिती मागविल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मूळात देय होत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे, त्यांचे अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करण्याच्या प्रयत्नाचा एक भाग आहे, असे आयोगास या प्रकरणी आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने

ती नाकारली व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थी गैरहजर राहिले व आज देखील आयोगाकडील सुनावणीस ते अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी उपस्थित नसल्याने जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ग्राह्य धरण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देवचंद केशरलाल डोंगरजाल (राजपूत), रा. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६६

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

१ श्री. निकाळजे संजय जयवंत, : अपिलार्थी

जयभिमनगर, घाटी, जेतवन बुध्द विहारामागे,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वॉर्ड अधिकारी,

वॉर्ड 'अ', महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : करनिर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. पुंडलीक खिल्लारे, सौ. पद्माबाई रतन जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. पांडुरंग खिल्लारे यांच्या घराचे टॅक्स रजिस्टर सन १९८८-८९ ते २००९ या कालावधीच्या सत्यप्रती व सौ. पद्माबाई रतन जाधव यांनी स्वतःच्या नावाने करुन घेतलेले घर कोणत्या कागदपत्राच्या आधारे घेतले या सर्व पेपरच्या सत्यप्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०५-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस दिनांक १२-०५-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष सौ. पद्माबाई रतन जाधव हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०५-२००९ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले. तथापि त्यांनी अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती दिली ती माहिती त्यांना आयोगास दाखविता आली नाही.

त्रयस्थ पक्ष सौ. पद्माबाई रतन जाधव यांनी असा युक्तिवाद केला की, घरासंबंधी माहिती अपिलार्थीस उघड करु नये कारण अपिलार्थी हे त्यांना त्यांचे घर काबीज करण्यासाठी वारंवार

धमक्या देत आहेत. अपिलार्थीचा त्यांच्या घराच्या मालकीहक्काशी कोणताही संबंध नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देऊ नये.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची आहे, ती माहिती सार्वजनिक प्राधिकरणाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या कोणत्याही खाजगी बाबींशी संबंधित नाही, कारण महानगरपालिका हद्दीमध्ये कोणत्याही मालमत्तेचे हस्तांतरण होत असताना ही बाब वैयक्तीक अथवा खाजगी अशा स्वरुपाची राहत नाही, कारण अशा प्रकारचे हस्तांतरण करत असताना बरीच सार्वजनिक प्राधिकरणे वर्तमानपत्रातून जाहीर नोटीस प्रसिध्द करुन, नागरिकांच्याकडून त्यांच्या हरकती मागवत असतात. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारची पध्दत प्रचलीत आहे किंवा कसे, याची आयोगास कल्पना नाही, परंतु अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे त्रयस्थ पक्षाची अपिलार्थीस माहिती उघड करु न देण्यासंदर्भातील हरकत, अधिक्रमित करुन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण मुद्देनिहाय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या अर्जातील माहिती, अपिलार्थीस दिनांक १२-०५-२००९ पर्यंत देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले असतानाही, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०५-२००९ पर्यंत माहिती उपलब्ध करुन न देऊन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या

अभावाबद्दल, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण मुद्देनिहाय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. निकाळजे संजय जयवंत, जयभिमनगर, घाटी, जेतवन बुध्द विहारामागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड 'अ', महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०४

निर्णय दिनांक ०८-०४-२०१०

१ श्री. बद्रीनारायण रामेश्वर उपरे, : अपिलार्थी
जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी,
ऑ. नं. २७, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यामध्ये असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी

सुनावणी ठेऊनही सुनावणी घेतली नाही व त्यांना माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यातील दिनांक ०१-०४-२००७ ते दिनांक ३१-०३-२००८ या कालावधीमधील, त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या पाझर तलावाच्या गावांची नावे आणि पाझर तलावावरील मजुराच्या मस्टरच्या छायांकीत प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रुपये ५ व रुपये ४ या दराने एकूण रुपये २५०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १५-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय पारीत न केल्यामुळे आणि परिणामी अपिलार्थी अपेक्षित माहितीपासून वंचित राहिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे ते, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद हा चुकीचा आहे. राज्य शासनाने प्रतिपृष्ठ रुपये दोन या दराने माहिती पुरविण्याचे त्यांच्याकडील अधिसूचना क्रमांक आर. टी. आय. २००५/सिआर.आर. ३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ अन्वये आदेशित करुनही, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी चुकीचे दर कळविले आहेत. तसेच अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविताना, या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे त्यांना देणे अभिप्रेत होते, तो न दिल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य द्यावी लागेल. ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असल्याचे त्यांनी आपल्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही

माहिती संबंधितांकडून स्वतः हस्तगत करुन घ्यावी. अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बद्रीनारायण रामेश्वर उपरे, जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी, ऑ. नं. २७, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२६
निर्णय दिनांक : ०९.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गव्हाण चंद्रकांत पिराजी,<br>रा.कामठा (बु.), ता.अर्धापूर,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दि. १ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर,२००८ या कालावधीमध्ये गुरु-ता-गद्दी सोहळा कार्यक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या अतिरिक्त रॉकेलच्या कोटयाच्या परिमाणासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -कोटयाचे परिमाण, अतिरिक्त कोटा वितरीत केल्याचा तपशील, हा कोटा कोणाला वाटप केला, वाटप करण्याचे कारण काय? वाटप करण्यात आलेल्या रॉकेलमध्ये कोणाला व कोणत्या संस्थेला फायदा झाला व या वितरण व्यवस्थेतील देखरेख केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी व माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,नांदेड यांच्याकडे दि. १६.१२.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १६.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अतिरिक्त जिल्हाधिकरी यांनी त्यांच्या दि. २४.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. २६.०२.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांनी ही माहिती पोस्टाद्वारे पाठविल्याबद्दलचा आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील, "रॉकेल वितरण व्यवस्थेवर कोणत्या कर्मचाऱ्यांनी देखरेख केली,याची माहिती", या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे आढळून येत नाही. ही माहिती

आता अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास या प्रकरणी असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी मागणी केलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब जिल्हाधिकारी,नांदेड यांना, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक कर्मचारी/अधिकारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी असे समजावे अशी तरतुद आहे, अशा सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली,अद्याप द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.
३. जिल्हाधिकारी,नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गव्हाण चंद्रकांत पिराजी,रा.कामठा (बु.), ता.अर्धापूर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२७
निर्णय दिनांक : ०९.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एकनाथ मल्हारराव बनसोडे,<br>रा.हदगाव,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,किनवट,<br>जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, किनवट,<br>जि. नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना तहसील कार्यालय,किनवट यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ऑक्टोबर,२००४ ते नोव्हेंबर, २००६ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तहसीलदार,किनवट यांचे पत्र क्र. २००६/दि. १८.११.२००६ ची प्रत, तहसीलदार, किनवट यांनी स्थायी/अस्थायी कर्मचाऱ्यांच्या दैनंदिनीचे फेब्रुवारी, २००४ ते डिसेंबर, २००५ पर्यंत केलेल्या समीक्षणाच्या प्रती, जानेवारी, २००६ ते नोव्हेंबर, २००६ पर्यंत केलेल्या समीक्षणाची प्रत, तहसील कार्यालय, किनवट अंतर्गत कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे

आदिवासी भत्ता प्रदान करण्यात आला आहे काय? जर प्रदान झाला नसेल तर त्याची कारणे आणि तहसील कार्यालय, किनवट अंतर्गत फेब्रुवारी, २००४ ते नोव्हेंबर,२००६ या कालावधीत नियमाप्रमाणे मुदतीत आक्षेप ३ महिन्याच्या आत, ६ महिन्याच्या आत, ९ महिन्याच्या आत, १ वर्षाच्या आत प्रवासभत्ता दाखल केलेल्या कर्मचाऱ्यांची नावे व देयकाच्या रकमेचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.१२.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. ०४.११.२००८ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,श्री. डुकरे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केला असता, आणि त्यांचा वारंवार पाठपुरावा केला असताना देखील श्री. डुकरे यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. तसेच या प्रकरणी त्यांनी दि. १२.१२.२००८ रोजी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी, श्री. लाड यांच्याकडे प्रथम अपील केले असता, श्री. लाड यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा त्यांच्याशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही. त्यांना या प्रकरणी श्री डुकरे यांनी हेतूपुरस्सर माहिती देण्याचे टाळले असल्यामुळे श्री. डुकरे यांच्यावर एकूण रु,२५,००० इतकी शास्ती लावण्यात

यावी व तसेच त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्वरित मिळावी.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ वगळता उर्वरित सर्व माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने, 'तहसील कार्यालय, किनवट येथील कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर,२००४ ते मार्च २००५ पर्यंत नियमाप्रमाणे आदिवासी भत्ता प्रदान करण्यात आला आहे काय? जर प्रदान झाला नसेल तर त्याची कारणे', अशी माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे.माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अशाप्रकारच्या माहितीचा समावेश होऊ शकत नाही. अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना विचारणे आणि त्यांनी अर्जदारास त्या कृतीचे अथवा निर्णयाचे समर्थन वा स्पष्टीकरण देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा मूलतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींमध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती देय असणार नाही. मात्र उर्वरित चारही मुद्यांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ वगळता उर्वरित

सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. डुकरे (सध्या नायब तहसीलदार, मुदखेड या पदावर कार्यरत ) यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची उपेक्षा करुन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवले आहे व अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीचा भंग केला आहे. अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्याच्या त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ अथवा साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याची कोणतीही शक्यता या प्रकरणी संभवत नाही. परंतु तरीही अधिनियमातील कलम ७(२) च्या तरतुदी लक्षात घेता, संबंधित जन माहिती अधिकारी,श्री. डुकरे यांनी अपिलार्थीस, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती नाकारली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. त्यामुळे श्री. डुकरे यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय

वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी आयोग तत्कालीन तहसीलदार,किनवट श्री. लाड यांच्या या प्रकरणीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणी संदर्भातील वर्तनाबद्दल नापसंती व्यक्त करीत असून त्यांच्या या प्रकरणातील बेजबाबदार कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी,नांदेड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली,अद्याप द्यावयाची राहिलेली मुद्दा क्र. ४ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी श्री. डुकरे यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एकनाथ मल्हारराव बनसोडे, नागसेननगर, मु.पो. ता. हदगाव, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. डुकरे, नायब तहसीलदार, मुदखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५. जिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७८१/०९,७८२/०९,७८३/०९ व ७८४/०९

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७८१,७८२,७८३ ७८४
निर्णय दिनांक: ०९-०४-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०२.२००९ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अर्जांमध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.१२.२००८ रोजीच्या चार स्वतंत्र अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जांना संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार दि. ०६.०१.२००९ रोजी चार स्वतंत्र प्रथम अपिले केली. सदर अपिलांवर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.०२.२००९ रोजी पारित केले. या आदेशांव्दारे त्यांनी अपिलार्थीची अपिले निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी यांना आदेशित केले. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेली विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दि. ०९.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जांद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक

सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. ०६.०२.२००९ रोजींचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेली त्यांची व्दितीय अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.७८१/०९,७८२/०९,७८३/०९ व ७८४/०९ फेटाळण्यात येत आहेत.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे या प्रकरणांशी संबंधित दि. ०६.०२.२००९ रोजींचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०९-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद ४१३५०१.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७८५/०९, ७८६/०९, ७८८/०९ व ७८९/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७८५,७८६,७८८ व ७८९
निर्णय दिनांकः ०९-०४-२०१०

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. कार्यकारी संचालक, : प्रतिवादी
तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,
ढोकी, ता.जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००९ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अर्जांमध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे दंड आकारण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०२.२००९ रोजीच्या चार स्वतंत्र अर्जाव्दारे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी, ता.जि. उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. या अर्जांना संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार दि. ०२.०४.२००९ रोजी चार स्वतंत्र प्रथम अपिले केली. सदर अपिलांवर प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.०६.२००९ रोजी पारित केले. या आदेशांव्दारे त्यांनी अपिलार्थीची अपिले निकाली काढून, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी यांना आदेशित केले. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेली विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दि. ०९.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जांद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित साखर कारखान्यास, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्र.८३८२/२००८, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्यादित, शिरोली, जुन्नर, जि.पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणामध्ये दि. ०८.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय, विचारात घेणे आवश्यक आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने संबंधित सहकारी साखर कारखाना हा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘सार्वजनिक प्राधिकरण’ या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचा असल्याचे स्पष्ट केले आहे.

विचाराधीन प्रकरणाशी संबंधित साखर कारखान्याची वस्तुस्थिती ही मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या साखर कारखान्यासारखीच असल्याचे आढळून येत आहे.

अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित सहकारी साखर कारखान्यास लागू होत नसल्याने प्रादेशिक

सहसंचालक (साखर), नांदेड यांचे दि. २०.०६.२००९ रोजींचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेली त्यांची व्दितीय अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.७८५/०९, ७८६/०९, ७८८/०९ व ७८९/०९ फेटाळण्यात येत आहेत.

२. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे या प्रकरणांशी संबंधित दि. २०.०६.२००९ रोजींचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०९-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, आनंदनगर, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद ४१३५०१.

२. कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., ढोकी (तेरणानगर), ता.जि.उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नेहरु इंग्लीश स्कूल समोर, टिळकनगर, नांदेड, जि.नांदेड.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२३

निर्णय दिनांक ०९-०४-२०१०

१ श्री. वडजे माधवराव रामराव, : अपिलार्थी

मु. खंडगांव (हा), पो. बोमनाळी, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तहसीलदार, नायगांव, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नायगांव तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांच्या बाबतीत दिनांक ०७-०२-२००७ ते सन २००८ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांनी स्वस्त धान्य दुकानदारांच्या घेतलेल्या बैठकीची संख्या, बैठकीत ठेवण्यात आलेले विषय,मिटींग व प्रोसेडींग रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, पास करण्यात आलेल्या ठरावाची प्रत, स्वस्त धान्य

दुकानदारासंदर्भात मंडळ अधिकारी, तलाठी यांना देण्यात आलेल्या आदेश पत्राच्या प्रती, दुकानदारांच्या चौकशीचे अहवाल, चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव व पद, प्रत्येकाने आपल्या आदेशाचे पालन केले किंवा नाही, आदेशाचे पालन केले नसल्यास त्या अधिकाऱ्यांवर केलेली कार्यवाही, चौकशी अहवालात आढळून आलेल्या दुकानदारांच्या संख्या व दोषी दुकानदारांवर करण्यात आलेली कार्यवाही - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे, याचा उल्लेख केला नव्हता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-१०-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस दिनांक ३०-०१-२००९ रोजी संपूर्ण माहिती मुद्देनिहाय पुरविली आहे. ही माहिती त्यांनी प्रथमतः कंधार तहसील कार्यालयाच्या शिपायामार्फत अपिलार्थीकडे पाठविली होती. प्रत्यक्षात ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे हे त्यांना माहिती नाही, परंतु दिनांक २६-०३-२०१० रोजी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांना समक्ष भेटले असता, त्यांनी अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित माहिती अपिलार्थीस

प्राप्त झाली नसल्याचे सांगितले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०३-२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३०-०३-२०१० रोजी माहिती पाठविल्याचा पुरावा (रजिस्टर्ड पोस्टाची पावती) आयोगासमोर सादर केला. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टने पाठविली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ही माहिती कोणत्या माध्यमाद्वारे हवी आहे याचा उल्लेख केला नव्हता, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी अनुमान काढून माहिती तयार करुन, नंतर ती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांनी अपिलार्थीची वाट पाहिली. तथापि अपिलार्थी त्यांच्याकडे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी विहित मुदतीत न आल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविता आली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ वगळता, उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्रमांक ७ द्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने आणि ती जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणाऱ्या स्वरुपाची असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. तथापि असे जरी असले तरीही या प्रकरणी जन माहिती

अधिकाऱ्याने अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना कोणत्या माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे याचा उल्लेख केला नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कोणती कारवाई आयोग आदेशित करीत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०३-२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरविलेल्या माहितीवर अपिलार्थीने आयोगाकडे आजवर त्यांचा कोणताही लेखी आक्षेप नोंदविलेला नाही अथवा हा आक्षेप तोंडी स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचा निष्कर्ष काढून, अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वडजे माधवराव रामराव, मु. खंडगांव (हा), पो. बोमनाळी, ता. कंधार, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगांव, जि. नांदेड यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२४

निर्णय दिनांक ०९-०४-२०१०

१ श्री. वडजे माधवराव रामराव, : अपिलार्थी

मु. खंडगांव (हा), पो. बोमनाळी, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तहसीलदार, लोहा, जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय लोहा, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षत्रामध्ये दिनांक ०५-०४-२००७ ते ३०-०९-२००८ या

कालावधीमध्ये स्वस्त धान्य दुकानदारांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांनी स्वस्त धान्य दुकानदारांच्या घेतलेल्या बैठकीची संख्या, बैठकीत ठेवण्यात आलेले विषय, मिटींग व प्रोसेंडींग रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, पास करण्यात आलेल्या ठरावाची प्रत, स्वस्त धान्य दुकानदारासंदर्भात मंडळ अधिकारी, तलाठी यांना देण्यात आलेल्या आदेश पत्राच्या प्रती, दुकानदारांच्या चौकशीचे अहवाल, चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव व पद, प्रत्येकाने आपल्या आदेशाचे पालन केले किंवा नाही, आदेशाचे पालन केले नसल्यास त्या अधिकाऱ्यांवर केलेली कार्यवाही, चौकशी अहवालात आढळून आलेल्या दुकानदारांच्या संख्या व दोषी दुकानदारांवर करण्यात आलेली कार्यवाही - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे व व्यक्तिशः अशा दोनही स्वरुपात मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील कोतवालामार्फत पुरविली. तथापि माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयातील कोतवालामार्फत पाठविली

आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ आयोगाने त्यांच्याकडे पुराव्याची मागणी केली असता, त्यांनी कोतवालाचे रजिस्टर आयोगास सादर केले. या रजिस्टरवर फक्त कोतवालाच्या सह्या आहेत. या रजिस्टरवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरीच माहिती पाठविली आहे किंवा नाही याची सत्यता पडताळून पाहता येत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे, हे त्यांना आयोगास आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी मान्य करता येत नाही. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीकडून, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०/- इतके मागितले असताना अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस, तहसीलदार/उपविभागीय अधिकारी यांनी स्वस्त धान्य दुकानदारावर केलेल्या कार्यवाहीच्या आदेशाच्या प्रती पुरविता आल्या नाहीत. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळवितांना, अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे या शुल्काचा तपशील अपिलार्थीस न कळविल्यामुळे, त्यांना आता अपिलार्थीस या आदेशाच्या प्रती विनामूल्य द्याव्या लागतील. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस देय असलेल्या सर्व

कागदपत्राच्या प्रतीसह त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वडजे माधवराव रामराव, मु. खंडगांव (हा), पो. बोमनाळी, ता. कंधार, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७२५

निर्णय दिनांक ०९-०४-२०१०

१ सौ. अनुसया आनंदराव शिंदे, : अपिलार्थी
एन डी. ४२ एच ३२/०४, ज्ञानेश्वर स्टॉप, पंचशिल चौक,
हडको, नवीन नांदेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय कंधार, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अपर जिल्हाधिकारी, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तलाठी सजा, दहिकळंबा, ता. कंधार, जि. नांदेड
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय कंधार, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना फेरफारच्या नकला न मिळाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, मौजे

दहिकळंबा, तालुका कंधार येथील शेत जमीन गट क्रमांक २६९, क्षेत्र १ हेक्टर जमिनीचा फेर क्रमांक ५७९ च्या नकलेची प्रत, तहसीलदार कंधार यांना मागितली होती. तथापि ही प्रत त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी या अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच नायब तहसीलदार, कंधार श्री. रऊफ खान यांनी आयोगास, अपिलार्थीचे तलाठी सजा, दहिकळंबा यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ११-०९-२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना तलाठी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्यांकडून प्राप्त झाली असून, त्या विचाराधीन अपील क्रमांक ७२५/२००९ हे स्वखुषीने मागे घेत आहेत. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, मौजे दहिकळंबा यांनी यासोबत अपिलार्थीस त्यांनी दिनांक ११-०९-२००९ रोजी पुरविलेल्या माहितीची प्रत सादर केली असून, त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही त्यांच्या मूळ अर्जातील माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

खुद्द अपिलार्थीने, त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, ते खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. अनुसया आनंदराव शिंदे, एन डी. ४२ एच ३२/०४, ज्ञानेश्वर स्टॉप, पंचशिल चौक, हडको, नवीन नांदेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा, दहिकळंबा, ता. कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८८

निर्णय दिनांक ०९-०४-२०१०

१ श्री. रामकिशन भाऊराव क्षिरसागर, : अपिलार्थी

रा. आडगांव, तालुका लोहा,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा,

तालुका लोहा, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे आडगांव या कोपन दुकानाची माहिती शिघ्र टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौजे आडगांव येथील दुकानास मिळणारे एकूण रॉकेलचे लीटरमध्ये परिमाण, प्रत्येक कुटूंबास मिळणारे रॉकेल, एकूण गहू व तांदूळ, एकूण प्राप्त होणा-या गहू व तांदळाचे परिमाण, एका कुटुंबास मिळणा-या गहू व तांदळाचे परिमाण, दारिद्र्यरेषेखालील एकूण कार्डधारक, अंत्योदय एकूण कार्ड, अन्नपूर्णा योजना एकूण कार्ड, यांची संपूर्ण नांवासह यादी, रॉकेल प्रति लीटर किंमत, दारिद्र्यरेषेखालील लोकांना प्रति किलो किती किंमत द्यावी लागते, अंत्योदय लोकांना किती किंमत द्यावी लागते - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक ०३-०६-२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज तहसीलदार, लोहा यांच्याकडे दिनांक १२-०६-२००८ रोजी पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर तहसीलदार, लोहा यांनी दिनांक २७-०६-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस मोफत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यापूर्वीच अपिलार्थीने, प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याची मुदत व्यपगत होण्याच्या आधीच, वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी व अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या कोतवालामार्फत माहिती पाठविली होती, तथापि ही माहिती अपिलार्थीने स्वीकृत केली नाही व तसेच कोतवालाने देखील त्यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती त्यांच्या कार्यालयास परत केली नाही, त्यांच्या या विधानापुष्ट्यर्थ त्यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीची स्थळप्रत आयोगास दाखविली. या स्थळप्रतीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खाडाखोड केली असून, हे पत्र पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही, असे म्हणणे जास्त संयुक्तीक होईल, असे आयोगास वाटते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील अंशतः भाग हा कायम बदलणा-या अशा स्वरुपाचा आहे व काही भाग हा स्थायी स्वरुपाचा आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील, आडगाव येथील दुकानदाराकडे दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेशी संबंधित एकूण कार्डधारक लाभार्थी, अन्नपूर्णा योजनेचे एकूण कार्डधारक लाभार्थी व या लाभार्थ्यांची यादी, हा भाग अस्थायी स्वरुपाचा व रॉकेलची प्रति लीटर किंमत, दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेखालील लोकांना देण्यात येणा-या रॉकेलची प्रति लीटर किंमत हा भाग स्थायी स्वरुपाचा आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या संबंधातील कालावधीचा उल्लेख केलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ज्या माहितीमध्ये वेळोवेळी फरक पडत असतो, ती माहिती अपिलार्थीस देय होत नाही, मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील स्थायी स्वरुपाची माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस मौजे आडगांव येथील कोपन दुकानदाराशी संबंधित अंत्योदय योजना व

दारिद्र्यरेषेखालील लोकांना ज्या दराने रॉकेलचा पुरवठा करण्यात येतो तो दर आणि शासनाने विहित केलेले परिमाण, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, संबंधित जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस कधी पुरविली हे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या स्थळप्रती त्यांना आयोगास दाखविता आल्या नाहीत. या विषयावर अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राच्या स्थळप्रतीवर दिनांकाचा उलेख नाही, यावरुन अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, असा निष्कर्ष काढण्यात येऊन उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीव्दारे स्पष्ट केलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली स्थायी स्वरुपाची माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड टपालाव्दारे पुरवावी.

३.	जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. रामकिशन भाऊराव क्षिरसागर, रा. आडगांव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८९

निर्णय दिनांक ०९-०४-२०१०

१ श्री. असदखान महेबुबखान, : अपिलार्थी

रा. अंजनखेड, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

तहसील कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माहूर,

तालुका माहूर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. सुधाकर तुकाराम गोकनवार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून दिनांक ०५-०२-२०१० रोजी लिहिलेले व आयोगास दिनांक ११-०२-२०१० रोजी प्राप्त झालेले पत्र आयोगास सादर

करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना या प्रकरणी आवश्यक असलेली माहिती तहसील कार्यालय, माहूर यांच्याकडून प्राप्त झाली असून, या प्रकरणी त्यांचा कोणत्याही प्रकारचा आक्षेप नाही, त्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकत नाहीत. या पत्रामध्ये त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील क्रमांक २१८९/२००८ हे मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. खुद्द अपिलार्थीनेच आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. असदखान महेबुबखान, रा. अंजनखेड, तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१९०

निर्णय दिनांक ०९-०४-२०१०

१ श्री. भगवान किशनराव पाटील, : अपिलार्थी
मु. पो. गडगा, तालुका नायगांव,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

'१. दि. २९-६-२००६ रोजी मा. तहसीलदार यांनी दाखल केलेल्या दोषारोप पत्रातील आज तारखेपर्यंत चौकशी अहवालाची प्रत केलेल्या कार्यवाहीची प्रत देणे.

२. २१-९-२००७ रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे मी दिलेल्या अर्जाची चौकशी अहवाल व कार्यवाही कोणती केली लेखी माहिती द्यावी.

३. दि. २२ मे २००८ रोजी मा. विभागीय आयुक्ताने दिलेल्या पत्राचे संबंधात २ मे च्या अहवालाचे आनुसार संबंधीत दोषी कर्मचा-यावर केलेल्या कार्यवाहीची प्रत (माहिती) द्यावी. '

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून केला होता, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तहसीलदार यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यावरुन त्यांनी दिनांक २६-०८-२००८ रोजी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत तहसीलदार, नांदेड यांना पाठविली. नायब तहसीलदार (म.२), नांदेड यांनी त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे कळवून अपिलार्थीस दिनांक १६-०९-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात चर्चा करण्यासाठी बोलाविले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांनी दिनांक २४-११-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ हा उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांच्याकडून व मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती, अपिलार्थीने उपविभागीय अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-११-२००८ रोजी परस्पर प्राप्त करुन घेतली आहे. मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०४-२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टानेही पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मुद्दा क्रमांक १ शी संबंधित, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. दिनांक २९-०६-२००६ रोजी तहसीलदाराने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कोणत्या प्रकरणात आणि कोणाच्या विरुध्द चौकशी अहवाल सादर केला आहे, याचा कोणताही संदर्भ त्यांनी या माहितीमध्ये दिलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे, परिणामी ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ व्दारे, दिनांक २१-०९-२००७ रोजी, त्यांनी भ्रष्टाचार निर्मुलन समितीकडे केलेल्या अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाने सदरचा तक्रार अर्ज उपविभागीय अधिकारी, नांदेड यांच्याकडे चौकशीसाठी दिल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अवगत केले. यावरुन

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक २४-११-२००८ रोजी पुरविली गेल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०४-२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशा प्रकारे आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती त्यांना संबंधितांकडून उपलब्ध करुन देण्यात आल्याचा आयोग निष्कर्ष काढत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाची, महसूल यंत्रणेकडून वेगवेगळया पातळीवर उपेक्षा झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करताना जन-सामान्यांना कशा प्रकारे माहिती देण्यात येऊ नये व स्वतःवरील जबाबदारी कशा प्रकारे इतरांवर टाकून, ती स्वतः कशी टाळावी याचे, या प्रकरणी सर्व संबंधितांनी केलेली कार्यवाही म्हणजे एक उत्तम नमुना ठरेल, असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा देखील केला होता, यावरुन व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्याकरिता प्रयत्न केल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एका मुद्दयास, संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी प्रतिसाद देण्यासाठी लावलेला अंदाजे दीड वर्ष इतका कालावधी हा कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय होऊ शकत नाही, त्यामुळे या प्रकरणी, या प्रकरणातील संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक ज्यांना,

माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, अशा सर्वांवर एकत्रितपणे प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे या प्रकरणाशी त्यांचे संबंधित सर्व सहायक, यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान किशनराव पाटील, मु. पो. गडगा, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१०
निर्णय दिनांक : १२.०४.२०१०

१. श्री. बाबुराव लक्ष्मणराव वाघमारे, : अपिलार्थी
रा.विजयनगर (दगडपूर),ता.बिलोली,जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार,बिलोली,जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. बसवंत महादयअप्पा बामने

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष अर्धघाऊक केरोसीन विक्रेता,श्री. बसवंत महादयअप्पा बामने, परवाना क्र. ६४/९४ यांना वाटप केलेल्या केरोसीनच्या संदर्भात जानेवारी, २००८ ते सप्टेंबर, २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाच्या नावाने दरमहा किती के.एल. रॉकेल येते, किरकोळ केरोसीन परवानाधारक यांना दरमहा किती वाटप केले जाते आणि तसेच दरमहा नियतनाची प्रत, त्रयस्थ पक्ष मयत झाले असताना आजतागायत मयताचे नावच चालू

आहे का नाव परिवर्तन केले, याची माहिती, या परवानाधानकाअंतर्गत किरकोळ परवानाधारकांची संख्या, त्यांचे संपूर्ण नाव, वाटप रजिस्टर, स्टॉक रजिस्टर,बीलबुक आणि दरमहा वाटप केलेल्या रजिस्टर व बिलानुसार माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीचा हा अर्ज तहसील कार्यालय,बिलोली येथे दि. ०४.१०.२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ तहसील कार्यालयाच्या लिपीकाने कार्यालयाच्या शिक्क्यासह पोचसही अपिलार्थीस दिलेली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी,नांदेड यांच्या कार्यालयाकडे यासंदर्भात दि. २२.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या लिपीकाने कार्यालयाच्या शिक्क्यासह त्यांची पोचसही अपिलार्थीस दिलेली आहे. परंतु या अपील अर्जावर जिल्हाधिकाऱ्याने कोणतीही कार्यवाही न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,बिलोली यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असून ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) बिलोली यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीचा भंग केला आहे. अशाप्रकारे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), बिलोली यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब सचिव, महसूल यांना या प्रकरणाशी संबंधित नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बिलोली (दि.०४.१०.२००८ पासून पुढे तीस दिवसांपर्यंत कार्यरत असलेले) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) नुसार 'माहिती अधिकारी' समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,बिलोली (दि. ०४.१०.२००८ पासून पुढे तीस दिवसांपर्यंत कार्यरत असलेले) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबुराव लक्ष्मणराव वाघमारे,रा.विजयनगर (दगडपूर),ता.बिलोली,जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, बिलोली, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९११
निर्णय दिनांक : १२.०४.२०१०

१. श्री. जबीउल्ला महेबूबखॉन, किनवट,जि.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट,जि.नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : मौ.कोपरा येथील स्वस्त धान्य दुकान क्र.४० चे दुकानदार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्यामुळे, व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कधीही सुनावणी घेतली नाही व त्यांना या प्रकरणी फक्त पुढील तारीख देत राहिले. त्यामुळे ते व्यथित झाले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी

यांच्याकडे, मौ. कोपरा ता.किनवट येथे स्वस्त धान्य दुकान क्र. ४० मध्ये सन २००५ ते दि. १३.१०.२००८ या कालावधीमध्ये,या दुकानातर्फे प्रतिमाह उचललेल्या मालाची नोंद, विक्रीची नोंद (साठवणपुस्तकासह) अंत्योदय,बी.पी.एल. कार्डधारकांना रेशन कार्ड वाटप अहवाल, आजपावेतो माल वितरण व दुकान दप्तर तपासणी अहवालाच्या प्रमाणित नकला व रॉकेल उचल व रॉकेल विक्रीच्या नोंदी व त्या अनुषंगाने तहसील पुरवठा अधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायाच्या नोंदी, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज तहसीलदार,किनवट यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तहसीलदार,किनवट यांच्याकडे यासंदर्भात दि. १७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे किंवा कसे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केला असल्याचे कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,किनवट यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असून ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) किनवट यांना

असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दि. १३.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीचा भंग केला आहे. अशाप्रकारे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), किनवट यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब सचिव, महसूल यांना या प्रकरणाशी संबंधित नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट (दि.१३.१०.२००८ पासून पुढे तीस दिवसांपर्यंत कार्यरत असलेले) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) नुसार 'माहिती अधिकारी' समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,किनवट (दि. १३.१०.२००८ पासून पुढे तीस

दिवसांपर्यंत कार्यरत असलेले) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जब्बीउल्ला महेबुबखॉन, रा.पो.शिवाजीनगर,किनवट,ता.किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, किनवट जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०५

निर्णय दिनांक : १२.०४.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. किसन निवृत्ती भोसले,<br>रा.जालना. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>बालविकास प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक बालविकास सेवा योजना (शहरी प्रकल्प),<br>जालना | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (अंगणवाडी),<br>एकात्मिक बालविकास सेवायोजना,<br>नवी मुंबई. | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी आणि चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जास्तीचे शुल्क आकारले व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याकरिता त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने राहुलनगर,टी.व्ही.सेंटर या ठिकाणी मदतनीस म्हणून निवड केलेल्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीसाच्या भरतीसंदर्भातील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निवड झालेल्या उमेदवारांनी भरतीच्या वेळी त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती, निवड झालेले उमेदवार विधवा/परित्यक्त्या/घटस्फोटित असल्यास त्याच्या छायाप्रती, रहिवासी पुराव्यासह सर्व कागदपत्रे, निवड समितीने त्यांना कशापध्दतीने कागदपत्रे पाहून गुण दिले व निवड समितीने कसे गुण दिले - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८४/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे दि. ०७.०२.२००९ रोजी केल्यानंतर त्यांनी दि. ११.०२.२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०४.२००९ रोजी एकूण ४५ पृष्ठांची माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. ११.०२.२००९ रोजी प्रथमतः ३२ पृष्ठांची व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केल्यानंतर दि. २८.०४.२००९ रोजी ४५ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस पुरविली. या ४५ पृष्ठांच्या माहितीमध्ये अपिलार्थीस प्रथमतः पुरविण्यात आलेल्या माहितीच्या ३२ पृष्ठांचाही समावेश आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडून देण्यात आलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८४/- स्वीकृत करुन अपिलार्थीस प्रथमतः फक्त ३२ पृष्ठांची माहिती पुरविली व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर दि. २८.०४.२००९ रोजी ४५ पृष्ठांची माहिती पुरविली. या ४५ पृष्ठांच्या माहितीमध्ये त्यांनी अपिलार्थीस सुरुवातीस दि. ११.०२.२००९ रोजी दिलेल्या माहितीच्या ३२ पृष्ठांचाही समावेश आहे. याचाच अर्थ असा आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः एकूण १३ पृष्ठांची माहिती कमी पुरविली. परिणामी अपिलार्थीस संपूर्ण माहितीपोटीचे शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी एकदा अपिलार्थीकडून माहितीपोटीचे संपूर्ण शुल्क स्वीकारले की, त्यांना अर्जदारास संपूर्ण माहिती देणे हा त्यांच्या कर्तव्याचा अनिवार्य भाग होतो. परंतु या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः १३ पृष्ठांची अपूर्ण माहिती पुरवून अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदींचा भंग केला असल्याने आता जन

माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.८४/- इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ८४/- इतके त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली गेली असल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही किंवा आज रोजी युक्तिवादाद्वारे लेखी अथवा तोंडी स्पष्ट करण्यासाठी ते उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याचा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिल्याचा त्यांचा युक्तिवाद निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे या प्रकरणी आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.८४/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किसन निवृत्ती भोसले,रा.मोरंडी मोहल्ला, जुना जालना, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (अंगणवाडी) एकात्मिक बालविकास सेवायोजना, रायगड भवन, सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०६

निर्णय दिनांक १२-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय बाबुराव यरपुरवाड,<br>मु. पो. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. पुंडे पुंडलिक गोविंद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. पुंडे पुंडलिक गोविंद, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळी तांडा, तालुका मुखेड यांना नेमणूक देत असताना त्रयस्थ पक्षाने दाखल केलेल्या अर्हता प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीची प्रत अशी, माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १३-०२-२००९ रोजी या विषयासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहितीची मागणी केली आहे तो त्रयस्थ पक्ष श्री. पुंडलिक गोविंद पुंडे यांनी १२वी परीक्षा दोन वेळा दिली असल्यामुळे लातूर बोर्डाने त्यांचे १२ वीचे प्रमाणपत्र रद्द केले आहे व तरीही त्यांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये नेमणूक दिली आहे. अशाप्रकारचा अनियमित नेमणूकीमधील गैरप्रकार समाजाच्या पुढे आणण्यासाठी व त्याद्वारे व्यापक जनहित साध्य करण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरीही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे, ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचा कोणताही प्रत्यवाय असू नये. सबब जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित

करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास आणि त्यावरील प्रथम अपील अर्जास शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत न देता आणि तसेच आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित न राहून त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील अशाप्रकारे स्पष्ट केलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (शालेय शिक्षण) यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (दि.१९.१२.२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसापर्यंत कार्यरत असलेले), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांचे कार्यालय यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय बाबुराव यरपुरवाड, मु. पो. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०७

निर्णय दिनांक १२-०४-२०१०

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सह विक्रीकर आयुक्त कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट प्रशासन), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी सदर अपिलाची सुनावणी दिनांक २२-१२-

२००८ रोजी ठेवली व सदर अपील अर्जावर त्यांनी नियमबाह्य निर्णय दिल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ ऑक्टोबर, २००८ ते ३१ ऑक्टोबर, २००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयांतर्गत नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्याकडून अधिकृत फटाके विक्री परवानेधारक ज्यांना जिल्हाधिकारी यांनी शहर व तालुका पातळीवर फटाके विक्री परवाने दिले आहेत त्या परवानेधारकांच्या यादीप्रमाणे विक्रीकर कायद्याप्रमाणे त्यांनी किती परवाने दिले व त्यांच्याकडून किती विक्रीकर वसूल करण्यात आला व परवानाधारकांच्या नावाची यादी याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीने या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नसल्यामुळे त्यांनी ही माहिती अधिनियमातील कलम ५ व ४ च्या तरतुदीनुसार विक्रीकर अधिकारी, विवरण व विक्रीकर अधिकारी, नोंदणी, नांदेड यांचे सहाय्य घेऊन त्यांच्याकडील माहिती मागवून घेतली. त्याप्रमाणे संबंधितांकडून जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-१०-२००८ व १२-११-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली व ही माहिती जन माहिती अधिकारी नांदेड यांनी दिनांक १८-११-२००८ रोजी, जन माहिती अधिकारी हिंगोली व लातूर यांनी अनुक्रमे दिनांक १९-११-२००८ व ०६-१२-२००८ रोजी अपिलार्थीस पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २२-१२-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती योग्य असल्याचा निर्वाळा या निर्णयाव्दारे दिला. त्यांच्या या

निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या जिल्ह्यांशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांना ही माहिती सर्व संबंधित सहायक विक्रीकर आयुक्त यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी लागली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, विक्रीकर भरण्याची मुदत ही प्रकरणनिहाय वेगवेगळी असते. अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी माहितीशी संबंधित नमूद केलेला कालावधी पाहता, बरोबर आहे. फटाके विक्री परवाने जिल्हाधिकाऱ्यामार्फत संबंधितांना दिले जातात. या सर्वच फटाके विक्रेत्यांची विक्रीकर खात्याकडे नोंदणी झालेली असतेच असे नाही, त्यांच्याकडे ज्या फटाके विक्रेत्यांनी नोंदणी केली आहे अशा नोंदणीधारकांची यादी व त्यांनी भरलेल्या विक्रीकरापोटीचे शुल्क याची माहिती त्यांनी अपिलार्थीस सर्व संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती दिनांक १८-११-२००८, १९-११-२००८ व ०६-१२-२००८ रोजी दिली आहे. अपिलार्थीपासून त्यांनी कोणतीही माहिती दडवून ठेवलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे या प्रकरणी अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध असलेली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी संबंधित कालावधीमधील संपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट प्रशासन), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०८

निर्णय दिनांक १२-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नुरुद्दीन शमशोद्दीन नुर मोहंमद,<br>रा. शहागंज, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस आयुक्त, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या अपिलाची कारणे खालीलप्रमाणे नोंदविली आहेत.

"सिटीचौक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद झाला मोहीनोद्दीन व इतर या प्रकरणाबाबत दौलताबाद अब्दीमंडी बनावट कागदपत्राबाबत केस नंबर ९७ फाईल नंबर ११८६/२००८ दि. १४-०३-२००८ यामधुन सिटीचौक पोलीस स्टेशनमध्ये जी काही माहिती दिली आहे त्या माहितीचा खुलासा मागितलेला आहे ज्याचा विरासत नंबर ३/३,८८ (नुरुद्दीन शमशोद्दीन नुर मोहंमद) या

बाबत कागदोपत्री माहिती मी यापूर्वी मा. पोलीस आयुक्त कार्यालयात मागितलेली आहे परंतु मला ती आजपर्यंत मिळालेली नाही."

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"सिटीचौक पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद झाला मोहिनोद्दीन रबिदोद्दीन व इतर (प्रकरण) दौलताबाद अब्दीमंडी बनावट कागदपत्रेबाबत केस नंबर ९७ फाईल नंबर ११८६/२००८ दि. १४-०३-२००८ यामधून सिटीचौक पोलीस स्टेशनला जी काही माहिती दिली आहे ते आम्हाला माहिती देण्यात यावी."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

तथापि अपिलार्थीस संबंधित उप जिल्हाधिकाऱ्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी या प्रकरणी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली आहे.

उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज मूळात प्राप्त झाला नसल्यामुळे ते अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत. सहायक पोलीस आयुक्त यांनी त्यांचे म्हणणे त्यांच्या दिनांक २८-०३-

२०१० रोजीच्या पत्राद्वारे आयोगास पाठविले असून, यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात दिनांक ०६-०१-२००९ रोजी उपस्थित राहिले असता त्यांना सदरची माहिती पोलीस आयुक्त कार्यालयाने पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने उप जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे सिटी चौक पोलीस स्टेशनमध्ये असलेल्या कागदपत्रासंदर्भात काही माहिती मागविली आहे व या अर्जावर प्रथम अपील त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयाकडे केले आहे. अपिलाबरोबर त्यांनी उप जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्याबाबतचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे उप विभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रतिनिधीचा, त्यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही, हा युक्तिवाद आयोग मान्य करित आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने माहिती एका प्राधिकरणाकडे मागितली आहे व या संदर्भातील प्रथम अपील वेगळया सार्वजनिक प्राधिकरणाकडे केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हे दोघेही एकाच प्राधिकरणाशी संबंधित असणे अनिवार्य आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने वेगळ्या प्राधिकरणाकडे त्यांचा प्रथम अपील अर्ज करुन अधिनियमातील कलम १९ (१) चा भंग केल्याचा निष्कर्ष काढून, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नुरुद्दीन शमशोद्दीन नुर मोहंमद, शहागंज, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०९

निर्णय दिनांक १२-०४-२०१०

१ श्री. शेख छन्नुमियाँ शेख कडुमियाँ, : अपिलार्थी

मु. पो. तळणेवाडी, ता. गेवराई, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

तलाठी, सजा, धोंडराई, ता. गेवराई, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १२-०४-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील

क्रमांक ९०९/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ९०९/२००९, दिनांक ०३-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख छन्नुमियाँ शेख कडुमियाँ, मु. पो. तळणेवाडी, ता. गेवराई, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा, धोंडराई, ता. गेवराई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०६

निर्णय दिनांक १२-०४-२०१०

१ श्री. केशव रतन चव्हाण, : अपिलार्थी

मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, तालुका

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अध्यक्ष / सचिव, भारत निर्माण योजना,

जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उप-विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अध्यक्ष / सचिव, भारत निर्माण योजना, जहागीरदारवाडी, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांनी कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे सुचविल्यावरुन, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अध्यक्ष / सचिव, भारत निर्माण योजना, जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे, लोकवाटा भरलेली पावतीची झेरॉक्स प्रत, इस्टीमेटची झेरॉक्स प्रत, चेकबुक व पासबुकची झेरॉक्स प्रत व प्रोसिडींगची झेरॉक्स प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि ही माहिती त्यांना संबंधितांच्याकडून मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २४-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक ३०-०३-२००९ व दिनांक २७-०४-२००९ रोजी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी गैरहजर राहिले. नंतर अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी दिनांक ०२-०५-२००९ रोजी अंतिमतः निकाली काढले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व सचिव, भारत निर्माण योजना,

जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद हजर आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, अपिलार्थी त्यांच्याकडे माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत, तसेच या प्रकरणी उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या दिवशी ते अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसह उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे उपस्थित राहिले होते, परंतु त्याही वेळी अपिलार्थी हे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, सचिव, भारत निर्माण योजना, जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांनी केलेला खुलासा व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात सचिव हे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेलेले नाहीत. सचिव, भारत निर्माण योजना, जहागीरदारवाडी हे खाजगी व्यक्ती आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांना कोणत्या योजनेशी संबंधित माहिती त्यांच्याकडून हवी आहे, त्या योजनेच्या नावाचा उल्लेख त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये केला नाही. त्यामुळे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती सचिव, भारत निर्माण योजना, जहागीरदारवाडी यांच्याकडून हवी आहे, याचा बोध होत नाही. याहीउपर अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते सचिवांकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी केलेल्या प्रथम अपील अर्जावर सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थी हे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित झाले नाहीत. तसेच आजही आयोगासमोर झालेल्या सुनावणीस अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य असावे, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीस या माहितीची

आवश्यकता असेल तर त्यांनी, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मौजे जहागीरदारवाडी, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार याच माहितीकरिता नव्याने अर्ज करावा म्हणजे, त्यांना ग्रामसेवकाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकेल. ही माहिती आज रोजी संबंधित सचिवांच्याकडे तयार आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस आता प्राप्त होण्यासाठी कोणतीही अडचण भासणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केशव रतन चव्हाण, मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, भारत निर्माण योजना, जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उप- विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४६

निर्णय दिनांक १२-०४-२०१०

१ श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
' रायगड ', राजे संभाजीनगर (प), तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी | : | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद |
| जन अपिलीय अधिकारी | : | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ३१-०७-२००८ रोजी मागणी केलेली माहिती त्यांना अपूर्ण व उशिरा मिळाली असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कार्यवाही आदेशित करण्यासाठी, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, महाराष्ट्र शासनातर्फे सन १९९७-९८ ते २००८ या कालावधीत वितरीत केलेल्या जिल्हानिहाय केरोसीन पुरवठ्याचे परिमाण व महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कोट्याच्या पत्राच्या छायांकीत प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१०-२००८ रोजी सुनावणी घेऊन संपूर्ण माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहिती उशिराने मिळाल्याने आणि ती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २३-१०-२००८ रोजी व्यक्तिशः उपलब्ध

करुन दिली आहे. त्यांच्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याची पोचसही आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर, या अर्जाच्या संदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्यासाठीचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ३१-०७-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधी गेले होते, यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी अपिलार्थी व्यक्तिशः उपस्थित झाल्यानंतर त्यांना सुनावणीच्या दिवशी म्हणजे, दिनांक २३-१०-२००८ रोजी आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आहे, त्यामुळे अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उशीरा माहिती दिली, हा आक्षेप सिध्द होत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याचा दुसरा आक्षेप घेतला आहे, तथापि अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त होणे बाकी आहे, याचा कोणताही उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर घेतलेला हा आक्षेपही पूर्णपणे मोघम व कोणत्याही पुराव्याविना केल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशा

प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व उशिरा माहिती दिल्याचे मुद्दे परस्पर निकाली निघत असून या प्रकरणी अपिलार्थी हे त्यांची स्वतःची भूमिका स्पष्ट करण्यासाठी आयोगासमोर उपस्थितही नाहीत. सबब अशा परिस्थितीत अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय महादेवराव सोनवणे, ' रायगड ', राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४७

निर्णय दिनांक १२-०४-२०१०

१ श्री. संजय रामचंद्र लिहिणार, : अपिलार्थी
मु. पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी, उपविभागीय कार्यालय, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे आणि सदर गटाचे रेकॉर्ड संबंधित अधिका-याने जाणुनबुजून गायब केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद शिवारातील गट क्रमांक ४६ च्या फेरफाराच्या नकलेची माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे फेरफार क्रमांक ६७६, ७४२, ७४५, ७४०, ७४६, ७४८, ८२३, १०६१, १०६५ व १०६९ च्या नकला मागितल्या होत्या.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्याकडील असलेल्या माहितीपोटीची दहा रुपये इतकी नक्कल फी भरुन, फेरफार क्रमांक ८२३ ची नक्कल हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले व उर्वरित नकलांच्याकरिता संबंधित तलाठ्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले, तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही. यानंतर तलाठी, सजा, कासोडा यांनी तहसीलदार, गंगापूर यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या फेरफारापैकी फेरफार क्रमांक ७४२, ७४५, ७४०, ७४६, ७४८ व ६७६ या क्रमांकाचे फेरफार त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. तहसीलदार, गंगापूर यांनी यानंतर अपिलार्थीस याप्रमाणे परत दिनांक ०६-१२-२००८ रोजी असेच कळविले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी केलेला फेरफार क्रमांक ७४० हा, त्यांनी मागणी केलेल्या गटाशी संबंधित नसून तो गट क्रमांक ६७ शी संबंधित आहे. ७४० क्रमांकाचा फेरफार हा गट क्रमांक ६७ शी संबंधित असताना देखील संबंधित तलाठ्याने तो गट क्रमांक ४६ शी संबंधित असल्याची नोंद ४६ गट क्रमांकाच्या ७/१२ च्या उता-यावर केली आहे. अशा प्रकारे संबंधित तलाठी श्री. देवळे यांनी या जमिनीच्या फेरफारामध्ये अवैधरित्या बदल केला असून, गट क्रमांक ४६ मध्ये अंदाजे दोन एक्कर जमिनीचा अनधिकृत व्यवहार केला आहे. हे प्रकरण कोर्टात नेण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. या प्रकरणी एका शेतक-याची जमीन जलसंपदा विभागाने प्रकल्पा-साठी संपादित केल्यानंतर, उर्वरित जमीन त्या शेतक-याने १९९२ साली बिलावर नावाच्या व्यक्तीला विकली. एवढे असूनही परत नंतर या जमिनीचे मालक श्री. मदनप्रसाद यांनी त्यांचे नाव या फेरफारावर अवैधरित्या लावले, अशी वस्तुस्थिती त्यांनी आयोगास विषद केली. जमिनीच्या नोंदीमध्ये महसूल खात्यामध्ये राजरोजसपणे चाललेला हा गैरव्यवहार उघड करण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी दिनांक ०१-०४-२०१० रोजी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी फेरफार क्रमांक ८२३, १०६१, १०६५ व १०६९ च्या नकला पुरविल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०४-२०१० रोजी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची आयोगाने छाननी केली असता, यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या फेरफार क्रमांक ७४० ची प्रत आयोगास आढळून आली नाही, आणि गट नंबर ४६ च्या ७/१२ च्या

उता-यामध्ये फेरफार क्रमांक ७४० ची नोंद मात्र या गट क्रमांकाच्या ७/१२ च्या उता-यावर आयोगास आढळून आली आहे. यावरुन अपिलार्थीने या प्रकरणी झालेल्या जमीन विक्रीच्या व्यवहारामध्ये, संबंधित तलाठी श्री. देवळे यांनी या जमिनीच्या व्यवहारामध्ये केलेल्या गैरव्यवहाराच्या आरोपास पुष्टी मिळते. सबब, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित असलेल्या जमीन विक्रीच्या गैरव्यवहाराची त्यांच्या पातळीवर चौकशी करुन, पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून गट क्रमांक ४६ शी संबंधित फेरफार क्रमांक ७४० ची प्रत प्राप्त होणे बाकी आहे, असे दिसून येत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली गट क्रमांक ४६ च्या फेरफार क्रमांक ७४० ची प्रत त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर फेरफार क्रमांक ७४० हा अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, जर गट क्रमांक ४६ शी संबंधित नसेल तर त्यांनी, या प्रकरणाची वस्तुस्थिती अपिलार्थीस एका स्वतंत्र पत्राव्दारे लिखीत स्वरुपात याच मुदतीत विनामूल्य कळवावी. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असल्याचे, अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या पत्रव्यवहारावरुन दिसून येत आहे, त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सहायक (तलाठी श्री. देवळे) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, मौजे घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद शिवारातील गट क्रमांक ४६ शी संबंधित फेरफार क्रमांक ७४० ची प्रत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, अथवा या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती अपिलार्थीस याच कालावधीमध्ये कळवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सहायक (तलाठी श्री. देवळे) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय रामचंद्र लिहिणार, मु. पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३५
निर्णय दिनांक : १३.०४.२०१०

१. श्री. सुधीर प्रभाकर पवार, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आगार प्रमुख (वरिष्ठ),आगार क्र.२,
राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : आगार व्यवस्थापक,
राज्य परिवहन महामंडळ,आगार क्र.२,
औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिला, विनिर्दिष्ट कालमर्यादेमध्ये माहिती देण्यासाठी कोणताही निर्णय दिला नाही, असंयुक्तिक शुल्क भरण्यास भाग पाडले व दिशाभूल करणारी खोटी माहिती दिली त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपराध क्र. १०६/२००८ या विषयाशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१८/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर दि. १२.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन जाण्याचे सूचित केले व अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग,औरंगाबाद यांच्याकडे या संदर्भात दि. २०.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१९.०७.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले. तथापि जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती पुरविली, असे आयोगाने विचारले असता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरविण्यात आलेली कथित माहिती आयोगासमोर सादर करता आली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरीच त्यांना अपेक्षित माहिती दिली किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग,औरंगाबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २०.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे

आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२०.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधीर प्रभाकर पवार, घर नं.१२९७,मिशन कंपाऊन्ड, छावणी,औरंगाबाद-४३१ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक,राज्य परिवहन महामंडळ,आगार क्र.२, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७२
निर्णय दिनांक : १३.०४.२०१०

१. सौ. कमलाबाई रामकिसन शिरसाठ, : अपिलार्थी
रा.गंगापूर,जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,
गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक, सहकारी संस्था,
गंगापूर,जि.औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : सचिव, विशाल मागासवर्गीय मजूर
सहकारी संस्था.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. १४.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, माहिती अधिकारी तथा चेअरमन/सचिव, विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था यांनी न दिल्यामुळे व माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी दि. १८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. सदरचे अपील सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी त्यांनी मान्य करुनही त्यांनी दि. १२.११.२००७ रोजी आदेशित केल्याप्रमाणे संबंधित मजूर संस्थेने त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आयोगास अशी विनंती केली

आहे की, अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे आदेशित होऊन या प्रकरणी हेतुपूरस्सर माहिती देण्यासाठी विलंब लावल्याप्रकरणी संबंधितांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष, विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था, वाळुज यांच्या संदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे सन २००५ ते २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास सहायक निबंधक सहकारी संस्था,गंगापूर यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, सचिव, विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था,वाळुज यांच्याकडे अर्ज करुन परस्पर प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत सचिव/चेअरमन, विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था, वाळुज यांना दिली. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर यांच्याकडे दि. १८.१०.२००७ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.११.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य केले व सचिव, विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था, वाळुज यांना अपिलार्थीस त्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही संबंधित संस्थेकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष, अध्यक्ष,विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था, वाळुज उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष,अध्यक्ष, विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था,वाळूज यांनी असा युक्तिवाद केला की, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निर्णय

दिल्याप्रमाणे त्यांच्या मजूर संस्थेस माहिती अधिकार कायदा लागू होत नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष, विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था, वाळुज यांचेशी संबंधित असलेली काही माहिती सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार हवी आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State**

**<u>within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."</u>**

वरील आदेशाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मूळात ज्या संस्थेविषयी सहायक निबंधक यांच्याकडून माहिती अपेक्षिली आहे, त्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत नाहीत, असे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

> **'' 'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके,आदेश,रोजवहया,संविदा,अहवाल,कागदपत्रे,नमुने,प्रतिमाने(मॉडेल),कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि <u>त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती,</u> यांचा समावेश होतो.''**

वरील व्याख्येमध्ये, "त्या-त्या वेळी अंमलात असलेले अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल, अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहितीचा समावेश होतो", अशी तरतुद आहे आणि त्या तरतुदीसह संस्थेवर सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे नियंत्रण पाहता, असे आढळून येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० च्या कलम ७९ च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सहायक निबंधक, सहकारी संस्था यांना संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरविता येऊ शकेल. हे पाहता, सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, महाराष्ट्र सहकारी संस्था,अधिनियम १९६० मधील योग्य त्या तरतुदींचा वापर करुन ती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर यांच्याकडे माहिती मागवूनही त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी अपिलार्थीस परस्पर, संबंधित मजूर सहकारी संस्थेकडे, जिचा अधिनियमातील 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येत समावेश होऊ शकत नाही,अशा संस्थेकडे अपिलार्थीस माहिती मागण्याचे सूचित करणे ही सहायक निबंधक, सहकारी संस्था यांची कृती सर्वथा चुकीची आहे, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील योग्य त्या तरतुदींचा वापर करुन प्रथमतः संबंधित संस्थेकडून त्यांच्याकडे प्राप्त करुन घ्यावी व तदनंतर ती अपिलार्थीस तात्काळ व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. ही संपूर्ण कार्यवाही सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत पूर्ण करावयाची आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. कमलाबाई रामकिसन शिरसाठ,मु.पो.अहिल्यादेवीनगर, गंगापूर,ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. विशाल मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था मर्यादित, वाळुज, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी, सहायक निबंधक सहकारी संस्था, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी, सहायक निबंधक, सहकारी संस्था,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७३
निर्णय दिनांक : १३.०४.२०१०

१. श्री. मधुकर लोहा राठोड, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय कृषि सहसंचालक, लातूर विभाग,लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय कृषि सहसंचालक,लातूर विभाग,लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रशासन अधिकारी,
विभागीय कृषि सहसंचालक,
कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक कृषि अधिकारी,
विभागीय कृषि सहसंचालक,
कार्यालय, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती चंदा गोविंदराव गावडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आवश्यक ते शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी

यांच्याकडे,त्रयस्थ पक्ष श्रीमती चंदा गोविंदराव गावडे कृषि सेवक ,लखमापूर यांच्या प्रथम नियुक्ती ते कृषी सहायक या पदावर झालेल्या नियुक्ती आदेशाच्या झेरॉक्स प्रती, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या प्रत्येक वर्षाच्या पाठविलेल्या अहवालाची प्रत व त्यांची नियुक्ती कोणत्या जातीमधून झाली, याची झेरॉक्स प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१४२/- इतके त्यांना चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीच्या अपिलावर, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,नांदेड यांनी या संदर्भात पूर्वीच माहिती दिली असल्याने आणि अपिलार्थी हे एकच माहिती वेगवेगळया कार्यालयातर्फे वारंवार मागत असल्यामुळे अपिलार्थीच्या माहिती मागण्याच्या हेतूने आशंकित होऊन त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षसह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ पक्षाने नांदेड येथील कार्यालयात त्यांची जात 'मराठा' अशी दर्शविली आहे आणि नेमणूक होताना त्यांनी इतर मागासवर्गीय संवर्गामधून त्यांची नेमणूक करुन घेतली आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, व्यापक जनहिताच्या दृष्टीने त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती प्रथमतः दि. २३.०३.२००९ रोजी पुरविली असून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील सुनावणी

झाल्यानंतर त्यांनी परत अपिलार्थीस दि. ०९.०४.२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांना पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ अपिलार्थीस प्रथमतः युपीसीने माहिती पाठविल्याचा व तदनंतर दि. ०९.०४.२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविल्याचा पुरावा आयोगास सादर केला. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दोन वेळा माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, जरी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असली तरी या माहितीतील त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या कामकाजाच्या मूल्यमापनासंदर्भात पाठविलेला अहवाल, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या माहितीचे अवलोकन केले असता, त्रयस्थ पक्षाचा हा अहवाल सर्वसाधारणपणे 'गोपनीय अहवाल' सदृश अशाप्रकारचा अहवाल असल्याचे आयोगास आढळून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणार नाही. कारण ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यामध्ये अधिनियमातील कलम ८(१) (ङ) व (ञ) मधील तरतुदींचा भंग होणे संभवत आहे. तथापि आता या मुद्यावरील माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०९.०४.२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविलेल्या पत्राची त्यांनी प्रथमतः पोस्टखात्यामध्ये चौकशी करुन ही माहिती अपिलार्थीस पोस्टामार्फत प्रथमतः पुरविली गेली आहे किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी व जर ही माहिती अपिलार्थीस पोस्टामार्फत पुरविली गेली नसल्याचे सिध्द झाले तर त्यांनी ही माहिती (जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्या

त्रयस्थ पक्षाच्या कामकाजाच्या मूल्यमापन अहवालाच्या प्रती वगळता) अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने जर त्रयस्थ पक्षाशी संबंधित वैयक्तिक माहिती मागितली असली तरी या माहितीतील अपिलार्थीच्या कामाच्या मूल्यमापनाचा हा भाग वगळता उर्वरित सर्व माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यवाय नसावा.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे दि. ११.०२.२००९ रोजी माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरलेले असताना देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०३.२००९ रोजी प्रथमतः माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पाठविण्यासाठी घेतलेला हा कालावधी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये सशुल्क माहिती देण्यासाठी विहित केलेल्या अनुज्ञेय कालावधीपेक्षा जास्त असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १४२/- इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १४२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. १४२/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करण्यात यावे.

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०४.२०१० रोजी नोंदणीकृत डाकेने पाठविलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची प्रथमतः खात्री करुन घ्यावी. तदनंतर जर अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाली नसेल तर त्यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या मूल्यमापन अहवालासंदर्भातील माहिती वगळून उर्वरित माहिती,हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. मधुकर लोभा राठोड, द्वारा अनिकेत निवास, टिळकनगर, नेहरी इंग्लिश स्कूलच्या पाठीमागे, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७४
निर्णय दिनांक : १३.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल माजीद महमद इब्राहीम,<br>रा.अर्धापूर,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>एकता प्रायमरी ऊर्दू स्कूल, अर्धापूर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एकता प्राथमिक ऊर्दू शाळा, अर्धापूर यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेतील वर्गांची संख्या, विद्यार्थ्यांची यादी, शिक्षकांची पदनिहाय यादी व त्यांच्या शाळेत रुजू झालेल्या तारखा व शाळेतील कर्मचाऱ्यांचे शाळेत येण्या-जाण्याचे वेळापत्रक -या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००८-२००९ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.११०/- इतके त्यांना त्यांच्या शाळेमध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १४.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या शाळेत भरण्याच्या सूचना देऊनही अपिलार्थीने या शुल्काचा भरणा चलनाद्वारे न केल्याने त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११०/- राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्याचे सूचित केले हाते व तदनंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासित केले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(३)(क)

च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क अर्जदारास कळविताना जन माहिती अधिकारी यांनी शुल्काचा संपूर्ण तपशील, उदा. अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या संभावित माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहितीचा प्रतिपृष्ठ दर अपिलार्थीस देणे भाग आहे. तथापि अशाप्रकारचा कोणताही तपशील त्यांनी अपिलार्थीस न दिल्यामुळे आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अब्दुल माजीद महमद इब्राहीम,रा.बरकतपूरा,अर्धापूर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,एकता प्राथमिक शाळा ऊर्दू, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७५
निर्णय दिनांक : १३.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. धनराज रामचंद्र धुमुरे,<br>रा.मुरुम,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>लेखापाल,<br>नगरपरिषद, मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद,मुरुम,ता.उमरगा,<br>जि.उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असून असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सोनारगल्ली ते गांधी चौक रोड व गटारीचे बांधकाम, गांधीचौक ते किसान चौक व सय्यदा गल्ली ते किसान चौक रोड या रस्त्यांचे व गटारींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याने संबंधित कामाच्या अंदाजपत्रकाची माहिती, चिल्ड्रन गार्डन बाबत २००१-०२ या कालावधीमधील अनुदान व खर्चाची तपशीलवार माहिती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगरपरिषद, मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्याधिकारी, नगरपरिषद,मुरुम,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम, ता.उमरगा यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,नगरपरिषद,मुरुम यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धनराज रामचंद्र धुमुरे,रा.मुरुम,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल,नगरपरिषद, मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,मुरुम,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६७

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

१ श्री. अब्दूल रऊफ अब्दूल करीम, : अपिलार्थी

रा. सब्जी मंडी, खोकडपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उप अभियंता, नगर रचना - १, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उप अभियंता, नगर रचना - १, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) सब्जी मंडी, खोकडपुरा येथील सन २००० पासून ते आजपर्यंत अनाधीकृत बांधकामाबाबत व परवानगी पेक्षा जास्त प्रमाणात बेकायदेशीरपणे केलेल्या बांधकामाची माहिती

देणे (संपूर्ण सब्जी मंडी व खोकडपुराची) २) अनाधीकृत व परवानगी न घेता केलेल्या बांधकामाची माहिती नाव घर क्रमांक (संपूर्ण सब्जी मंडी व खोकडपुरा) अनाधीकृत बांधकामाबाबत केलेली कार्यवाही".

(टीप: अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साध्या टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ मधील, " परवानगी न घेता केलेल्या बांधकामाची नावे, घर क्रमांक" या भागाशी संबंधित माहिती वगळता, उर्वरित माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. सदर माहितीचे मोघम स्वरुप पाहता, ती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित त्यांना वर स्पष्ट केल्याप्रमाणे

देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ, अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील, 'परवानगी न घेता केलेले बांधकाम व घराचा क्रमांक' ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दूल रऊफ अब्दूल करीम, सब्जी मंडी, खोकडपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना - १, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना - १, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६८

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

१ श्री. लक्ष्मीनारायण राठोड, : अपिलार्थी
बी-९, ठाकूर निवास, गिरीराज हौ. सोसायटी, कामगार चौक,
पंढरपूर, वळदगांव, ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "ग्रामपंचायत पंढरपूर तालुका जिल्हा औरंगाबादच्या ग्रामपंचायत

सदस्यांनी अतिक्रमण करुन ड्रेनेज लाईन चॉकअप केल्याबाबत गिरीराज सोसायटीमधील नाल्या चॉकअप झाल्याने दुर्गंधी पसरली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली", अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या वसाहतीविषयी माहिती मागितली आहे ती वसाहत ग्रामपंचायत पंढरपूरच्या हद्दीत नसून ती वळदगांव ग्रामपंचायतीच्या हद्दीत असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व या पत्राची प्रत त्यांनी वळदगाव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व सरपंच यांना दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०७-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित ग्रामपंचायतीकडे १५ दिवसाच्या आत वर्ग करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या प्रकरणाची सुनावणी दिनांक ११-०६-२००९ रोजी झाली होती. सुनावणीतील तोंडी आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ११-०६-२००९ रोजी वळदगांव ग्रामपंचायतीकडे वर्ग केला. सदर अर्ज ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्याअगोदर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी वळदगांव ग्रामपंचायतीकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज वर्ग केल्यानंतर दिनांक २९-०६-२००९ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी वळदगाव ग्रामपंचायत यांनी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे ही माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर उपलब्ध झाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२००९ रोजीचा मूळ अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार वळदगांव ग्रामपंचायतीकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी अगर तत्पूर्वी वर्ग करणे त्यांना गरजेचे होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही न करता फक्त अपिलार्थीस वळदगांव ग्रामपंचायतीकडून माहिती घेण्याचे सूचित केले व त्याची प्रत ग्रामपंचायतीस दिली. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमानुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अशाप्रकारे केलेली कार्यवाही ही अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदींस छेद देत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भात निर्णय घेतल्यानंतर त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज सुनावणीच्या दिवशीच वळदगाव ग्रामपंचायतीकडे वर्ग करुन अपिलार्थीस दिनांक २९-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखवली, यावरुन अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकारे या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २१-०२-२००९ रोजी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २९-०६-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस ही माहिती विलंबाने प्राप्त होण्यासाठी या प्रकरणी

प्रामुख्याने जन अपिलीय अधिकारी हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार ३० ते ४५ दिवसाच्या आत सुनावणी न घेता ही सुनावणी त्यांनी ३ महिने व एक आठवडा इतक्या विलंबाने घेतल्याची आयोगास आढळून येत आहे. केवळ जन अपिलीय अधिकारी यांनी विलंबाने सुनावणी घेतल्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याचे आयोगास प्रामुख्याने आढळून येत आहे. सबब संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येत आहे की, इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा व अशाप्रकारांची पुनरावृत्ती टाळावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती आता त्यांना प्राप्त झाली असल्यामुळे माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मीनारायण राठोड, बी-९, ठाकूर निवास, गिरीराज हौ. सोसायटी, कामगार चौक, पंढरपूर, वळदगांव, ता. जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९६९

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख नजमा अब्दुल हमीद,<br>रा. रुप महल, ए विंग, फ्लॅट नंबर- २१, फाजीलपुरा,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>मदीनतुल उल उलुम इंटरनॅशनल स्कूल, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना मदीनतूल उल उलूम इंटरनॅशनल स्कूल यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये

मुख्याध्यापक, मदीनतूल उल उलूम इंटरनॅशनल स्कूल, औरंगाबाद यांच्याकडे, त्यांच्या शाळेविषयी सन २००६ ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण १६ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित मुख्याध्यापक यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे, या संस्थेस माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी लागू होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. मुख्याध्यापकाच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी नेहमीप्रमाणे कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या शाळेकडे माहिती मागितली आहे त्या शाळेस महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने कोणतीही परवानगी दिलेली नाही. ही शाळा बालवाडी स्वरुपात असून या शाळेस शासनाकडून कोणतेही प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे अर्थसहाय्य केले जात नाही, ही शाळा पूर्णतः खाजगी स्वरुपाची आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन एका खाजगी शाळेकडे, शाळेविषयी एकूण १६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. या शाळेस शासनाच्या शिक्षण खात्याची परवानगी नाही, ती पूर्णतः खाजगी स्वरुपाची आहे. त्यामुळे हे प्राधिकरण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीप्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. परिणामी अपिलार्थीस या संस्थेकडून कोणतीही माहिती देय होत नाही. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नजमा अब्दुल हमीद, रुप महल, ए विंग, फ्लॅट नंबर- २१, फाजीलपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदीनतुल उल उलुम इंटरनॅशनल स्कूल, रोजाबाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७०

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

१ श्री. केशव रतन चव्हाण, : अपिलार्थी
मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, ता. जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने एकाच दिनांकाच्या दोन माहितीसाठीच्या व एकाच माहितीच्या अर्जावर एकाच दिवशी दोन प्रथम अपिले व दिनांक १४-०४-२००९ व ०५-०५-२००९ रोजी दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत. यापैकी अपिलार्थीच्या दिनांक १४-०४-२००९ रोजीच्या द्वितीय अपील अर्जावर राज्य माहिती आयोगाने दिनांक २५-०३-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला

असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केशव रतन चव्हाण, मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, ता. जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७१

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

१ श्रीमती नुरबी भ्र. मुसल्लम फातेमाबिन मुसल्लम, : अपिलार्थी
तर्फे अ. रहेमान बिन मुसल्लम,
रा. टेभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग,
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, घर नंबर १६५०/११६५०/२ दिनांक १३-०८-२००८ व ०३-१२-२००८ च्या खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशाप्रमाणे घर क्रमांक १६५/११६५० चे नामांतर करुन मिळण्याकरिता त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, घर नंबर १६५०/१ व १६५०/२ चे नामांतर रद्द करुन वरील नावे नमूद करण्याकरिता दिनांक २७-१२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या अर्जावर त्यांनी केलेली कार्यवाही आणि कोर्टाच्या निकालाचे पालन केले किंवा नाही, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे अपेक्षित आहे याचा उल्लेख त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केला नव्हता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३०/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०७-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, कोर्टाने हुकूम देऊनही कोर्टाच्या हुकुमाचे जन माहिती अधिकारी यांनी पालन केलेले नाही. त्यांनी त्यांच्या मालमत्तेवर नामांतरण केले नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व हे नामांतरण त्वरित करुन

मिळण्याविषयी आयोगास विनंती केली आहे. त्यांच्या मालमत्तेचे नामांतरण न झाल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही अपूर्ण असल्याचे वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २७-१२-२००८ रोजीच्या अर्जावर त्यांनी गट विकास अधिकाऱ्याकडून अहवाल मागितला व गट विकास अधिकाऱ्याचा अहवाल त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०४-२००९ रोजी सशुल्क पुरविलेली आहे. अपिलार्थीस त्यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये गट विकास अधिकाऱ्याने केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत व संबंधित ग्रामपंचायतीने त्यांच्या जमिनीवर घेतलेल्या नोंदीच्या प्रतीचा समावेश आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस दिनांक २९-०४-२००९ रोजी, ३०/- रु. इतके शुल्क आकारुन त्यांनी माहिती दिली आहे. सदर शुल्क भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३०/- इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यासारखे वाटत आहे. यासंदर्भात अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस अपेक्षित असल्याप्रमाणे संदर्भीत मालमत्तेच्या मालकी हक्काच्या नामांतरणाची प्रक्रिया न्यायालयाने आदेश देऊनही पूर्ण झाली नाही. त्यामुळे त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे, असे अपिलार्थीस वाटत आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अपिलार्थीस पुरविलेली आहे. अपिलार्थीस अपेक्षित असल्याप्रमाणे मालमत्तेवरील हक्काचे नामांतरण करुन देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगाला नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात अर्जदाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे मूळात अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केली असल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असे म्हणता येणार नाही. अपिलार्थीस त्यांच्या मालमत्तेच्या नामांतरणासंदर्भात दाद मागण्यासाठी वेगळे सक्षम प्राधिकरण उपलब्ध आहे. त्या प्राधिकरणाकडून अपिलार्थी त्यांचा प्रश्न स्वतंत्रपणे सोडवू शकतात. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचा त्यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती नुरबी भ्र. मुसल्लम फातेमाबिन मुसल्लम, तर्फे अ. रहेमान बिन मुसल्लम, रा. टेभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७६

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कुलदिपराज विठ्ठलराव दुथडे,<br>रा. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१०-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत त्रयस्थ पक्ष तथा कृषि पर्यवेक्षक गोंड, रेड्डी, मोरे व पाटील व त्यांचे कृषि सहायक यांनी केलेल्या कामाची गावनिहाय संख्या, एकूण मंजूर निधी, झालेला खर्च, शिल्लक निधी अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षांनी पाणलोट क्षेत्र, टी. एस. पी., मानव विकास मिशन, नाला सरळीकरण, मातीबंधारे, सी. सी. टी., एल. बी. एस., आर. टी., अर्दन स्ट्रक्चर, अशा प्रकारच्या केलेल्या कामासंदर्भात मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. गोंड एम. व्ही., श्री. राठोड जी. एम. हजर आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००९ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली आहे, तथापि या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच त्यांनी तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कुलदिपराज विठ्ठलराव दुथडे, रा. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,

किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७७

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

१ श्री. प्रदिप पंडितराव राठोड, : अपिलार्थी
रा. संमित्र कॉलनी, परतूर, तालुका परतूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी आदेशित करुनही माहिती दिली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाझर तलावांची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' उपविभाग परभणी अंतर्गत फेब्रुवारी ०८ ते ३१ मार्च २००८ पर्यंत मंजूर झालेली जिंतूर तालुक्यातील सर्व पा. त. ची मंजूरी दिनांकासहित, काम सुरु केलेल्या दिनांकासहित सर्व पा. त. माहिती. '

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-१२-२००८ रोजी सुनावणी घेऊन, आपले आदेश दिनांक २२-१२-२००८ रोजी पारीत करुन १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या कालावधीमध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. यावर आयोगाने अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन नंतर ते जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती घेण्यासाठी कधी गेले होते, यासंदर्भात त्यांच्याकडे एखादा पुरावा उपलब्ध आहे काय, अशी विचारणा केली असता, अपिलार्थीने यासंदर्भात त्यांच्याकडे कोणताही सबळ पुरावा उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त व्हावी व या प्रकरणी माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने शास्तीची कार्यवाही आदेशित करावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्या कार्यालयाकडे माहितीची मागणी केली होती त्यावेळी श्री. आर. जी. यादव नावाचे कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते, त्यांनी त्यावेळेस अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती का दिली नाही, याची कारणे त्यांना आता आयोगास सांगता येणार नाहीत आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०३-२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. या संदर्भात त्यांनी दिनांक १५-०३-२०१० रोजीची पोस्टाची पावती आयोगास दाखविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०३-२०१० रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टाने दिल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप इतके मर्यादित होते की, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना लागलीच देता आली असती, तथापि या प्रकरणी अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे सूचित करुनही संबंधित कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही, ही बाब आयोगास या ठिकाणी प्रकर्षाने जाणवत आहे. जन

अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी अपील अर्जावर ज्यावेळी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी सुनावणीस हजर होते. संबंधित कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना, अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे झालेल्या या सुनावणीसाठी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचा या संदर्भातील लेखी निर्णय देखील संबंधित कार्यकारी अभियंता यांना प्राप्त झाला होता, तथापि एवढे असूनही अपिलार्थीने मागणी केलेली अत्यल्प व्याप्तीची माहिती अपिलार्थीस देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव यांनी अंदाजे दीड वर्ष इतका कालावधी घेतला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी घेतलेला हा कालावधी निश्चितपणे, संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. जी. यादव यांच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीप्रती त्यांच्या कार्यशैलीमध्ये असलेली बेपर्वाई व कर्तव्यपरायणतेचा अभाव, स्पष्ट करतो, अशी आयोगाची खात्री झाली आहे. श्री. आर. जी. यादव यांच्या अशा प्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीमुळे व त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने, ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. जी. यादव (सध्या कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी मूळात व्यक्तिशः माहिती मागितली होती तथापि त्यांनी अपिलार्थीस आता विलंबाने व टपालाव्दारे माहिती पाठवली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्या विनंतीशी विसंगत असल्यामुळे व अद्यापपावेतो अपिलार्थीस

माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची एक अतिरिक्त प्रत त्यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीची एक अतिरिक्त प्रत त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. आर. जी. यादव (सध्या कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना या पदावर कार्यरत) यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रदिप पंडितराव राठोड, रा. संमित्र कॉलनी, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००८

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

१ श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, : अपिलार्थी
लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर,
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सचिव, शालेय शिक्षण समिती,
तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहू प्राथमिक शाळा, डॉ.
सत्यवान जाधव यांच्या दवाखान्याच्यामागे, शाहुनगर, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, छत्रपती शाहू प्राथमिक शाळा, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिका-याने अपूर्ण माहिती दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊनही लेखी आदेश न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - दिनांक ०१-०४-२००३ ते ३१-१२-२००८ या कालावधीतील शालेय समितीच्या बैठकांच्या सूचनापत्राच्या नकला, शालेय समितीच्या बैठकांच्या इतिवृत्ताच्या नकला, शाळेच्या गत तीन वर्षाच्या ऑडिटेड बॅलन्स शिटच्या नकला - अशी माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेच्या कार्यकारिणीचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत असताना, त्यांच्याकडेच उपलब्ध असल्याचे आणि शालेय रेकॉर्ड त्यांनी संस्थेस हस्तांतरीत न केल्यामुळे, त्यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस पुरविणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिका-याने सुनावणी घेतली परंतु लिखीत आदेश पारीत न केल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या शाळेचे ऑडिटेड बॅलन्स शिट दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठविले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, अपिलार्थीने त्यांच्या संस्थेचे तकालीन अध्यक्ष

या नात्याने स्वत:कडे ठेऊन घेतली होती व नंतर संस्थेचे अध्यक्ष बदलल्यानंतर देखील अपिलार्थीने ही माहिती नव्या अध्यक्षाकडे हस्तांतरीत न केल्यामुळे, ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे संस्थेचे अध्यक्ष या नात्याने स्वत:कडेच ठेऊन घेतले आहेत, हे अभिलेखे त्यांनी त्यांच्यानंतर येणा-या अध्यक्षाकडे हस्तांतरीत केले नाहीत आणि आता ते तिच माहिती शाळेच्या मुख्याध्यापकाकडे मागत आहेत, असे जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादावरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती दिनांक ०६-०४-२००९ रोजी पुरविली असून, आता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस त्यांना देता येत नाही. यावरुन अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित माहिती मिळणार नाही हे उघड आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, छत्रपती शाहू प्राथमिक शाळा, डॉ. सत्यवान जाधव यांच्या दवाखान्याच्यामागे, शाहुनगर, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०७

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर,<br>व्दारा, श्री. मनोज बाबुराव शिंदे,<br>मोतीनगर, रिंगरोड, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगरपरिषद कार्यालय, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कर अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर

त्रयस्थ पक्ष : सुर्योदय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष सुर्योदय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या बांधकाम संचिकेच्या संदर्भात, दिनांक ०७-०७-२००४ ते १८-०२-२००९ या कालावधीशी संबंधित, काही

माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संस्थेच्या बांधकामाच्या संचिकेची पूर्ण छायांकीत प्रत, स्थायी समिती व कौन्सिलच्या ठरावाची छायांकीत प्रत, ठरावाचे सूचक व अनुमोदक यांची नावे, सूचक व अनुमोदक यांनी स्वाक्षरी केलेल्या ठरावाची छायांकीत प्रत, या संस्थेच्या कामावर झालेल्या खर्चाच्या मोजमाप पुस्तिकेची आणि बिलाच्या प्रती व इस्टिमेट छायांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०४-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस न पुरविलेली माहिती सात दिवसाच्या आत पुरविण्याचे, जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०४-२०१० रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे. या प्रकरणी अपिलार्थी श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर हे त्यांच्याकडे सुनावणीसाठी अथवा माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित न राहता, त्यांचे प्रतिनिधी श्री. मनोज बाबुराव शिंदे हेच त्यांच्याकडे उपस्थित राहत आहेत. अपिलार्थीशी केलेला पत्रव्यवहार व

माहिती ही दुसरीच व्यक्ती घेत असते, त्यामुळे त्यांच्या कार्यालयाची अशी धारणा झाली आहे की, कोणीतरी अज्ञात व्यक्ती श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर यांच्या नावाने सह्या करते व दारिद्र्यरेषेचे प्रमाणपत्र जोडून त्याआधारे विनामूल्य माहिती घेत असते व त्यांच्या कार्यालयाचा वेळ खर्ची घालत असते, त्यामुळे अपिलार्थीचे सदर अपील निकाली काढावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती दिनांक ०६-०४-२०१० रोजी त्यांच्या प्रतिनिधीस हस्तांतरीत केलेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनाच द्यावयास हवी होती. अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांनी अशा वेळी माहिती देणे मूळात अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, कोणत्याही अर्जदाराने जर ' व्यक्तिशः ' माहिती मागितली तर ती माहिती फक्त त्याच अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी द्यावयास हवी. अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदाराच्या कोणत्याही प्रतिनिधीस देय होत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिली आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त कालावधी-

मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, व्दारा, श्री. मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५४५

निर्णय दिनांक १३-०४-२०१०

१ श्री. अनिल रामचंद्र रुद्रवार, : अपिलार्थी

रा. जवळा बाजार, तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

तलाठी कार्यालय, सजा पुरजळ, तालुका औंढा (ना.),

जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

१. उप विभागीय अधिकारी (महसूल), वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली

२. मंडळ अधिकारी, जवळा बाजार, तालुका औंढा, जिल्हा हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तलाठी, सजा पुरजळ, तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय अधिकारी (महसूल), वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पुरजळ यांच्या कार्यालयात सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीमध्ये केलेल्या सर्व फेरफाराच्या प्रती व्यक्तिशः मागितल्या होत्या.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना, तलाठ्याकडून प्राप्त न झाल्याने, त्यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वसमतनगर यांच्याकडे दिनांक ०९-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००७ रोजी, तलाठी सजा यांच्याकडून त्यांना अपेक्षित असलेली माहिती घेण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत तलाठी, सजा पुरजळ यांना देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सशुल्क पुरविण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर तलाठी, सजा पुरजळ यांनी दिनांक ०६-१०-२००९ रोजी, अर्जदारास हव्या असलेल्या माहितीसंदर्भात लागणारे शुल्क प्रति नक्कल रुपये दहा याप्रमाणे एकूण ४५९० इतकी रक्कम त्यांच्याकडे चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदरचे पत्र घेण्याचे नाकारले. अपिलार्थीस पत्र पाठविण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. या युक्तिवादावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही नकलेची माहिती न मागता,

फेरफाराच्या प्रतीची माहिती मागवूनही तलाठी, सजा पुरजळ यांनी अपिलार्थीस माहिती देताना नकलेचे शुल्क कळविले आहे. जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांची ही कृती चुकीची आहे.

या प्रकरणातील संबंधित घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे केली आहे, तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी उपस्थित झाले याचा कोणताही पुरावा आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही व तसेच तलाठ्याने पाठविलेले दिनांक ०६-१०-२००९ रोजीचे पत्र देखील त्यांनी स्वीकृत केले नाही. या पत्राव्दारे तलाठ्याने अपिलार्थीस अवाजवी शुल्क कळविले आहे. यावरुन अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी सारखेच जबाबदार असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. सुनावणीच्या वेळी, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण ४५९ इतक्या माहितीच्या पृष्ठांकरिता प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे एकूण ९१८ रुपये इतके शुल्क, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सात दिवसाच्या आत भरण्याचे मान्य केले आहे व सदर शुल्क प्राप्त होताच त्याच दिवशी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पुरजळ यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल रामचंद्र रुद्रवार, रा. जवळा बाजार, तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पुरजळ, तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३६
निर्णय दिनांक : १५.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अशोक नामदेवराव जगताप,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय पालसिंगन, ता.जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"अशोक नामदेव जगताप यांचे मालकी हक्कातील मौजे पालसिंगन ता.जि.बीड येथील अ.नं. २७२ सन १९६१-६२ चा नमुना नं.८ चा प्रमाणित केलेला उतारा."

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९९१-१९९२ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सन २००२-२००३ या कालावधीशी संबंधित माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९९१-९२ असा होता. त्यामुळे

प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी दि. २६.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पुरविल्या गेलेल्या माहितीची जन माहिती अधिकारी यांनी शहानिशा करुन, स्थानिक चौकशी करुन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे त्यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना चुकीची माहिती दिली व अपिलार्थीची फसवणूक केली असल्याचे म्हटले आहे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना स्थानिक चौकशी करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीप्रमाणे सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांना दंडित करण्यात यावे व त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अर्जानुसार अपिलार्थीच्या नावाची मालकी हक्काची अ.क्र. २७२ ची प्रमाणित प्रत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी त्यामध्ये आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे ग्रामपंचायतीच्या सन २००२ ते २००३ या वर्षाच्या नमुना नं. ८ च्या उपलब्ध रजिस्टरवरुन त्यांनी अपिलार्थीस मिळकत क्र. २७२ शी संबंधित माहिती पुरविली आहे. या मिळकतीवर श्री. ज्ञानोबा बुवाजी ढोरमारे यांच्या मालकी हक्काची नोंद आहे. या नोंदीऐवजी अपिलार्थीस त्यांच्या स्वतःच्या नावाची नोंद नमुना नं.८ च्या उताऱ्यावर करुन हवी आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहितीची मागणी करताना प्रथमतः १९६१-६२ या सालातील नमुना नं. ८ ची प्रमाणित प्रत मागितली आहे. परंतु माहितीसाठीच्या अर्जामध्ये, 'माहितीशी संबंधित कालावधी' या सदरापुढे त्यांनी सन १९९१-९२ असा उल्लेख केला आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन १९९१-९२ या कालावधीसंबंधित माहिती हवी असल्याचे दिसून येत आहे. परंतु प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सन २००२- २००३ या कालावधीशी संबंधित माहिती दिली अहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अशाप्रकारची माहिती देण्याची ही कृती चुकीची आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मौ. पालसिंगन गावाच्या सन १९९१-९२ च्या नमुना नं. ८ च्या रजिस्टरचा प्रथमतः त्यांच्या कार्यालयात शोध घेऊन त्यातील मालमत्ता क्र. २७२ शी संबंधित नमुना नं.८ ची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जामध्ये मौ.पालसिंगन गावाची मालमत्ता क्र. २७२, त्यांचे नाव मालक म्हणून नोंदवून नंतर त्या नमुना नं.८ ची प्रत अपिलार्थीस देण्याबाबत विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती जन माहिती अधिकारी यांना आवश्यक त्या कागदपत्रांअभावी पूर्ण करता येणे शक्य नाही. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्जदाराने विनंती केल्याप्रमाणे माहिती अधिकाऱ्याने त्यांच्याकडील प्रचलित अभिलेखामध्ये दुरुस्ती करुन नंतर ती माहिती अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, मौ. पालसिंगन, ता.जि.बीड या गावातील सन १९९१-९२ या कालावधीतील मालमत्ता क्र. २७२ च्या नमुना नं.८ ची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांना जर सन १९९१-९२ अथवा १९६१-६२ चे अभिलेखे त्यांच्या कार्यालयात सापडले नाहीत तर, हे अभिलेखे ज्या ग्रामसेवकाने

हस्तांतरित केले नाहीत त्या ग्रामसेवकावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती बीड यांनी आवश्यकतेप्रमणे फौजदारी कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दंडित करण्याची विनंती आयोगाकडे केली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हेतूतः दडवून ठेवल्याचे अथवा दुष्ट हेतूने त्यांना दिली नसल्याचे निःसंशयपणे आढळून येत नसल्याने जन माहिती अधिकारी यांना दंडित करण्याची अपिलार्थीची विनंती फेटाळून लावण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मौ. पालसिंगन, ता.जि.बीड या गावातील सन १९९१-९२ या कालावधीतील मालमत्ता क्र. २७२ च्या नमुना नं.८ ची प्रत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक नामदेवराव जगताप, रा.विवेकानंदपुरम, सोनवणे कॉलेजसमोर, एस.ए.माळी मामा यांचे निवास,लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत पालसिंगन, ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,बीड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५१
निर्णय दिनांक : १५.०४.२०१०

१. श्री. राजेंद्र देविदास काटे, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद,बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,बीड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आदेशित करण्याचे आणि त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे शास्तीची व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत दि. २५.०८.२००८ रोजी कंत्राटी लेखापाल या पदाकरिता

घेतल्या गेलेल्या मुलाखतीच्या संदर्भात दि. ०५.०३.२००८ ते ०५.०३.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण २ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दि. २५.०८.२००८ रोजी सकाळी ११.०० वा "कंत्राटी लेखापाल" या पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, याच्या सत्यप्रती, मुलाखतीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांची संख्या, मुलाखतीसाठी जिल्हा परिषदेतर्फे पाठविलेल्या पत्राच्या सत्यप्रती, त्याच दिवशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या दालनामध्ये उपस्थित असलेल्या इतर अधिकाऱ्यांची स्वाक्षरी असलेली प्रोसिडींगची सत्यप्रत व त्रयस्थ पक्ष उषा दिगांबर फड यांच्यासोबत आणखी किती उमेदवार उपस्थित होते, त्यांच्या मार्कांचा तपशील व यादी आणि त्या जागेसंबधी पुढील कार्यवाही काय केली याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने ॲटेस्टेड माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. तथापि अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०५.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना पुन्हा नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पुरविण्याचे आदेशित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली किंवा कसे, हे आयोगास आढळून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. १५.०४.२००९ रोजी नोंदणीकृत डाकेने माहिती पुरविली

होती. तथापि अपिलार्थीने नमूद केलेल्या पत्त्यावर अपिलार्थीचा तपास न लागल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचे पाकीट पोस्टामार्फत परत प्राप्त झाले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते, तसेच आज रोजी आयोगाकडील सुनावणीसाठी देखील संबंधित अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०४.२००९ रोजी पाठविलेली माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांना अकरा दिवसांचा विलंब का लागला आहे, याचे कारण आयोगास अवगत होत नाही. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे मात्र नि:संशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २०(२) प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र देविदास काटे,रा. संत नामदेव नगर,बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५२
निर्णय दिनांक : १५.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>उपविभाग अंबड, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)विभाग, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही आणि नियमानुसार त्यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अंबड तालुक्यात ज्या गावात दि. ०१.०४.२००७ ते दि. ३१.०३.२००८ या कालावधीमध्ये पाझर तलावाची कामे करण्यात आली,त्या सर्व गावांची नावे आणि त्या पाझर तलावावरील मजूरांच्या मस्टरच्या छायाप्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना यांच्याकडे दि. १५.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व परिणामी अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे भाग आहे. सर्व संबंधितांच्या आणि आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीने आयोगाकडे दि.२९.०१.२००९ रोजी त्यांचे द्वितीय अपील दाखल केल्यानंतरच्या कालावधीमध्ये अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे,ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,रा.म्हाडा कॉलनी, नं.२७, जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, रेल्वेस्टेशन रोड, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५३
निर्णय दिनांक : १५.०४.२०१०

१. श्री. गणेश हरिभाऊ राख, : अपिलार्थी
रा.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१औरंगाबाद

जन माहिती अधिकारी : विभागीय समाजकल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळेवर माहिती न मिळाल्याने आणि त्यांना नुकसान भरपाई व त्यांनी मागणी केलेले प्रमाणपत्र अद्यापही न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०१.२००९ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. २९.०१.२००९ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये, जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये प्रकरण क्र. २४९८(अ) च्या संदर्भात दि. २०.०२.२००८ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे काम कुठपर्यंत झाले व अपिलार्थीस जात प्रमाणपत्र कधीपर्यंत मिळेल, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचे प्रकरण त्रुटींच्या पूर्ततेअभावी प्रलंबित असल्याचे अपिलार्थीस कळविले आणि समितीचा निर्णय झाल्यानंतर अपिलार्थीस अवगत करण्याचे आश्वासित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील प्रकरण संबंधित समितीस पंधरा दिवसांच्या आत सादर करण्याच्या जन माहिती अधिकारी यांना सूचना दिल्या. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २०.०३.२००९ रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रकरणाची तत्कालीन स्थिती कळविली

होती व तसेच या प्रकरणी अपिलार्थीच्या जातीचे वैध प्रमाणपत्र अ.क्र.-C 612 त्यांना दि. ०५.१०.२००९ रोजी निर्गमित केले आहे व सदर वैध प्रमाणपत्र अपिलार्थीस प्राप्त झाले आहे.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही पूर्णतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या बीड पोलीस कार्यालयाकडून दि. २०.०२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावाची तत्कालीन स्थिती वगळता उर्वरित माहिती - अपिलार्थीस जातप्रमाणपत्र कधी पर्यंत मिळेल - ही माहिती त्यांना देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्थितीत उपलब्ध आहे, त्या स्थितीत त्यांनी अर्जदारास देणे अशी प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्यांना जात प्रमाणपत्र कधी मिळेल, ही भविष्यकाळातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांना देता येणे शक्य नाही. ही माहिती वगळता, बीड पोलीस कार्यालयाच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या प्रस्तावावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०३.२००९ रोजी पुरविली आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे व तसेच आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून त्यांच्या जातीचे वैध प्रमाणपत्र दि. ०५.१०.२००९ रोजी पाठविले गेले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश हरिभाऊ राख,संभाजीनगर, नगर रोड, बालेपीर,बीड,ता.जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१ औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०९
निर्णय दिनांक : १५.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहा. तालुका कृषि अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,<br>जि.जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी,तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांच्या कार्यालयाकडे, दि. ०१.०४.२००७ ते दि. ३१.०३.२००८ या कालावधीमध्ये रोहयोअंतर्गत किती पतमर्यादा प्राप्त झाली, ती कशी वितरीत करण्यात आली त्याची गावनिहाय, कामनिहाय,मजुरनिहाय,शाखा अभियंता निहाय,मंडळ कृषि

अधिकारी निहाय व कृषि सहायक निहाय अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या दि. १६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो तालुका कृषि अधिकारी,जाफ्राबाद यांच्या कार्यालयातून प्राप्त झालेली नाही. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता, त्यांना माहिती देण्यासाठी संबंधित अधिकारी टाळाटाळ करीत असतात व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेली कोणतीही माहिती जनसामान्यांना देत नाहीत. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर शास्तीची कारवाई करावी, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस विनंती केली.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियमानुसार मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, आयोगाने त्यांना, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेल्याचा एखादा सबळ पुरावा त्यांच्याकडे आहे काय, याची विचारणा केली असता, यासंदर्भात त्यांनी आयोगास नकारार्थी उत्तर दिले. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, एकदा अर्जदाराने माहिती अधिकाऱ्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता, त्यांच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधण्याचे उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्त्व योग्यप्रकारे पार पाडले असल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे उत्तरदायित्त्व पार पाडले नसल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज आणि त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्ज हे दोनही अर्ज तालुका कृषि अधिकारी,जाफ्राबाद यांच्या कार्यालयास प्राप्त झ ाल्याचे या अर्जांच्या प्रतींवरील त्या, त्या कार्यालयातील लिपीकाच्या सहीवरुन व कार्यालयाच्या शिक्क्यावरुन दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज संबंधितांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती माहिती त्यांना तालुका  कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांच्या कार्यालयामार्फत देय होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि.

१६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,रा.म्हाडा कॉलनी, नं.२७, मल्टी पर्पज शाळेच्या पाठीमागे, रेल्वेस्टेशन रोड, जुना जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक तालुका कृषि अधिकारी,जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४६

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. ए. डी. पाटील, : अपिलार्थी
रा. डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड,
ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती, सुनावणीमध्ये विविध कारणांनी नाकारुन व

एकतर्फी सुनावणी घेऊन   जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे "पेन्शन उशिरा मिळाल्याने त्यावरील व्याज शासनाकडून मिळू शकते किंवा नाही "  या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"सेवानिवृत्त झाल्यानंतर पेन्शनची पूर्ण रक्कम किती दिवसांच्या आत मिळाली पाहिजे या संबंधी कायदा काय याचा लेखी खुलासा,  सेवानिवृत्ती वेतन निवृत्तीनंतर किती दिवसांच्या आत सुरु झाली पाहिजे याचा लेखी खुलासा व या सर्वाविषयी विलंब झाल्यास व्याजासह रक्कम मिळण्यासाठी कोणत्या कायदेशीर मार्गाने जावे लागेल याचा विस्तृत लेखी खुलासा."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना उद्देशून केला होता.  त्यांनी अपिलार्थीचा हा अर्ज, अपिलार्थी हे ज्या पंचायत समितीतून सेवानिवृत्त झाले त्या कन्नड पंचायतीच्या गट विकास अधिकाऱ्याकडे दिनांक ३१-१२-२००८ रोजी पाठवून त्यांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे सूचित केले.  गट विकास अधिकाऱ्याने यानंतर त्यांच्या स्तरावर दिनांक २८-१२-२००८ रोजी अपिलार्थीस काही माहिती पुरविली.  तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०६-२००९ रोजी आदेश पारित करुन, गट विकास अधिकाऱ्याने माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून, अपिलार्थीचे अपील निकाली काढले.  जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड हे उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना गट विकास अधिकाऱ्यामार्फत पुरविली असल्यामुळे आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे, प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती वगळून गट विकास अधिकाऱ्याने त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थीस गट विकास अधिकाऱ्याने दिनांक २८-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीतील विसंगती-बाबत त्यांना विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने याच विषयावर त्यांच्याकडे एकूण १७ वेळा अर्ज केला असल्यामुळे, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस अशा स्वरुपात पुरविलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जरी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागितली असली तरीही या अर्जाचे नीट अवलोकन केले असता, 'अपिलार्थी सेवानिवृत्त झाल्यानंतर पेन्शनची पूर्ण रक्कम किती दिवसाच्या आत मिळाली पाहिजे व पेन्शन उशिरा मिळाल्यास त्यांच्याकडील व्याज देय होते किंवा कसे व त्याकरिता कोणत्या कायदेशीर मार्गाने जावे लागेल,' अशी माहिती त्यांना हवी असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जामध्ये जरी "लेखी खुलासे" हे शब्द वारंवार वापरले असले तरीही जन माहिती अधिकारी यांना शासनाच्या वित्त विभागाने वेळोवेळी सेवानिवृत्त वेतनाच्या

संदर्भात व त्यावरील व्याजासंदर्भात दिनांक १७-१२-२००८ पर्यंत पारित केलेले आदेश अपिलार्थीस जर पाठविले असते तर त्यांचा कार्यभाग साधला जाऊ शकत होता. केवळ अपिलार्थीने "लेखी खुलासा" हा शब्द वापरल्याने या तांत्रिक उणिवेचा फायदा घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी माहिती नाकारल्याचे स्पष्ट होत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांना तात्पुरते पेन्शन ६ महिन्यात मंजूर करुन त्यानंतर आवश्यक असल्यास ही मुदत महालेखापालाकडून वाढून घेणे, सेवानिवृत्ती वेतन कर्मचाऱ्यास विलंबाने मिळाल्यास त्या रकमेवर व्याज देणे अशाप्रकारच्या प्रत्येक कार्यवाहीसाठी वित्त विभागाने त्यांच्या वेगवेगळ्या निर्णयाद्वारे निश्चित कालमर्यादा घालून दिलेली आहे. वित्त विभागाचे हे आदेश जिल्हा परिषदेला लागू होत आहेत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज ज्या जन माहिती अधिकाऱ्यास - उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून केला होता - त्याने वित्त विभागाच्या सेवानिवृत्तीच्या संदर्भातील दिनांक १७-१२-२००८ रोजीपर्यंत पारित केलेले विविध आदेश अपिलार्थीस पाठविणे या प्रकरणी अभिप्रेत होते, जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ हेतू सफल होऊ शकला असता. तथापि या प्रकरणी संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी कोणतीही कृती केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात शासनाच्या विविध विभागाने वेळोवेळी पारित केलेले आदेश हे निश्चितपणे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणार. परंतु त्यांचा शोध न घेता १४ दिवसाच्या विलंबाने अपिलार्थी हे ज्या पंचायत समिती कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाठविण्याची उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कृती सर्वस्वी गैर व चुकीची आहे. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती स्वयंप्रेरणेने त्यांना देऊन सकारात्मक कार्यवाही करण्याऐवजी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याची टाळाटाळ केली असल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड यांनी तर उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर कडी

करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना दिनांक २८-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे मुळीच न पुरविता अपिलार्थीच्या दुसऱ्या कथित अर्जातील माहिती त्यांना पुरविली आहे. गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती ही पूर्णपणे चुकीची व अपिलार्थीची दिशाभूल करणारी अशा स्वरुपाची आहे. हे प्रकरण म्हणजे अर्जदारास माहिती देण्याऐवजी त्याला मुळी माहिती कशी देऊ नये याचे एक उत्तम उदाहरण आहे, असे म्हटल्यास येथे फारसे वावगे होऊ नये. आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी शासनाच्या वित्त विभागाकडून शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व अनुषंगीक आर्थिक लाभ देण्यासंदर्भात वित्त विभागाने दिनांक १७-१२-२००८ पर्यंत, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात पारित केलेल्या, सर्व आदेशांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवाव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळून संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड यांनी दर्शविलेल्या त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीबाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी, अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना कशी देता येईल याचा सकारात्मक विचार करुन त्या अर्जावर कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. डी. पाटील, डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४७

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. तुकाराम अप्पाराव पाष्टे, : अपिलार्थी
मु. पो. मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय
मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती माजलगांव, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सन २००१ साली झालेल्या फेर आकारणीच्या कायदेशीरपणाबाबत सविस्तर माहिती", अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस नमुना नंबर ८ ची फेर आकारणी वरिष्ठ कार्यालयाच्या सूचनेनुसार करण्यात आली आहे, असे कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिल्याने त्यांचे समाधान झाले असल्याचे आणि याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे त्यांच्या दिनांक २५-०३-२०१० रोजीच्या पत्राने आयोगास कळविले आहे. अपिलार्थीचे हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्यापर्यंत न पोहोचल्याने ते अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय घेऊ शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्या दि. २३-०३-२००९ रोजीच्या पत्रामध्ये उल्लेख केलेला, वरिष्ठ कार्यालयाने दिलेला कथित आदेश आयोगास दाखविता आला नाही.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी तोंडी व लेखी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही विशिष्ट स्वरुपाची नसून ती मोघम स्वरुपाची

माहिती आहे. अपिलार्थीस या प्रकरणी, फेर आकारणीच्या कायदेशीरपणाबाबत सविस्तर माहिती अशी माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होती. तथापि "कायदेशीपणा-बाबत सविस्तर माहिती" म्हणजे नेमके अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून काय अपेक्षित आहे, याचा कोणासही बोध होणे शक्य नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीस कोणत्या विशिष्ट मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे याचा खुलासा करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देय होत नाही. याही उपर अपिलार्थीने आयोगाकडे उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे लेखी स्वरुपात कबूल केले असल्याचे दिसून येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या पत्रामध्ये, त्यांच्या ज्या वरिष्ठ कार्यालयाच्या सूचनेचा उल्लेख केला आहे, त्या वरिष्ठ कार्यालयाच्या सूचना त्यांना आयोगास आज रोजी दाखविता आल्या नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी कोणताही आधार नसलेली खोटी माहिती अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविली असल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यानी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या, त्यांच्यापर्यंत अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पोहोचला नाही, या विधानास त्यांच्या बेजबाबदार वर्तनाचा दर्प येत आहे, असे आयोगास वाटते. वास्तविक पाहता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची अंमलबजावणी करताना गट विकास अधिकाऱ्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्याने त्यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या अपील अर्जांचा नियमीतपणे आढावा घेणे अपेक्षित आहे. परंतु केवळ त्यांच्या कार्यालयातील कक्ष अधिकाऱ्याने (श्री. येवले) त्यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज सादर न केल्याने ते

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेऊ शकले नाहीत, असे त्यांचे म्हणणे, आयोग पूर्णपणे अमान्य करत आहे आणि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना निर्णय प्राप्त न होण्यासाठी जबाबदार असलेले कक्ष अधिकारी श्री. येवले व संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत मोठीवाडी, पंचायत समिती, माजलगांव यांच्यावर ते अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी असल्याने प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी कक्ष अधिकारी श्री. येवले पंचायत समिती, माजलगांव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. ए.एम. सावध, ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम अप्पाराव पाष्टे, मु. पो. मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मोठीवाडी, ता. माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४८

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. मोहंमद कलीम अहेमद अब्दूल रहीम, : अपिलार्थी
राा. आसेफिया कॉलनी, घर. न. १-२१-८००, (ए/६/३७),
एम. एम. खान समोर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मॅनेजर, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास
महामंडळ लि., औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास
महामंडळ लि., औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास

महामंडळ लि. औरंगाबाद यांच्याकडे, १ जुलै २००८ ते ३० मार्च २००९ या कालावधीमधील मंजूर कर्ज प्रकरणातील लाभार्थ्यांच्या जात प्रमाणपत्राच्या प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १५-०५-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि., औरंगाबाद यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (१) च्या तरतुदीनुसार माहिती मागितली आहे, ते प्राधिकरण म्हणजे राज्य शासनाचे अधिकृत व्यवसाय असलेले शासकीय महामंडळ आहे. त्यामुळे सदरचे प्राधिकरण हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या "सार्वजनिक प्राधिकरण" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत आहे. परिणामी माहिती अधिकार अधिनियमातील सर्व तरतूदी या महामंडळास लागू होत आहेत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे संबंधित महामंडळाच्या जन माहिती अधिकाऱ्यास मागितलेली माहिती त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे देणे अनिवार्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केली असल्यास, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयाशी व्यक्तिशः संपर्क साधून ती संबंधितांच्याकडून हस्तगत करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व पार पाडले आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही अथवा यासंदर्भात कोणताही सविस्तर खुलासा तोंडी स्वरुपात स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. परंतु ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे आणि जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित लाभार्थ्यांना शासनाकडून प्राप्त होणारा निधी कर्जाच्या स्वरुपात वाटप केला जात असल्यामुळे, संबंधित लाभार्थ्यांचे जात प्रमाणपत्र उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचा अथवा इतरांचा कोणताही प्रत्यवाय नसावा. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी मागणी केलेली ही माहिती वरील कालावधीत त्यांना कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांच्याकडून स्वतः हस्तगत करावी लागेल. ही माहिती त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधीस संबंधित महामंडळाकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहंमद कलीम अहेमद अब्दूल रहीम, आसेफिया कॉलनी, घर. न. १-२१-८००, (ए/६/३७), एम. एम. खान समोर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि., औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि., औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४९

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. देवलाल सांडू आकोदे, : अपिलार्थी
मु. पो. हसनाबाद, ता. भोकरदन, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीमध्ये पूर्ण माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा परिषद, जालना अंतर्गत शिक्षण विभागामधील रिक्त पदाच्या बाबत भरती करण्यात आलेल्या आणि भरती केलेल्या पदाच्या बाबतीत काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या सर्व मुद्यांवरील माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे या संदर्भात दिनांक २६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०४-२००९ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ११-०५-२००९ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती व त्यांच्या अपिलावरील निर्णय दिनांक ३०-०४-२००९ पर्यंत कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतर अपेक्षित माहिती न मिळाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील, 'पदोन्नती दिल्या गेलेल्या मुख्याध्यापकाच्या अपंग संवर्गाची माहिती', प्राप्त झालेली नाही. मुख्याध्यापकाची ६ रिक्त पदे भरलेली आहेत. परंतु ती अपंगत्वाच्या कोणत्या प्रवर्गातून भरलेली आहेत याची माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ही माहिती ते अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील, "किती शिक्षकांना जानेवारी २००९ नंतर मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देणार?, " हा मुद्दा वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास योग्य प्रकारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली, त्यांच्या मागणीशी सुसंगत असलेली, माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्यांनी, अपंग प्रवर्गानुसार दिलेल्या मुख्याध्यापकाची यादी अपिलार्थीस या प्रवर्गानुसार पुरविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी केवळ पदोन्नती दिलेल्या मुख्याध्यापकाची यादी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे. या यादीमधील प्रत्येक मुख्याध्यापक हा अपंगाच्या कोणत्या प्रवर्गातून पदोन्नत झाला आहे याचा त्यामध्ये उल्लेख नाही. ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे आणि ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी हे ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य व टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

वरील घटनाक्रमाचा अभ्यास केला असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित स्वरुपाची होती. ही माहिती अपिलार्थीस पूर्णतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त होण्यासाठी कोणतीही अडचण नव्हती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जवळ जवळ

संपूर्ण माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. या माहितीमध्ये फक्त प्रत्येक मुख्याध्यापकाचा अपंग संवर्ग जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस उपलब्ध करुन दिला नव्हता. यानंतर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिनांक ११-०५-२००९ रोजी आदेशित करुनही आजतागायत म्हणजेच १ वर्षाचा कालावधी टळून गेल्या नंतरही अपिलार्थीस आवश्यक असलेली त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त होऊ शकलेली नाही, ही बाब आयोग गांभीर्याने घेत आहे. यासंदर्भात उपस्थित शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे आयोगाने विचारणा केली असता, त्यांच्या कार्यालयातील संबंधित वरिष्ठ लिपीक श्री. के. डी. लोखंडे यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना, पदोन्नती दिलेल्या मुख्याध्यापकाच्या अपंग प्रवर्गाची माहिती दिली नसल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस वेळेत पुरविता आली नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी यांच्या बरोबरच अर्जदारास माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे संबंधित सर्व सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांना देखिल माहिती अधिकरी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयातील संबंधित वरिष्ठ लिपीक श्री. के. डी. लोखंडे हे या प्रकरणी जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे दडवून ठेवल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांना देता आली नाही. श्री. लोखंडे यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा आणि नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट करुन त्यांना अधिनियमातील कलम (२०) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरवले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना शिक्षण

विभागाच्या कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. के. डी. लोखंडे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. के. डी. लोखंडे, वरिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देवलाल सांडू आकोदे, मु. पो. हसनाबाद, ता. भोकरदन, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५०

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. चंद्रशेखर प्रभाकरराव (देशमुख) भूमकर, : अपिलार्थी
कार्यकारी संपादक, सा. लाडीगोडी, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय क्रीडा अधिकारी, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अर्धवट, चुकीची व दिशाभूल करुन जन माहिती अधिकारी यांनी अधिकच भ्रष्ट माहिती दिली असून ती प्रमाणीत करुन दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत १ जानेवारी २००४ - ०५ ते २००८-०९ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या विविध

योजनेअंतर्गत विविध संस्थांना देण्यात आलेल्या अनुदानासंदर्भात काही माहिती एकूण १० मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय क्रीडा अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याकरिता तीन दिवसाच्या आत त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थी आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्याकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी प्राप्त झाला असल्याचे दिसून येत आहे. तथापि यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये "जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या अर्धवट, चुकीची व दिशाभूल करुन अधिकच भ्रष्ट माहिती दिलेली असून ती प्रमाणीत करुन दिली !" अशा प्रकारची कारणे या द्वितीय अपील अर्जासंदर्भात आयोगास दिली आहेत. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असून आणि ती माहिती अपिलार्थीस अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटत असावे असा आयोग निष्कर्ष काढीत आहे. तथापि

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही कशा प्रकारे अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी आहे याचे कोणतेही स्पष्टीकरण आयोगास दिलेले नाही अथवा या बाबतीत तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कार्यवाही करणे अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून आले आहे. या संदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदाराने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले आहे हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास स्पष्ट होत नाही. त्याच बरोबर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती देखिल अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेली नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे खरोखरीच अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी आहे किंवा कसे हे आयोगास ठरवता येत नाही. त्यामुळे आवश्यक त्या कागदपत्राअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात, आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने (जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याने) माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (४) (ख) (बारा) व (तेरा) मधील तरतुदीप्रमाणे स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची अशा स्वरुपाची माहिती आहे. क्रीडा

विभागाच्या संदर्भात आयोगाकडे आतापर्यंत दाखल झालेल्या सर्व अपील अर्जांमध्ये अशाप्रकारची माहिती वेगवेगळ्या अपिलार्थींनी क्रीडा अधिकाऱ्यांकडे मागितली असता, एखादा अपवाद वगळता उर्वरित कोणत्याही जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याने अशा प्रकारची माहिती अर्जदारास अथवा इतर जनसामान्यांना उघड केली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब क्रीडा संचालक, पुणे यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार ) मधील तरतुदीप्रमाणे असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (ख) मध्ये विहित केलेल्या एकूण १७ मुद्यांवरील माहिती त्यांच्या विभागाच्या संकेत स्थळावर (वेब साईटवर) तात्काळ उपलब्ध करुन द्यावी व तिचे नियमीतपणे नूतनीकरण करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रशेखर प्रभाकरराव (देशमुख) भूमकर, कार्यकारी संपादक, सा. लाडीगोडी, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय क्रीडा अधिकारी, क्रीडा संकूल लातूर, जि.

लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ क्रीडा संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत पाहिला मजला, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७५

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. सुखदेव नामदेव सावंत, : अपिलार्थी
रा.निंबोळा, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद
उपविभाग, अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे सिंचन विभाग,
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता (लपावि), जिल्हा परिषद उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता (लपावि), जिल्हा परिषद, जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. सानप (उप अभियंता)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन), जिल्हा परिषद उपविभाग, अंबड यांच्याकडे, श्री. सानप, उप अभियंता यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये संपूण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत व रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या पाझर तलावाच्या व गावतलावाच्या कामाच्या मस्टरच्या छायांकीत प्रती, धडक विहिर यासाठी केलेल्या कामाच्या मोजमाप पुस्तिकांच्या प्रती, कामावर झालेला खर्च व रोजकिर्दीच्या प्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०६-२००८ रोजी अपिलार्थीस व्दितीय अपिलात जाण्यास त्यांच्या कार्यालयाची संमती देण्यात येत असल्याचा निर्णय दिला. यावर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व अपिलार्थी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियमाखाली मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडे वारंवार जाऊनही, ती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत, असे आयोगास स्पष्ट केले व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्यास तयार असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम प्रतिसाद देणे भाग होते, तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे, यासंदर्भात आयोगाने अपिलार्थीकडे सबळ पुराव्याची मागणी केली असता, अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत, असे आयोगास अवगत केले. दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसताना मूळ अर्जामध्ये दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे अपिलार्थीने कसे नमूद केले, याची आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीने मूळ अर्ज करताना त्यांची झालेली चूक आयोगापुढे मान्य केली, तथापि याचबरोबर त्यांना ही माहिती आवश्यक असल्याचा त्यांनी आयोगाकडे आग्रह धरला. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता परत नव्याने अर्ज करावा व त्यांच्याकडून ही माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी. विचाराधीन प्रकरणापुरता विचार करावयाचा झाल्यास, या प्रकरणी

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये असत्य माहिती पुरविली असल्यामुळे, त्यांचा मूळ अर्ज अवैध ठरत आहे व परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुखदेव नामदेव सावंत, रा.निंबोळा, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (लपावि), जिल्हा परिषद उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (लपावि), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७६

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, : अपिलार्थी
मु. पो. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. सुभाष उर्फ लक्ष्मण पांडुरंग तावडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे तळणी येथील घर क्रमांक १०८८ व १०८९ च्या मालकीबाबत, ग्रामपंचायत कार्यालय, तळणी यांनी घेतलेल्या ठरावासंदर्भात दिनांक ०५-११-२००७ रोजी स्थायी

समितीकडे केलेल्या अर्जावर, स्थायी समितीने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.), जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत बसत नसल्याच्या कारणास्तव, अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आणि अपिलार्थी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने स्थायी समितीकडे दिनांक ०५-११-२००७ रोजी केलेल्या अर्जाची प्रत त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाबरोबर जोडलेली आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे संबंधितांकडे पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस कोणत्या

विषयावरील माहिती हवी आहे याचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने स्थायी समितीकडे दिनांक ०५-११-२००७ रोजी केलेल्या अर्जावर स्थायी समितीने केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीचा दिनांक ०५-११-२००७ रोजीचा अर्ज स्थायी समितीकडे प्राप्त झाल्यानंतर स्थायी समिती अथवा या प्रकरणाशी संबंधित जिल्हा परिषदेतील अधिका-याने / कर्मचा-याने संबंधित प्राधिकरणांशी दिनांक २१-०२-२००८ रोजीपर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्या-वरील टिपणीच्या प्रती, ही होय. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या स्थायी समिती, जिल्हा परिषद, नांदेड यांना उद्देशून लिहिलेल्या अर्जावर, स्थायी समिती अथवा जिल्हा परिषदेतील या विषयाशी संबंधित असलेल्या प्राधिकरणाने, या विषयावर दिनांक २१-०२-२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. जर स्थायी समितीने अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या अर्जावर दिनांक २१-०२-२००८ पर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसेल तर, अपिलार्थीस तसे कळवावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २१-०२-२००८ रोजी केलेल्या अर्जावर, जिल्हा परिषदेचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर, त्यांनी अर्जदारास तसे विहित मुदतीत कळविणे अभिप्रेत होते, परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

कोणत्याच प्रकारे प्रतिसाद न देऊन, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० (२) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द होत आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. निलकंठ भिवनाजी राऊत, मु. पो. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७७

निर्णय दिनांक   १५-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राहुल आश्रोबा भिसे,<br>रा. आसनगांव, पो. पांडे पोखरी, तालुका परतूर,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शाखा अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद उपविभागीय कार्यालय, परतूर, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग,<br>जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही त्यांना माहिती प्राप्त होऊ शकत नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता श्री. डी. बी. जाधव, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद उपविभागीय कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांच्याकडे, परतूर व मंठा तालुक्यात सन २००६-०७, २००७-०८ या कालावधीमध्ये, रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या पाझर तलावांच्या कामावरील मजुरांचे हजेरीपट, पाझर तलावाच्या अंदाजपत्रकाची व मोजमाप पुस्तिकांची झेरॉक्स प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या-कडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे दिनांक १६-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित उप अभियंता यांनी दिली नसल्याचे कबूल केले व अपिलार्थीस व्दितीय अपिलात जाण्याची या पत्राव्दारे परवानगी दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अशा प्रकारच्या चमत्कारीक निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत त्यांना देणे

अनिवार्य होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही, एवढेच नव्हे तर, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २५-१२-२००८ रोजी सुनावणी झाल्यानंतर याहीवेळी कार्यकारी अभियंता यांनी संबंधित उप अभियंत्याशी दूरध्वनीव्दारे संपर्क साधला असता, त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे कबूल केले. वास्तविक पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी माहिती अधिका-यास सूचित करण्याच्या ऐवजी त्यांनी अपिलार्थीस आयोगाकडे जाण्याची परवानगी दिली, जी अपिलार्थीने त्यांच्याकडे कधीही मागितली नव्हती. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची अशा प्रकारे बोळवण करणा-या अभियंत्याची कार्यकारी अभियंता या पदावर काम करण्याची पात्रता आहे किंवा कसे हे जलसंपदा विभागास आता तपासावे लागेल. माहिती अधिकार अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर तीन वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीने या अर्जाव्दारे मागणी केलेली सार्वजनिक स्वरुपाची माहिती देखील अपिलार्थीस संबंधितांच्याकडून उपलब्ध न होणे ही खरोखरच दुर्दैवाची बाब म्हटली पाहिजे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे टाळाटाळ करुन त्याची कबुली कार्यकारी अभियंता यांच्याकडे दूरध्वनीव्दारे दिली आहे. आज रोजी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे जलसंपदा विभागाचे कोणीही अधिकारी उपस्थित नसल्यामुळे, सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार, संबंधितांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस

देण्यासंदर्भात सध्या कार्यरत असलेले शाखा अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद उपविभागीय कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना अथवा जिल्हा परिषदेने नेमणूक केलेल्या संबंधित माहिती अधिका-यास असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी शाखा अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद उपविभागीय कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित, जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे जिल्हा परिषदेकडील सहायक, यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राहुल आश्रोबा भिसे, रा. आसनगांव, पो. पांडे पोखरी, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) जिल्हा परिषद उपविभागीय कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८६

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, : अपिलार्थी
दाना बाजार, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
मंडळ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. एन. श्रीवास्तव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी निर्धारीत वेळेत माहिती न देऊन, माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. डी. एन. श्रीवास्तव, शाखा अभियंता, अंबड यांनी कोणकोणते पाझर तलाव केले त्या पाझर तलावांची नावे, या कामावरील मजूर मस्टरच्या छायांकीत प्रती, श्री. डी. एन. श्रीवास्तव, शाखा अभियंता यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत, श्री. डी. एन. श्रीवास्तव, शाखा अभियंता यांनी आतापर्यंत किती अकुशल पतमर्यादा वाटप केली त्या कॅश रजिस्टरची झेरॉक्स प्रत, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००६ ते एप्रिल २००८ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस संबंधित उप अभियंता यांच्याकडून माहिती घेण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेचे पालन न करता, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०९-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना अथवा, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९६

निर्णय दिनांक १५-०४-२०१०

१ श्री. माधव भुजंग दामरे, : अपिलार्थी

रा. राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड,

तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपील त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य नसल्यामुळे आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' मी दि. १६-११-२००६ रोजी मे. तलाठी व मंडळ निरिक्षक यांना अर्ज देवून वरील गटाबाबत दुरुस्ती करुन सातबारा दुरुस्त करुन सातबारा मिळणेबाबत अर्ज देवून त्यांच्याकडून कार्यवाही न झाल्यामुळे वरीलप्रमाणे आपणाकडे अर्ज दिला त्याबाबत माहिती देण्याबाबत सदरचा अर्ज राष्ट्रीय माहितीचा अधिकार २००५ अन्वये देत आहे. '

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसाधारण टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०१-०५-२००७ रोजीच्या आदेशान्वये निर्णय देऊन, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे नियमानुसार योग्य आहे असे नमूद करुन, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले व संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आजही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित नसल्याची बाब त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मौजे राणीसावरगांव, तालुका गंगाखेड येथील गट नंबर ३८४ मधील त्यांच्या मालकीच्या क्षेत्राचा ७/१२ उतारा दुरुस्त करुन त्यांना हवा असल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया, अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये दुरुस्ती करुन नंतर अर्जदारास माहिती देणे, अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या भूखंडाच्या ७/१२ च्या उता-यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून बदल करुन हवा होता, असे बदल करत असताना जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या विभागाने विहित केलेली कार्यपध्दती अवलंबविणे हे त्यांना अनिवार्य आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अशा प्रकारच्या सार्वजनिक प्राधिकरणास, एखाद्या प्रकरणाचा निपटारा करण्याकरिता कायद्यातील तरतुदीव्दारे विहित केलेली विशिष्ट प्रकारची कार्यप्रणाली बदलून, नंतर अर्जदारास हवी असलेली माहिती देणे अशी तरतूद नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ०१-०५-२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीच्या ७/१२ दुरुस्तीचे प्रकरण गंगाखेड तहसील कार्यालयात प्रलंबीत असल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणासंदर्भात नायब तहसीलदार (महसूल) हे चौकशी करत आहेत. तसेच या प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीचे पालन करुन, नायब तहसीलदार व तहसीलदार यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. सदर निर्णय दिनांक ०१-०५-२००७ पर्यंत झालेला नव्हता, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस त्यांच्या विनंतीप्रमाणे ७/१२ उता-यावर बदल करुन माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती जरी प्रशासकीयदृष्ट्या योग्य असली तरीही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या अर्जास, अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही हे सत्य शेवटी उरत आहे. सबब, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल जिल्हाधिकारी, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केल्याप्रमाणे, एखाद्या भूखंडाचा ७/१२ दुरुस्त करुन तो अर्जदारास देण्याचे आदेशित करण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगाला नाही, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीची त्यांना दुरुस्त ७/१२ देण्याची विनंती आयोगास मान्य करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माधव भुजंग दामरे, रा. राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.